सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १०९ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विनम्र अभिवादन



राष्ट्र सेविका समितीच्या द्वितीय प्रमुख संचालिका वं. ताई आपटे यांचा आज तिथीनुसार स्मृतिदिन

# महाराष्ट्र करेल एआय क्रांतीचे नेतृत्व

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा विश्वास

**मुंबई, २४ फेब्रुवारी**

तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती दिली जात असून, महाराष्ट्र राज्य लवकरच देशाच्या 'एआय' आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अॅण्ड लीडरशिप समिट कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांची नॅसकॉमचे श्रीकांत वेलामकन्नी यांनी मुलाखत घेतली. फडणवीस म्हणाले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात 'एआय' सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारीतून इंडस्ट्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने एक ट्रिलियन डॉलर्सपर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राज्याने नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला १.५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे.



#### नागपुरात विकसित करणार जीसीसी पार्क

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार आहे. ही 'इनोव्हेशन सिटी' देशातील सर्वांत प्रगत शहरांपैकी एक ठरेल. तीनशे एकरमध्ये ही सिटी विकसित केली जाणार असून, यात तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर दिला जाणार आहे. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथे जीसीसी पार्क विकसित करणार आहे, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

#### कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार

शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'अॅग्री-स्टॅट' उपक्रमांतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

#### डेटा सेंटर-फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

देशातील ६० टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५० टक्के वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचे फडणवीस म्हणाले.

#### नाशिक कुंभमेळ्यासाठी वापरणार अत्याधुनिक तंत्रज्ञान

नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी फडणवीस यांनी उत्तरप्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल योगी आदित्यनाथ यांचे कौतुक केले. (वृत्तसंस्था)

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांवर आज सुनावणी

**नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांबाबत सुनावणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. यापूर्वी मागील महिन्यांत या प्रकरणी सुनावणी पार पडली होती. त्यावेळी न्यायालयाने काही काळ हे प्रकरण ऐकल्यानंतर पुढच्या सुनावणीसाठी २५ फेब्रुवारी ही तारीख निश्चित केली होती. या सुनावणीत याबद्दलचा निर्णय झाला, तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पुढच्या काही महिन्यांमध्ये लागू शकतील. मात्र, निर्णयाला उशीर झाला, तर निवडणुका आणखी लांबण्याची शक्यता आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि त्यात ओबीसी आरक्षण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नाही. देशात लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणूक झाली. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील, यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे.

मागील सुनावणीत न्यायालयाने राज्य सरकार आणि याचिकाकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणासंदर्भात काय झाले, याबद्दल विचारणा केली होती. त्यावर दोन्ही बाजूंकडून स्पष्टता आल्याचे सांगण्यात आले होते. राज्य सरकारने आपली बाजू मांडण्यासाठी १ तास तर याचिकाकर्त्यांनी अर्ध्या तासाचा वेळ मागितला होता. सोमवारी सुनावणीत या संदर्भातील युक्तिवाद पूर्ण झाले तर हा विषय मार्गी लागून येऊन निवडणुका एप्रिल-मेमध्ये होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आठवड्याच्या पहिल्याच सत्रात मोठी घसरण

**मुंबई** : ग्राहकांकडून मागणीत झालेली घट, विदेशी गुंतवणूकदारांनी लावलेला विक्रीचा धडाका आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ इशाऱ्याचे देशातील शेअर बाजारांत पडसाद कायम आहेत. यामुळे सोमवारी सलग पाचव्या सत्रांत मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी घसरणीसह बंद झाले. निर्देशांक ८५६ अंकांनी घसरून ७४,४५४ वर बंद झाला. निफ्टी २४२ अंकांच्या घसरणीसह २२,५५३ वर स्थिरावला. फायनान्शियल आणि आयटी शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण दिसून आली. निफ्टी आयटी २.७ टक्के, निफ्टी मेटल २.१ टक्के घसरला. बीएसई मिडकॅप ०.७ टक्के आणि स्मॉलकॅप १.३ टक्के घसरून बंद झाला. बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सोमवारी ४.२२ लाख कोटींनी कमी होऊन ३९७.९८ लाख कोटींपर्यंत खाली आले. याआधी शुक्रवारी बाजार भांडवल ४०२.२० लाख कोटी रुपयांवर होते. याचाच अर्थ आज गुंतवणूकदारांची संपत्ती ४.२२ लाख कोटींनी कमी झाली.

### इंटरनेटच्या दर नियंत्रणाची मागणी फेटाळली

**नवी दिल्ली** : देशातील इंटरनेटचे दर नियंत्रित करावे, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी नकार दिला.

इंटरनेट सेवा मिळवण्यासाठी ग्राहकांकडे वेगवेगळे पर्याय असतात, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्या. संजयकुमार यांच्या न्यायासनाने याचिका फेटाळताना सांगितले.

हा एक मुक्त बाजार आहे. येथे काही पर्यायही उपलब्ध आहेत. बीएसएनएल आणि एमटीएनएल देखील तुम्हाला इंटरनेट सेवा देते, असे निरीक्षण न्यायासनाने नोंदवले. बाजाराच्या मोठ्या हिश्शावर जिओ आणि रिलायन्सचे नियंत्रण आहे, असा आरोप याचिकाकर्त्याने याचिकेत केला होता. तुम्हाला व्यवसाय समूहनाचा आरोप करायचा असेल, तर तुम्हाला स्पर्धा आयोगाकडे दाद मागावी लागेल. याचिकाकर्त्याला कोणत्याही वैधानिक उपाययोजनांचा अवलंब करायचा असेल, तर ते त्यासाठी मुक्त आहेत, असे न्यायासनाने स्पष्ट केले.

### शेतकऱ्यांच्या खात्यात २२ हजार कोटी हस्तांतरित

**भागलपूर,** २४ फेब्रुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी पीएम किसान सन्मान निधी योजनेतील १९ वा हप्ता हस्तांतरित करण्यात आला. यासह देशभरातील ९.८ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात २२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा करण्यात आली. नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील काही विकासकामांचे लोकार्पण केले. यासाठी आयोजित कार्यक्रमाला बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार उपस्थित होते. काही केंद्रीय मंत्री, खासदार, आमदार आणि केंद्र तसेच राज्यातील मंत्रालयांचे अधिकारीही कार्यक्रमाला उपस्थित होते. सरकारला भारताच्या अन्नदात्यांचा अभिमान आहे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध असल्याचे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. माय गव्हर्मेंट इंडिया या एक्स खात्यावरील थ्रेड्सला प्रतिसाद देताना नरेंद्र मोदी म्हणाले, आम्हाला आमच्या अन्नदात्यांवर अभिमान आहे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही आहोत.

**पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता जमा**

# बोलताना मर्यादा पाळा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचा सल्ला

**नागपूर, २४ फेब्रुवारी**

विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उबाठातील संपर्क प्रमुख पदासाठी दोन मर्सिडीज गाड्या द्याव्या लागतात, असा आरोप केला; तर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आमचे पीए मुख्यमंत्रीच ठरवत असतात. आम्ही नामधारी आहोत, असे वादग्रस्त वक्तव्य केले. त्यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, साहित्य संमेलनात बोलताना मर्यादा पाळाव्या, असे म्हणत गोऱ्हे आणि कोकाटे यांचे कान टोचले. ते नागपुरात माध्यमांशी बोलत होते.

#### माणिकराव कोकाटेंना फटकारले



कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीसच आमचे पीए, ओएसडी ठरवतात. त्यामुळे आमच्या हातात काहीच राहिले नाही, असे सांगितले. त्यामुळे महायुतीमधील मंत्र्यांना काहीच अधिकार नसल्याची चर्चा सुरू झाली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी खरे काय ते सांगितले. पत्रकारांनी कोकाटे जे बोलले, त्या विषयी फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले, माणिकराव कोकाटेंना हे माहीत हवे की मंत्र्यांचे पीए, ओएसडी नेमण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांनाच असतो. मंत्र्यांनी प्रस्ताव पाठवायचा असतो. फिक्स असलेले लोक मंत्रालयात नको म्हणून माझ्याकडे आलेल्या १२५ जणांच्या प्रस्तावांपैकी मी १०९ जणांच्या नावांना मंजुरी दिली आहे. मी कॅबिनेटमध्ये सांगितले होते, तुम्हाला पाहिजे ती नावे पाठवा. पण फिक्स म्हणून ज्यांच्या नावांची चर्चा आहे, त्यांच्या नावांना मान्यता देणार नाही. कोणीही नाराज झाले, तर मी त्याला मान्यता देणार नाही. (वृत्तसंस्था)

#### नीलम गोऱ्हे यांचे कान टोचले



साहित्य संमेलनात बोलताना प्रत्येकानेच मर्यादा पाळल्या पाहिजे. पक्षीय पातळीवरील टीका टाळल्या पाहिजे, असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाव न घेता नीलम गोऱ्हे यांचे कान टोचले. फडणवीस यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. गोऱ्हे यांनी केलेल्या वक्तव्याविषयी विचारले असता फडणवीस म्हणाले की, नीलम गोऱ्हे ठाकरेंच्या पक्षात होत्या, मी काही त्यांच्या पक्षात नव्हतो. त्यामुळे त्यांच्या पक्षात काय चालायचे, ते नीलम गोऱ्हेच सांगू शकतील. मला त्याबद्दल माहिती नाही. मात्र, साहित्य संमेलनात बोलताना मर्यादा ठेवल्या पाहिजे. विशेषतः जे साहित्यिक आहेत, त्यांना असे वाटते की, राजकारणी लोकांनी आमच्या व्यासपीठावर येऊ नये. मग साहित्यिकांनी देखील पार्टी लाईन्सवर कमेंट करू नये. त्यांनीही मर्यादा पाळाव्या.

# ब्रिटीशकालीन प्रस्तावित पंढरपूर-लोणंद रेल्वेमार्गाचे पुन्हा होणार भूसंपादन

## सोलापुरातील ८०७ तर सातारा जिल्ह्यातील ११५ एकर जमिनीचा समावेश

### रेल्वे विभागाकडून आले जिल्हा प्रशासनाला पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी पंढरपूर-लोणंद या रेल्वेमार्गासाठी सोलापूर व सातारा या दोन जिल्ह्यातील एकूण ९२२ एकर जमीन भूसंपादीत करण्यात आली होती. मात्र तो रेल्वेमार्गच न झाल्याने ती जमीन सध्या शेतकरीच कसून खात आहेत. या रेल्वेमार्गासाठी १९२९ मध्ये संपादित करण्यात आलेली जमीन पुन्हा ताब्यात घेण्याचा प्रयत्न रेल्वे विभागाकडून सुरु करण्यात आला आहे. यासाठी संबंधित जमिनीचे सर्वेक्षण करण्याची मोहिमही विशेष पथकाकडून सुरु करण्यात आली आहे. इतकेच कायतर जिल्हा प्रशासनानेही त्यांना यासाठी सहकार्य करावे आणि ती जमीन हॅन्डओव्हर करावी, असा पत्रव्यवहार रेल्वे विभागाकडून करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

बार्शी लाईट रेल्वे कंपनीने १९२९ मध्ये पंढरपूर-लोणंद रेल्वेमार्गासाठी ९२२ एकर जमीन संपादीत केली होती. मात्र त्यावेळी हा प्रकल्प पूर्ण झाला नाही. १९४९ मध्ये दुष्काळी परिस्थितीत अन्नधान्य उत्पादन करण्यासाठी रेल्वेने ही जमीन महाराष्ट्र सरकारला एकसाली तत्वावर दिली. त्यामुळे रेल्वे विभागाने सॅटेलाईटद्वारे या जमिनीचा सर्व्हेही केला आहे. आता जिल्हा प्रशासनाने त्यांना या सर्व्हेद्वारे त्यांना त्यांची जागा मिळवून द्यायची आहे.



या कामासाठी रेल्वेचा एक कर्मचारी आणि जिल्हा प्रशासनातील २ कर्मचारी नेमले आहेत. रेल्वे विभागाने पंढरपूर-लोणंद हा ब्रॉडगेज लाईन म्हणून मंजूर केला आहे. त्यामुळे या मार्गाचे काम करण्यासाठी रेल्वे विभागाने पुन्हा महसूल खात्याकडे जमिनीची मागणी केली आहे. ही जमिन ताब्यात घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरु करण्याची मागणी रेल्वे विभागाकडून करण्यात आल्याने त्यानुसार महसूल खात्याकडून विशेष पथकाची नियुक्तीही करण्यात आली असून, त्यानुसार संबधित जमिनीचे अत्याधुनिक यंत्राने शोध घेउन ती जमिन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

#### केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आदेशामुळे गती



पुणे येथे शनिवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यातील रेल्वे विभागाची एक बैठक घेतली आणि या बैठकीत शहा यांनी या जमिनीचे संपादीत करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले असून, त्यानुसार मागील दोन दिवसापासून ब्रिटीशकालीन जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू केली आहे.

#### खालील गावातून होणार पुन्हा भूसंपादन



पंढरपूर तालुक्यातील इसबावी - १६.२० एकर वाखरी - ६०.५, भाळवणी - ६९.७७, भंडीशेगाव - ११३.३७, धोंडेवाडी - २८.७० तर माळशिरस तालुक्यातील गुरसाळे - २७.७५ एकर दहिगाव ४४.३, धर्मपूरी - ४०.३, नातेपुते - ५९.७५, पानीव-२६.२७, फॉडशिरस - ३०.३, मांडवे - ३८.५, विझोरी - १७.७, वेळापूर - ८०.६५ एकर अशी जमीन भूसंपादन होणार आहे.

**- मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर**

#### संपादित जमिनीत आढळले सीमांकनाचे दगड

रेल्वे विभागाच्या प्रस्तावानुसार प्रस्तावित १३ गावापैकी एका गावाची पाहणी महसूल खात्याने केली. या गावात प्रस्तावित जमिनीत तत्कालीन काळात रोक्लेला सीमांकन दगड असल्याचेही दिसून आले आहे. मात्र अनेक गावात या जमिनीवर अतिक्रमण असल्याची शक्यता महसूल खात्याने व्यक्त केली आहे.

## युक्रेनचे अध्यक्षपद सोडण्यास झेलेन्स्की तयार

**कीव** : रशिया युक्रेन युद्धाला तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. यावेळी युक्रेनचे राष्ट्र ाध्यक्ष झेले न्स्की म्हणाले की, शांतत ेसाठी ते काहीही करण यास तयार आहेत. राजी नामा दिल्याने शांतता येईल किंवा युक्रेनला नाटो सदस् यत्व मिळत असेल, तर ते राजी नामा देण्यास तयार आहेत. त्यांनी कीव धील पत्रपि षदेत सां गितले की, ट्रम्प कायमचे नाहीत, पण रशि ाचा धोका नेहमीच राहील. ट्रम्प सत्तेत असे यंत पुतिन आपल यावर हल्ला करणार नाही, याने आम ाला काही फरक पडत नाही. ट्रम्प आणि पुतिन गेल्या ंतरही आपल याला शांतता आणि कायम वरूपी हमी हवी आहे. (वृत्तसंस्था)

# चारा खाणारे शेतकरी कल्याण काय करणार ?

### पंतप्रधान मोदींचा लालूप्रसाद यादवांवर घणाघात

**भागलपूर, २४ फेब्रुवारी**

जनावरांसाठी असलेला चारा खाणारे देशातील शेतकऱ्यांच्या कल्याणाचा विचार करू शकत नाही, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्यावर केला.

नरेंद्र मोदी यांनी लालू यादव यांचे थेट नाव घेतले नसले, तरी त्यांचा इशारा चारा घोटाळ्याप्रकरणी त्यांना झालेल्या शिक्षेकडे होता. केंद्र आणि राज्यातील रालोआ सरकारने नेहमीच शेतकऱ्यांच्या कल्याणाला प्राधान्य दिले आहे, असे त्यांनी भागलपूर येथील सभेला संबोधित करताना सांगितले. हे सरकार सत्तेत नसते, तर माझ्या शेतकरी बांधव-भगिनींना पंतप्रधान किसान सन्मान निधीचा लाभ मिळाला नसता.

मागील सहा वर्षांच्या कालावधीत शेतकरी योजनांचा प्रत्येक पैसा हा थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला आहे. जनावरांचा चारा खाणारे देशातील शेतकऱ्यांच्या कल्याणाचा विचार करू शकत नाहीत. सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे देशातील कृषी निर्यात अलिकडील काही वर्षांत लक्षणीयरीत्या वाढली आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सरकारने कृषी क्षेत्रासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती देताना सांगितले. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगले दर मिळण्यास मदत मिळते. (वृत्तसंस्था)



भागलपूर येथील सभेत केंद्रीय मंत्री राजीव रंजन व चिराग पासवान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हार घालून स्वागत केले

# छत्तीसगडमध्ये दोन नक्षल्यांची शरणागती

**नारायणपूर, २४ फेब्रुवारी**

छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यात एकूण १० लाख रुपयांचे शिरावर बक्षीस असलेल्या दोन नक्षलवाद्यांनी सोमवारी शरणागती पत्करली, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

एका महिलेसह या दोन्ही नक्षलवाद्यांनी वरिष्ठ पोलिस आणि सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली. माओवादाच्या पोकळ विचारसरणीमुळे भ्रमनिराश झाल्याने तसेच संघटनेच्या वरिष्ठ कॅडर्सकडून भोळ्या आदिवासींच्या केल्या जाणाऱ्या शोषणाला कंटाळून माओवादाचा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

अबुझमाड परिसरात सरकारकडून केली जाणारी विकासकामे आणि आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांमुळे ते प्रभावित झाले होते, असे अधिकाऱ्याने सांगितले. जिल्ह्यातील विकासकामांमुळे लोकांचा सुरक्षा दलांवर आणि प्रशासनावरील विश्वास वाढला आहे.

सुदेन कोर्राम उर्फ जानकू आणि सरिता पोटावी उर्फ सरिता अशी शरण आलेल्यांची नावे आहेत. ते दोघेही महाराष्ट्र-मध्यप्रदेश आणि छत्तीसगड झोनमध्ये सक्रिय होते. एमएमसी झोनमध्ये मध्यप्रदेशातील बालाघाट, महाराष्ट्रातील गोंदिया आणि छत्तीसगडमधील राजनांदगाव, मुंगेली आणि कबिरधाम जिल्ह्यांचा समावेश आहे. या दोघांवरही प्रत्येकी पाच लाख रुपयांचे बक्षीस होते. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



## माळशिरस येथील विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल संघ द्वितीय

### खेलो स्टुडंट कप २०२५ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

**सदाशिवनगर, दि. २४ फेब्रुवारी-**

विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल माळशिरस चा टेनिस बॉल क्रिकेट संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. इंग्लिश मीडियम स्टुडन्ट स्पोर्ट असोसिएशन ऑफ इंडिया आयोजित खेलो स्टुडंट कप २०२५ बारामती येथे पार पडलेल्या टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांमध्ये जळगाव संघाला सेमी फायनल च्या सामन्यांमध्ये दहा विकेट ने पराभूत करून दक्ष पवार व अथर्व कुंभार यांच्या अष्टपैलू कामगिरीमुळे संघाने अंतिम फेरीत मजल मारली. अंतिम सामन्यात सासवड संघाविरुद्ध ४ षटकात जिंकण्यासाठी ४५ धावांची आवश्यकता असताना एक गडी बाद ४२ धावा जमवल्या व केवळ तीन धावांनी निसटता पराभव झाला. दक्ष पवार व अथर्व कुंभार या अष्टपैलू खेळाडूंनी पुन्हा एकदा सर्वोत्तम खेळाचे प्रदर्शन केले. त्याबद्दल त्यांनाही ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले व संघाला ही द्वितीय क्रमांकाचा करंडक मिळाला. टीम मध्ये असद शेख, शिवम धायगुडे, अभंग चोरमले, आयुष भोर, जय सरगर, श्रेयस टेळे , आदित्य जाधव, सार्थक गोरड, विश्वजीत जगताप इ. मुले होती. अनंत कुलकर्णी सर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश स्कूल माळशिरस चे क्रीडा शिक्षक संजय सपताळे सर यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष ड. माधव मिरासदार, कार्याध्यक्ष ड. मिलिंद दादा कुलकर्णी, कार्यवाह रामचंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले तसेच सर्व संचालक मंडळ विविध संस्थांचे पदाधिकारी, समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास गेजगे,इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या इनामदार मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले.



## 'कर्मयोगी'च्या विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीतून मिळविली औद्योगिक माहिती

**पंढरपूर, दि. २४ फेब्रुवारी-**

कर्मयोगी विद्यानिकेतन पंढरपूर प्रशालेतील इ. आठवीचे विद्यार्थी प्रशालेच्या प्राचार्या प्रियदर्शनी सरदेसाई यांच्या प्रेरणेतून अकलूज येथील शिवामृत दूध उद्योग समूह या ठिकाणी क्षेत्रभेटीस गेल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी तिथे तयार होणाऱ्या दूध व दुधापासून इतर पदार्थांची सर्व प्रक्रिया व निर्मिती कशी होते याविषयी माहिती मिळवून त्यांच्या मनामध्ये असणारे अनेक प्रश्न तेथील विभाग प्रमुखांना विचारून आपल्या मनातील शंकांना वाट मोकळी करून दिली. या विद्यार्थ्यांना प्रशालेतील भूगोल शिक्षक सुनील लांडगे यांनी क्षेत्रभेटीसाठी अकलूज या ठिकाणी नियोजन करून शिवामृत दूध संघाचे मॅनेजर यांची विद्यार्थ्यांशी भेट घडवून दिली. तसेच अकलूज या ठिकाणी असणारी शिवसृष्टी विद्यार्थ्यांनी पाहून ऐतिहासिक शिल्पकृती व भित्तिशिल्प पाहण्याचा आनंद घेतला. त्याचबरोबर वेळापूर या ठिकाणी असणारे प्राचीन हेमाडपंथी अर्धनारी नटेश्वर मंदिर व परिसर पाहिला. अर्धनारी नटेश्वर महादेवाचे दर्शन घेतल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना संस्कृत शिक्षक गिरीश खिस्ते यांनी या मंदिराविषयी माहिती सांगितली. तसेच अकलूज येथील निसर्गरम्य वातावरणरूपी आनंदी गणेश मंदिरामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी दर्शन घेऊन वनभोजनाचा आनंद लुटला. या सर्व विद्यार्थ्यांसमवेत त्यांचे वर्गशिक्षक सुधीर गोडसे व प्रमोद क्षिरसागर आणि महिला शिक्षिका स्वाती बडवे, तेहमिना कोरबू या देखील उपस्थित होत्या. या सर्व विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीसाठी प्रशालेच्या प्राचार्या प्रियदर्शिनी सरदेसाई यांनी शुभेच्छा दिल्या.




## बीएलडीई संस्थेच्या अध्यक्षपदी मंत्री एम. बी. पाटील

**विजयपूर, दि. २४ फेब्रुवारी-**

भारतीय लिंगायत विकास शैक्षणिक संस्थेचा २०२५-२०३० या कालावधीसाठी झालेल्या निवडणुकीत उद्योगमंत्री एम. बी. पाटील हे अध्यक्षपदी यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती निवडणूक अधिकारी अशोक एच. मलघाण यांनी दिली.

उद्योगमंत्री एम. बी. पाटील बी. एल. डी. ई. संस्थेचे अध्यक्षपदी पुन्हा एकदा बिनविरोध निवडून आले आहेत. तसेच, उपाध्यक्षपदी माजी विधान परिषद सदस्य जी. के. पाटील, मुख्य सचिव म्हणून विधान परिषद सदस्य सुनीलगौडा पाटील हे निवडले गेले आहेत. संस्थेचा कार्यकारिणी सदस्यपदांसाठी झालेल्या निवडणुकीत सर्व सदस्यांची बिनविरोध निवड झाली असून नवीन कार्यकारिणी सदस्य म्हणून माजी आमदार सोमनगौडा पाटील (सासनूर), अशोक जी. वारद (सिंदगी), संगप्पा गुरप्पा सज्जन (विजयपूर), सिद्धरामय्या निजगुणय्या मठ वकील (विजयपूर), अमगोंड मदुगौडा पाटील (बिज्जरगी), बापुगौडा भीमनगौडा पाटील (शेगुणशी), डॉ. अनिलकुमार बापुगौडा पाटील (लिंगदळी), कुमार चंद्रकांत देसाई (जैनापुर), कल्लनगौडा काशीरायगौडा पाटील (तोरवी), वीरनगौडा शिवनगौडा पाटील (बबलेश्वर), महेश बापुगौडा पाटील (कुमठे) आणि बसनगौडा मल्लनगौडा पाटील (राहुल) यांची बिनविरोध निवड झाली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी अशोक एच. मलघाण यांनी प्रसिध्दीपत्रात दिली.

# पुणे, कोल्हापूरच्या उच्च न्यायालय खंडपीठासाठी प्रयत्न करणार

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील : कोथरूड वकील भाजपा आघाडीतर्फे बार असोसिएसनच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे वकील आहेत. मुख्यमंत्र्यांना खंडपीठाच्या मागणी संदर्भातला सर्व विषयाचा अभ्यास आहे. त्यामुळे लवकरात लवकर मुख्यमंत्र्यांशी या विषयावर चर्चा करू व पुण्यासह कोल्हापूरलाही उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचे सर्किट बेंच सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच पुणे न्यायालयातील विविध समस्या संदर्भात न्यायालयामध्येही प्रत्यक्ष भेट देण्याचे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.



कोथरूड वकील भाजपा आघाडी व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील वकील टीम आयोजित पुणे बार असोसिएशन निवडणूक २०२५-२६ मधील निवडून आलेल्या नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारणीच्या सत्कार सम रंभात ते बोलत होते. यावेळी कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोव्याचे माजी अध्यक्ष डॉ. सुधाकर आव्हाड, मॅनेजिंग कौन्सिल शिक्षण प्रसारक मंडळी पुणेचे अध्यक्ष व ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सोहनलाल के. जैन उपस्थित होते. नगरसेविका मीताली कुलदीप सावळेकर, कोथरुड वकील आघाडी भाजपाचे अध्यक्ष ॲड. जयदीप पटवर्धन यांनी अलंकार हॉल, कर्वेनगर, पुणे येथे हा कार्यक्रम आयोजित केला होता.

यापसंगी ॲड.राजेंद्र दौंडकर, ॲड. पांडुरंग थोरवे, ॲड. अनिल नाईक, ॲड. प्रसाद कुलकर्णी, ॲड. तुकाराम कातुरे, ॲड. अर्चना कातुरे, ॲड. स्वाती काळभोर, ॲड. स्नेहल काळे, ॲड. आदित्य साखरे, ॲड. आशिष गवारे, ॲड. महेश काळभोर, ॲड. मिलिंद बाहुलीकर, ॲड. सुरेखा दाबी, ॲड. सोनम गवारे, ॲड. शरद तोडकरी, ॲड. अमितकुमार कोतमिरे यांच्यासह वकील उपस्थित होते.

यापसंगी ॲड. मोहना गद्रे यांची नोटरी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक ॲड. मिताली कुलदीप सावळेकर यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. अमितकुमार रमेश कोतमिरे यांनी केले. आभार ॲड. उमेश तारे यांनी मानले.

### ४८ वर्षांपासून पाठपुरावा सुरु

पुण्यात उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे यासाठी गेल्या ४८ वर्ष पुणे शहर व जिल्ह्यातील असंख्य वकील पाठपुरावा करत आहेत. या प्रलंबित खंडपीठाच्या मागणी संदर्भात निवेदन दिले आणि पुणे न्यायालयातील विविध समस्या बाबत न्यायालयाला भेट देण्याची मागणी चंद्रकांत पाटील यांच्याकडे ॲड. हेमंत झंजाड यांनी मागणी केली. यावेळी पाटील यांनी त्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

## पंढरीत निलम गोऱ्हे यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ फेब्रुवारी-**

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या आ. निलम गोऱ्हे यांनी जे विधान केले त्यांच्या विधानाची चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. यासाठी जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ, जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे यांच्या आदेशाने निलम गोऱ्हे यांच्या प्रतिमेस येथील तहसील कार्यालया समोर जोडे मारो आंदोलन करण्यात आले.



निवेदनात शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी नुकतेच आमचे श्रद्धास्थान आसणाऱ्या मातोश्रीवर तसेच उध्दव आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यावर बेछूट आरोप केले असून त्यांनी केलेल्या विधानाची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. त्यांनी केलेल्या विधाना मुळे तमाम शिवसैनिकांच्या भावन दुखावल्या गेल्या आहेत. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पंढरपूर शहर व तालुक्याच्या वतीने आम्ही जाहीर निषेध नोंदवित असून नीलम गोऱ्हे यांच्या विधानाची चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी तालुकाप्रमुख बंडू घोडके, काकासाहेब बुरांडे, उपतालुका प्रमुख उत्तम कराळे,नागेश रितुंड, युवराज गोमेवाडीकर, इंद्रजीत गोरे, नामदेव चव्हाण, किरण सुरवसे, जालिंदर शिंदे, मनोज शिंदे, बाळासाहेब देवकर, नितीन थिटे, विजय जाधव, नवनाथ रितुंड, अतिश खुळपे, अजिंक्य गोसाव, सचिन खुटाळे, भैय्या पवार, मंजूळा दोडमिशे, अनिता आसबे, रेहना भाभी, शरीफा पठाण, हनुमंत जाधव कुसुमडे पैलवान आदी उपस्थित होते.



## विशेष श्रमसंस्कार शिबिराचा दुसरा दिवस उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आगळगाव येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचा दुसरा दिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

दुसऱ्या दिवशी ग्रामपंचायतीमध्ये सकाळी संत गाडगेबाबा यांच्या जयंती उत्सव झाली. यावेळी सरपंच पुतळा गरड, कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. स्वयंसेवक उपस्थित होते. जयंतीनंतर, स्वयंसेवकांनी आपल्या कार्यविभागणीनुसार ग्राम स्वच्छता अभियान राबवले. तब्बल चार तास सर्व विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता करुन ग्रामस्थांसमोर आदर्श उभा केला. राष्ट्रीय सेवा योजना राज्याचे माजी समन्वयक डॉ. आर. आर. कोठावळेयांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, श्रमसंस्कार शिबिराचा उद्देश आणि युथ फॉर माय भारत - डिजीटल साक्षरता या संकल्पनेवर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा सकारात्मक उपयोग कसा करावा यावरही त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. डॉ. एम. ए. ढगे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन स्वयंसेविका पारुल यादव, प्रस्तावना तृप्ती राऊत व परिचय अंजली राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश देशमुख यांनी केले.

## पंढरपुरात ३२ किलो गांजासह १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ फेब्रुवारी-**

पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार व महिला पोलीस अंमलदार हे व्हिआयपी बंदोबस्ताचे अनुशंगाने रविवारी २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पंढरपुर शहरात पेट्रोलिंग करीत असताना त्यांना मंगळवेढा पंढरपुर जाणारे रोडवरील लिंगायत स्मशानभुमी समोर रोडवर अंधारे जागेत एक पांढरे रंगाची हयुंडाई कंपनीची (क्र. आय. २० गाडी नं. एम. एच. १३ बीएन ९६२२) ही गाडी रात्री संशयास्पद रितीने उभी असलेली दिसली. या गाडीचा संशय आलेने संशयित गाडीस पोलीस स्टाफ यांनी गराडा घातला व गाडी चालकास व त्याचे सोबत मागील सीटवर गाडीत आणखीन तीन महिला बसलेल्या दिसल्या.

सदर संशयितांकडे अधिकची चौकशी केली असता सदर गाडीच्या डिक्कीमध्ये काही सिलबंद पॉकेट दिसली. गाडीतील सिलबंद पाकीटे पाहता त्याचा उग्र व आंबट वास येत असलेने पांढरे रंगाची हयुंडाई कंपनीची (नं. आय २० गाडी नं एमएच १३ बीएन ९६२२) ही गाडीसह संशयित तीन महिला व एक पुरुष यांना पुढील चौकशीकामी पंढरपुर शहर पोलीस ठाणे येथे आणुन अधिकची चौकशी केली. त्यावेळी गाडीमध्ये तब्बल ३२.१३४ किलो ग्रॅम वजनाचा ६ लाख ४२ हजार ६८० रूपये किंमतीचा गांजा असलेने त्यांचे विरोधात पंढरपुर शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं १२७/२०२५ एनडीपीएस कायदा कलम २० (ब) ळळ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

या बरोबरच या कारवाईत अमोल हणमंत पवार,सुरेखा पवार ( दोघेही रा.गाताडे प्लॉट, पंढरपुर जि. सोलापुर ), मैनाबाई महादेव जाधव (रा. बेघर वस्ती, तुंगत ता.पंढरपुर जि. सोलापुर) आणि आक्काताई प्रल्हाद चव्हाण ( रा.मारूती मंदिरा शेजारी, देगाव ता. पंढरपुर,) असे ०३ महिला व ०१ पुरुष आरोपीसह एकुण ४ जणांना अटक करण्यात आली.

दरम्यान या संशयित आरोपींकडुन ६ लाख ४२ हजार ६८० रूपये किंमतीचा प्रतिबंधित गांजा तसेच ८ लाख रुपये किंमतीची एक पांढरे रंगाची हयुंडाई कंपनीची चार चाकी गाडी असा एकूण १४ लाख ४२ हजार ६८० रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले व शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली पंढरपुर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी सपोनि आशिष कांबळे, पोसई राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, कल्याण ढवणे, सुरज हेंबाडे, सिरमा गोडसे, सचिन हेंबाडे, प्रसाद औटी, पोलीस नाईक सचिन इंगळे, पोकॉ शहाजी मंडले, समाधान माने, बजरंग बिचकुले, निलेश कांबळे, मपोका रेश्मा सांगोलकर सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे. तपास सपोनि भारत वाघे हे करीत आहेत.

## पिंपळगाव येथे विविध कार्यक्रमाने शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२४ फेब्रुवारी-**

पांगरी बार्शी तालुक्यातील देशमुख पिंपळगाव येथे सालाबाद प्रमाणे यावर्षीही विविध कार्यक्रम ाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त करण्यात आले होते.

त्याचाच भाग म्हणून १७ फेब्रुवारी शिवश्री कुलदीप पाटील यांचे शिवचरित्र पर व्याख्यान दिनांक १८ फेब्रुवारी सुरेश दौलतराव देशमुख यांचे व्याख्यान व ह भ प विठ्ठल महाराज आसबे पंढरपूर यांचे कीर्तन १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पांगरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक एपीआय हेमंत काटकर यांच्या हस्ते पूजन श्री संग्राम देशमुख यांचे युवकांसाठी मार्गदर्शन व ह भ प महादेव महाराज बोधले यांचे कीर्तन २० फेब्रुवारी गावातून बाल वारकरी दिंडी व रात्री ह भ प अनिल महाराज महाकले आळंदी यांचे कीर्तन रात्र ह भ प रघुनाथ महाराज बिदरकर यांचे जुगलबंदी भारुड या कार्यक्रमाला सरपंच सदस्य पोलीस पाटील शिक्षक महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या सर्व कार्यक्रमाची रूपरेषा शिवश्री मिलिंद देशमुख यांनी केली होती.

# निलम गोऱ्हे यांच्या आरोपामुळे दोन्ही शिवसेनेत आगपाखड!

## लक्षवेधी लावण्यासाठी पैसे घेतात : संजय राऊत

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२४ फेब्रुवारी,**

दिल्लीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये विधान परिषदेच्या उपसभापती नीलम यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेबाबत केलेल्या आरोपाचे तीव्र पडसाद राज्यातील राजकारणात उमटत आहेत. सेनेच्या दोन्ही गटाकडून आरोप प्रत्यारोप करण्यात येत असून त्यातून एक प्रकारे पक्षाच्या कार्यपद्धती चव्हाट्यावर येत आहे

नीलम गोऱ्हे या निर्लज्ज, नमकहराम बाई आहेत , अशा शेलक्या शब्दात विधान परिषदेच्या उपसभापती गोऱ्हे यांच्यावर टीका करतानाच विधान परिषदेत लक्षवेधी लावण्यासाठी ,प्रश्न विचारणेसाठी त्या किती पैसे घेतात याची आपल्याकडे पुराव्यानिशी माहिती आहे, असा गंभीर आरोप ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी सोमवारी केला. तर उपनेत्या सुषमा अंधारे यांनी नीलम गोरे यांच्यावर मानहानीचा दावा दाखल करणार असल्याचे सांगितले.तर

नाशिकचे माजी महापौर विनायक पांडे यांनी २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देण्यासाठी गोऱ्हे यांनी आपल्याकडून पैसे घेतले होते, असा गौप्यस्फोट केला. ठाकरे गटाकडून त्यांच्याविरोधात राज्यभरात विविध ठिकाणी जोडे मारो आंदोलन करण्यात आले. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाकडून राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध करून टीकेला प्रत्युत्तर देण्यात आले. गोऱ्हे यांनी शनिवारी साहित्य संमेलनात असे घडलो आम्ही या कार्यक्रमात मुलाखत देताना, बाळासाहेब ठाकरे यांच्यानंतर शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळायचे, असा आरोप केला होता. त्याला खा. संजय राऊत यांनी सोमवारी पुन्हा जोरदार टीका केली. ते म्हणाले, निलम गोऱ्हे ही निर्लज्ज, नम कहराम बाई आहे. त्यांचे कालचे जे वक्तव्य आहे ती त्यांची विकृती आहे. ज्या घरात तुम्ही खाल्ले, चार वेळा आमदार झालात. मला आठवत आहे की, बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते ही कोण बाई आणली तुम्ही पक्षामध्ये? हे कुठलं ध्यान आपल्या पक्षात आणलेले आहे. ही आपल्याला आयुष्यभर शिव्या घालणार, असे त्यांनी म्हटले होते. तरी काही लोकांच्या मर्जी खातीर त्या आल्या . चार वेळा आमदार झाल्या आणि जाताना ताटामध्ये घाण करून गेल्या. त्या बाईचं विधान परिषदेतलं कर्तृत्व काय? हे जर समजून घ्यायचे असेल तर पुणे म हानगरपालिकेमध्ये अशोक हरनाळ नावाचे आमचे गटनेते होते. पुण्याचा प्लॅनिंग डीपी सुरू होता तेव्हा त्यांना धमक्या देऊन या बाईंनी कोणा कोणाच्या नावावर कोट्यावधी रुपये गोळा केले. त्यांची मुलाखत घ्या. मग हे मर्सिडीज प्रकरण काय आहे हे त्यांना कळेल. असे सांगून ते म्हणाले, नाशिकच्या विनायक पांडेंना उमेदवारी देण्यासाठी या बाईने किती पैसे घेतले होते? हे पांडेंना जाऊन विचारा. पांडेंनी त्या बाईकडून पैसे कसे वसूल केले? हे विनायक पांडे आणि अशोक हरनाळ यांची मुलाखत घेतल्यावर समजेल. अजून तुम्हाला दोन दिवसात आणखी नावे देईन. तुम्ही कोणावर थुंकत आहात मातोश्रीवर? काय तुमचे कर्तृत्व होते? तुम्हाला बाळासाहेबांनी आमदार केलेले नाही. अशा घाणेरड्या लोकांना बाळासाहेब आमदार करत नाहीत. एक संस्कार, संस्कृती असते. तुम्ही मातोश्रीच्या बाबतीत अशा प्रकारचे विधाने करतात. ज्यांनी तुम्हाला आमदार केले, उपसभापती केले. मराठी साहित्य महामंडळाने माफी मागायला पाहिजे. उषा तांबे वगैरे कोण आहे ते मला माहित नाही. त्यांचे साहित्यातले योगदान मला माहित नाही. आतापर्यंत आम्ही या विषयावर कधी बोललो नव्हतो. साहित्य आम्हाला कळते, आम्ही लिहिणारे माणसं आहोत. असे सांगून राऊत म्हणाले, गोऱ्हे म्हणाल्या की मी उषा तांबे यांना साहित्य संमेलनात माझा कार्यक्रम लावण्यासाठी ५० लाख दिले. मग त्या मर्सिडीजही देऊ शकतात. सभागृहात लक्षवेधी लावण्यासाठी आणि प्रश्न विचारायला देण्यासाठी ते किती पैसे घेतात, याची माहिती माझ्याकडे आहे. या सगळ्याचे पुरावे माझ्याकडे आहेत, असा दावा करून त्यांनी साहित्य संमेलनात जी राजकीय चिखलफेक झालीय, त्याची जबाबदारी शरद पवारसाहेबही झिडकारु शकत नाहीत, ते स्वागताध्यक्ष होते, पालक आहेत, जी राजकीय चिखलफेक झाली, ते सुद्धा तितकेच जबाबदार, त्याचा त्यांनी निषेध व्यक्त केला पाहिजे, अशी मागणी केली.

उपनेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या, नीलम गोरे यांना राज्यसभा किंवा मंत्रीपद हवे आहे म्हणून त्यांनी हे आरोप केले आहेत. मात्र त्या जबाबदार व्यक्ती असल्याने त्यांच्या विरोधात आम्ही मानहानीचा दावा दाखल करणार आहे. त्यांनी पुरावे द्यावेत, अन्यथा नाक घासून माफी मागितली पाहिजे. नाशिकचे माजी महापौर विनायक पांडे यांनी २०१४ मध्ये नीलम गोऱ्हे यांनी विधानसभेचे तिकिट देण्यासाठी आपल्याकडून पैसे घेतले होते मात्र उमेदवारी दुसऱ्याला देण्यात आली, असा आरोप केला आहे. ठाकरे गटाचे आ. देशमुख यांनी आपल्याकडे २५ लाखाची मागणी केली असल्याचे सांगितले तर पुण्याचे माजी नगरसेवक अशोक हरनाळ यांनी त्यांची सर्व कुंडली बाहेर काढण्याचा इशारा दिला.

### गोऱ्हेचे वक्तव्य मूर्खपणाचे : शरद पवार

साहित्य संमेलनामध्ये नीलम गोरे यांनी केलेले वक्तव्य मूर्खपणाचे आहे त्यांना असे बोलायचे होते तर साहित्य संमेलनात यायची आवश्यकता नव्हती, अशी टीका ज्येष्ठ नेते व साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी केली. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की त्यांच्या वक्तव्याबाबत संजयराव यांनी केलेल्या विधानाशी मी शंभर टक्के सहमत आहे नीलम गोऱ्हे यांनी मर्यादित कालावधीत चार पक्षात प्रवेश केला. त्यांना सेनेने ४ वेळा आमदार कसे केले, हे सर्वांना माहित आहे, साहित्य संमेलनामध्ये असे वक्तव्य करण्याची काही आवश्यकता नव्हती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार केल्याबाबत सिंदेगड ठाकरे गटाकडून झालेल्या पिके ला प्रत्युत्तर देताना ते म्हणाले अशा सत्काराची करण्याची परवानगी आवश्यक असल्यास यापुढे परवानगी घेत जाईल असा टोला मारून ते म्हणाले या सोहळ्यामध्ये एकूण १५ जणांना पुरस्कार देण्यात आला होता. मात्र केवळ एकनाथ शिंदे यांचे नाव दाखवण्यात आले ,बातमी आली हे योग्य नाही.

### माझ्यावर दहा हक्कभंग आणा : राऊत

नीलम गोऱ्हे यांच्यावर केलेल्या टीकेमुळे हक्कभंगाची कारवाई होऊ शकते. याबाबत विचारले असताना राऊत म्हणाले की, माझ्यावर दहा हक्क भंग दाखल करून देत, माझ्या विधानाबाबत ठाम असून मी नीलम गोऱ्हेबद्दल बोललेलो आहे. काल त्या उपसभापती म्हणून उद्धव साहेबांविषयी बोलल्या का? मला तुम्ही नियम सांगू नका. मी २४ वर्षापासून राज्यसभेत आहे. मला विधानसभा त्यांच्या आधीपासून माहित आहे. खरे म्हणजे महाराष्ट्राने या बाईवर हक्कभंग आणला पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.

### शिंदे गटाकडूनही प्रत्युत्तर

नीलम गोऱ्हे यांच्यावर ठाकरे गटाकडून झालेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. महिलेबाबत अशी भाषा वापरणाऱ्या संजय राऊतला लाज वाटते की नाही? त्यांना जोड्याने मारले पाहिजे, मराठवाड्यात ठाकरे गटाने अनेक ठिकाणी पैसे घेऊन तिकीट वाटप केले होते .जनतेने त्यांना त्याची जागा दाखवली आहे, अशी टीका समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांनी केली. तर खा .नरेंद्र मस्के यांनी नीलम गोऱ्हे या कधीच नाशिकच्या संपर्क प्रमुख नव्हत्या. विनायक पांडे यांना शिवसेनेतून काढून टाकण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी केलेले आरोप बिंनबुडाचे आहेत.

# ‘आपले सरकार’ सेवा केंद्रांविषयी क्युआर कोडद्वारे २३ तक्रारी दाखल

- तहसीलदारांकडे तक्रारी वर्ग; अहवाल येताच कारवाई : आरडीसी मनिषा कुंभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनानुसार शहर व जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांविषयी नागरिकांनी क्युआर कोडने विविध प्रकारच्या २३ तक्रारी दाखल केल्या आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी दिली. दरम्यान, या तक्रारींची सखोल चौकशी करण्यासाठी संबंधित तहसीलदारांकडे त्या तक्रारी वर्ग केल्या असून, त्यांचे अहवाल येताच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ठरलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क घेणे, दाखले देण्यास विलंब लावणे, केंद्राचा पत्ता एका ठिकाणी असताना ते दुसऱ्याच ठिकाणी सुरू करणे, केंद्र चालकाची वर्तणूक आदी प्रकारच्या तक्रारींचा समावेश आहे. या सर्व तक्रारी त्या त्या तहसीलदारांकडे चौकशीसाठी पाठविण्यात आल्या असून, तहसीलदारांच्या चौकशी अहवालानंतर आपले सरकार सेवा केंद्र चालकांना कारवाईची नोटीस देण्यात येणार आहे. केंद्र चालक दोषी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाणार असल्याचे कुंभार यांनी सांगितले.

जिल्ह्यातील नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लागणारे विविध प्रकारचे दाखले, उतारे व अन्य प्रमाणपत्रे ऑनलाइन पध्दतीने आपले सरकार सेवा केंद्र अथवा सेतू कार्यालयातून दिले जातात. परंतु बऱ्याचदा आपले सरकार केंद्र अथवा सेतू कार्यालयात विविध दाखले, उतारे व प्रमाणपत्रे काढण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना मध्यस्थ व्यक्तींकडून शासनाने विहित केलेल्या रकमेपेक्षा अधिकच्या रक्कमेची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.

त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सर्वसामान्य नागरिकांना केंद्र चालक किंवा मध्यस्थ व्यक्ती (एजंट) यांच्याकडून पैशाची मागणी होऊ नये अथवा झाल्यास तत्काळ तक्रार करता यावी यासाठी प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्र, सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यूआर कोड उपलब्ध करून दिले आहेत. याशिवाय जिल्हाधिकारी, तहसील व प्रांत कार्यालयात दर्शनी भागात क्यूआर कोड लावण्यात आलेला आहे. नागरिकांनी हा कोड स्कॅन करून त्यावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यावरील तक्रारीची तत्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार असल्याचे कुंभार यांनी म्हटले आहे.

# जिल्हा प्रशासनाकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही
# सोलापुरात विमानसेवा चालू होईना?

- स्थानिक लोकप्रतिनिधी थकले; पुन्हा मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे
- स्थानिक उद्योजक, जानकार नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सोलापूरच्या नूतनीकरण केलेल्या विमानतळाचे लोकार्पण देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले तेव्हापासून सोलापूरकर विमानसेवेच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या ६ महिन्यात विविध प्रकारची परवानगी, डीजीसीएच्या मागणीनुसार सर्व कागदपत्रांची पूर्तता सोलापूर जिल्हा प्रशासनाने केली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांनी जोर लावूनही विमानसेवा चालू होईना? याबाबत सोलापूर विकास मंच पदाधिकारी, स्थानिकच्या जाणकार नागरिक आणि उद्योजकांतून आश्चर्य व्यक्त होत आहे. यामुळे पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर विमानसेवा चालू करण्यासाठी लक्ष घालावे, अशी मागणी स्थानिक उद्योजक, काही




जाणकार नागरिकांतून होत आहे.

गेल्या ६ महिन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी विमानतळ व्यवस्थापकांच्या पाठीमागे लागून विमानसेवा चालू करण्यासाठी आवश्यक त्या सर्व त्रुटी गतीने दूर केल्या होत्या. या त्रुटी दूर करण्यासाठी जवळपास ६५ कोटी रूपयांचा खर्चही झाला होता. इतकेच नाहीतर रंगरंगोटी, विविध प्रकारच्या आवश्यक त्या परवानग्याही काढल्या होत्या. आता फक्त ४७ सीटांच्या विमानसेवेऐवजी ७२ सीटांची विमानसेवा चालू करण्यासाठी डीजीसीएच्या केवळ एका परवान्याची गरज आहे. त्याही परवानगीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, स्थानिक आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह सोलापूर विचार मंचच्या काही सदस्यांनी मोठ्या प्रमाणात पाठपुरावाही केल्याची माहिती मिळत आहे. इतकेच कायतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागरी विमान केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याबरोबर सोलापूर विमानसेवा गतीने सुरू करण्यासाठी गेल्या १५ दिवसांपूर्वी चर्चा केली होती. तरीही सोलापुरात विमानसेवा चालू करण्यासाठी अजून कसल्याच हालचाली दिसून येत नाहीत. यामुळे स्थानिक उद्योजक, सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सकडून आणि सोलापूर विचार मंचकडून नाराजी व्यक्त होत आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुन्हा लक्ष घालावे!

स्थानिक जिल्हा प्रशासन आणि काही स्थानिक लोकप्रतिनिधींनी सोलापुरात विमानसेवा चालू करण्यासाठी पाठपुरावा करूनही यश मिळत नसल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच सोलापुरात विमानसेवा चालू करण्यासाठी पुन्हा एकदा लक्ष घालून संबंधित यंत्रणेला आदेश द्यावेत, जी एक परवानगी राहिली असेल त्याची पूर्तता डीजीसीएकडून करून घ्यावी आणि सोलापूरकरांना विमानसेवा चालू करून द्यावी, अशी अपेक्षा जाणकार नागरिकांची आहे.

### ७२ सीटरचा रिसर्टिफिकेशन परवाना मिळताच विमानसेवा सुरू

डीजीसीए ने ४८ सीटर विमानासाठी परवाना दिला होता पण आता ७२ सीटरच्या विमानासाठी रिसर्टिफिकेशन परवाना मिळण्यासाठी प्रलंबित आहे. यासाठी लागणारे जे जे कागदपत्रे आहेत ते डिसेंबरमध्येच सोलापूर विमानतळ प्रशासनाने डीजीसीएकडे दिले आहेत. त्यावर कार्यवाही प्रलंबित असून, लवकरात लवकर डीजीसीएकडून रिसर्टिफिकेशन परवाना मिळेल आणि आता लवकरच ही विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर**

# शिरसाटांनी बंगला कसा मिळवला? : दानवे

**मुंबई, दि.२४ फेब्रुवारी-**

संजय शिरसाट हे स्वतः गुत्तेदारी करतात, ते मुंबईतील ७२व्या मजल्यावर राहतात. छत्रपती संभाजीनगरमध्ये २२ हजार स्क्वेअर फुटाचा बंगला त्यांनी कसा मिळवला याचे उत्तर द्यावे, असे आव्हान विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिले.शिरसाट यांनी संजय राऊत व ठाकरे गटावर केलेल्या आरोपाला प्रत्युत्तर देताना ते म्हणाले की, . माझ्या घरासमोर असलेल्या गाड्या या माझ्याच नावावर आहेत, तुमच्या घराच्या मागे असलेले जेसीबी, कोट्यवधी किमतीच्या गाड्या या कशा कमावल्या याचं उत्तर त्यांनी द्यावे.

# सदर बझार पोलिसांकडून घरफोडीचा गुन्हा २४ तासात उघड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

सदर बझार पोलिसांनी साडेचार लाख रुपयांच्या घरफोडीचा गुन्हा २४ तासात उघडकीस आणून १०० टक्के मुद्देमाल हस्तगत केला.

जिबरान उर्फ शोएब युन्नूस शेख (वय २०, रा. मौलाली चौक, केशव नगर झोपडपट्टी, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. सदर बझार पोलिस ठाण्यात गुरनं. १४९/२०२५ हा घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात चोरट्याने ४ लाख ४६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली होती. या गुन्ह्याचा तपास करताना सदर बझार पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी क्रिडा संकुलाच्या पाठीमागे असलेल्या लेप्रसी कॉलनी येथून जिबरान शेख यास पांढऱ्या रंगाच्या पिशवीसह ताब्यात घेतले. पोलिसांनी शेख याच्याकडे चौकशी केली असता पिशवीमध्ये चोरीचे दागिने व रोख रक्कम मिळून आली.

पोलिसांनी शेख याच्याकडून रोख दीड लाख रुपये, १५ ग्रॅमची सोन्याची चैन, १० ग्रॅमची सोन्याची चैन, ७ ग्रॅमची सोन्याची अंगठी, ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी असा ४ लाख ४६ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. ही कामगिरी पोलिस निरीक्षक अजित लकडे, भालचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे, सहायक फौजदार औदुंबर आटुळे, हवालदार संतोष पापडे, शहाजहान मुलाणी, सागर सरतापे, राजेश चव्हाण, सागर गुंड, अनमोल लट्टे, उमेश चव्हाण, हणमंत पुजारी, सोमनाथ सुरवसे यांनी केली.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२४ फेब्रुवारी-**

अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने मोहीम हाती घेतली आहे. महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाने भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या १८ लाकडी होड्या जेसीबी व कटरच्या साह्याने पूर्णपणे नष्ट करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.




पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पंढरपूर शहरा नजीकच्या चंद्रभागा नदी पात्रामध्ये पंढरपूर - इसबावी दरम्यान असणाऱ्या ओढ्यामधील अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या ८ लाकडी होड्या जेसीबी च्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या. तसेच शिरढोण - इसबावी दरम्यान असणाऱ्या ओढ्यामधील अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या १० लाकडी होड्या कट्टर च्या साह्याने कट करून पूर्णपणे नष्ट करण्यात आल्या.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, रिगन चव्हाण. ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, प्रमोद खंडागळे, महेशकुमार सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे रविकिरण लोखंडे, पि पि कोईगडे, पीयूष भोसले, दिगंबर डोईफोडे व पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

# प्रधानमंत्री आवासचे सोलापूर जिल्ह्यात ६२ हजार ९७१ लाभार्थी

## अक्कलकोट तालुक्यात सर्वाधिक तर उत्तर तालुक्यात सर्वात कमी लाभार्थी

**तभा वृत्तसेवा ।अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

देशात बेघर व गरीब कुटुंबांना स्वताचे हक्काचे घर नसल्यामुळे अनेक संकटांना सामोरे जावे लागते. त्यामुळे गरीब कुटुंबाना त्यांच्या स्वप्नातील हक्काचे घर मिळावे व देशात कुणीही स्वताच्या घरापासून वंचित राहू नये, म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत टप्पा दोनमध्ये राज्यात वीस लाख घरकुलांना मंजूरी दिली. राज्यातील मंजूर घरकुलाची संख्या देशात सर्वाधिक आहे.

मोदी सरकारने महाराष्ट्रातील बेघरांना हक्काचे घर मिळावे, म्हणून प्रथमच मोठया प्रमाणात घरकुल मंजूर केले. राज्यातील घरकुल मंजूरमध्ये सोलापूर जिल्ह्यानेही बाजी मारली असून वीस लाख घरकुलांपैकी ६२ हजार ९७१ घरकुल मंजूर करण्यात यश मिळविले आहे. जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या पाठपुराव्यामुळे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना प्रथमच मोठया प्रमाणात घर उपलब्ध



होणार आहेत. त्यामुळे प्रशासनाचे कौतुक करण्यात येत आहे.

शनिवारी २२ फेब्रुवारी रोजी पुणे येथील बालेवाडी येथे राज्य सरकारच्या वतीने पंतप्रधान आवास योजना टप्पा दोनचे मंजुरी पत्र व पहिला हप्ता वितरित करण्यात आला. दहा लाख घरकुल लाभार्थ्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यानेही मोठी मजल मारली असल्याने ६२ हजार ९७१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा केल्यामुळे मोठे उद्दिष्ट गाठणे शक्य झाले आहे . जिल्ह्यातील ११ तालुक्यांमधील ६२ हजार ९७१पैकी अक्कलकोट तालुक्याने सर्वाधिक ७६१६ घरकुल मंजूर करून घेण्यात यश मिळविले आहे. तर सर्वात कमी घरकुल उत्तर सोलापूर तालुक्यात २०१५ मंजूर झाले आहेत. अक्कलकोट तालुक्यानंतर माढा ७०२८, माळशिरस ६६९२, पंढरपूर ६५८३ , बार्शी ६०६२, मोहोळ ५८६१, करमाळा ५६७२, सांगोला ५२८३, मंगळवेढा ५१५५, दक्षिण सोलापूर ४९६३ घरकुल मंजूर करण्यात आली आहेत. सोलापूर जिल्ह्याने प्रथमच नऊ वर्षातील सर्वाधिक घरकुल उद्दीष्ट गाठले आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. सुधिर ठोंबरे यांनी जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यातील लाभार्थ्यांना सर्वाधिक लाभ मिळवून दिला आहे. आवास योजनेचा पहिला हप्ता डीबीटीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले असुन लाभार्थ्यांनी त्वरित बांधकाम सुरू करण्याचे आवाहन प्रकल्प संचालक डॉ. ठोंबरे यांनी केला आहे. शिवाय बांधकामासाठी लागणारे वाळूसह इतर अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाकडून सहकार्य करण्याची ग्वाहीही लाभार्थ्यांना दिली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांचे मनोबल वाढले असून अनेक गावात बांधकाम सुरू करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे या टप्प्यात घरांपासून वंचित असणाऱ्या लोकांसाठी एप्रिलनंतर पुन्हा सर्वेक्षण करून लाभार्थी निवडण्यात येणार असल्याने घरापासून वंचित गरीबांचे घरांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

### जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमुळे निवारा...

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा केला. त्यामुळे ग्रामपंचायतीनेही लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून व सर्वेक्षण यादीचे पाठपुरावा केला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रयत्नांमुळे बेघरांना स्वप्नातील हक्काचा निवारा मिळणार आहे.

### लाभार्थ्यांनी अनुदानाचे लाभ घ्यावेत

लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या पाठपुराव्यामुळे पंतप्रधान आवास योजनेत सर्वाधिक उद्दीष्ट गाठण्यात यश मिळाले आहे. या योजनेतील लाभार्थी विविध कारणांमुळे घरांचे बांधकाम अर्धवट ठेवतात. म्हणून लाभार्थ्यांनी बांधकाम पूर्ण करून संपूर्ण अनुदानाचा लाभ घ्यावे.

**-डॉ. सुधिर ठोंबरे,**
**प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर**

### आवास योजनेत सर्वाधिक उद्दीष्ट

२०१६ ते २०२३ या कालावधीत केवळ ४४ हजार घरकुल मंजूर झाले होते. मात्र यावर्षी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा परीषद प्रशासनामुळे केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी योजनेत ६२९७१ लाभार्थी मंजूर करून मोठे उद्दीष्ट गाठले आहे. लाभार्थ्यांनी नियमानुसार मुदतीत घरांचे बांधकाम पूर्ण करावे.

**-कुलदीप जंगम,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर**

# महापालिकांमधील एलबीटी विभाग बंद करण्याचा शासनाने घेतला निर्णय

## महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीच्या पाठपुराव्याला यश : बाठिया

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

सर्व नगरपालिका व महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर (एल.बी. टी.) विभाग बंद करण्याचा निर्णय आज शासनाने जाहिर केला आहे. या बाबत महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीने प्रयत्न केले असून कृती समितीच्या प्रयत्नाला आज यश आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया यांनी दिली.

महाराष्ट्र राज्यातील व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज ॲन्ड ॲग्रीकल्चर (मुंबई), फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्रिज ॲन्ड ट्रेड (मुंबई), दि ग्रेन, राईस ॲन्ड ऑईल सीडस् मर्चेंटस् असोसिएशन (मुंबई) व






दि पूना मर्चेंटस् चेंबर (पुणे) या महाराष्ट्रातील पाच शिखर संस्थांच्या महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या बरोबर दि. २६ ऑगस्ट २०२४ रोजी एका मिटिंगमध्ये व्यापाऱ्यांच्या अनेक प्रश्नांवर चर्चा केली होती. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने आज निर्णय जाहिर केला आहे.

अनेक नगरपालिका व महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कर विभाग अद्याप पर्यंत कार्यरत होता. स्थानिक संस्था कर बंद होऊन बरेच दिवस झाल्यामुळे सदरचा विभाग बंद करावा, अशी व्यवसायीकांच्या वतीने कृती समितीतर्फे मागणी करण्यात आली होती. त्या मागणीस अनुसरुन शासनाने सर्व नगरपालिका व महानगरपालिकांमधील स्थानिक संस्था कर (एल.बी. टी.) विभाग बंद करण्याचा निर्णय आज शासनाने जाहिर केला आहे. या बाबत कृती समितीने प्रयत्न केले असून कृती समितीच्या प्रयत्नाला आज यश आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

# मंगळवेढ्यात बेकायदा होर्डिंग्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

मंगळवेढा दि.२४ फेब्रुवारी येथील असणाऱ्या मुख्य रस्त्यावर नगरपालिकेच्या मालकीच्या असणाऱ्या जागेत संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदा होर्डिंग्ज लावले आहेत. याची चौकशी करून नगरपालिकेच्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी जनतेतून होत आहे. याबाबत अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून सांगून देखील याची दखल घेत नाहीत. या उलट होर्डिंग्ज लावणाऱ्याना पाठीशी घालत आहेत.

मंगळवेढा शहरात मुख्य रस्त्यावर असणाऱ्या नगरपालिकेच्या मालकीच्या जागेत अनेकवेळा अनाधिकृत होर्डिंग्ज संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने लावण्यात येतात. याबाबत संबंधित अधिकार्याकडे




तक्रार करून सुद्धा या बाबीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे. तरी बेकायदेशीर होर्डिंग लावणाऱ्यावर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावी अशी जनतेतून मागणी होत आहे. नगरपालिकेने कारवाई न केल्यास सदर घटनेबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घ्यावी लागणार आहे.

# तुरीचा दर घसरला; शेतकऱ्यांनी बाजारातून काढला काढता पाय !

- तुरीचा दर वाढत नसल्याने शेतकरी बाजारात तूर विकण्यास देताहेत नकार
- तुरीला किमान ८ हजार रुपयांचा दर मिळण्याची केली जातीय अपेक्षा



**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

| गत वर्षात तुरीला मिळालेला भाव (प्रतवारी नुसार ) | |
|---|---|
| लाल तूर | ११,००० ते १२,००० रू प्रती क्विंटल |
| पांढरी तूर | ९,००० ते १०,००० रू प्रती क्विंटल |
| **यंदाच्या वर्षात तुरीला मिळालेला भाव (प्रतवारी नुसार )** | |
| लाल तूर | ७,५०० रू प्रती क्विंटल |
| पांढरी तूर | ६,८०० रू प्रती क्विंटल |
| शासनाचा हमीभाव दर | ७,५०० |

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसह जिल्ह्यातील अन्य बाजार समितींमध्ये तुरीची आवक वाढल्याने शेतकऱ्यांना शासनाच्या हमीभावापेक्षा कमी दरात तूर विकण्याची वेळ आली आहे. हमीभावापेक्षा कमी दराने तूर विकत असताना देखील शासनाकडून खरेदी प्रक्रिया वेळेत सुरू न झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात यावर्षी ९१ हजार हेक्टरांवर तूर लागवड झाली होती. सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने उत्पादनही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. उत्पादन वाढल्याने तुरीची आवक वाढली आहे. परिणामी, बाजारातील तुरीचे भाव कमी झाले आहेत. बाजारात मुबलक प्रमाणात लाल तूर उपलब्ध आहे. त्यामुळे सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात १० हजार रुपये प्रतिक्विंटल असलेले दर आता ७ हजारांवर आलेले दिसत आहेत. सद्या तुरीचे दर कमीत कमी ६८५० रुपये प्रती क्विंटल, तर सर्व साधारण आणि जास्तीत जास्त दर हा ७५०० रुपये प्रति क्विंटल इतका मिळत आहे. पूर्वीपेक्षा सद्यपरिस्थितीत दर कमी झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोरील चिंता वाढली आहे. सरकारने ७७५० रुपयांचा हमीभाव जाहीर केला आहे. प्रत्यक्षात बाजारात ७ हजारांपेक्षा कमी दर असतानाही खरेदी सुरू झालेली नाही.

गतवर्षी तुरीला प्रतिक्विंटल अकरा ते साडेबारा हजार रुपयांपर्यंत दर मिळाला होता. त्यामुळे महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य प्रदेश राज्यात तुरीची लागवड वाढली होती. यंदा तुरीला पोषक हवामान मिळाल्याने उत्पादनात ही चांगली वाढ झाली आहे. त्यामुळे बाजारात आवक वाढून दर कमी झाले आहेत.

### सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीचा दर कमी

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तुरीचे दर कमी झाले आहेत. लाल तुरीला सर्वसाधारणपणे ७५०० प्रति क्विंटल इतका दर मिळत आहे. तर कमीत कमी ६८५० हा दर मिळत आहे. हमीभावापेक्षा दर कमी असल्याने बाजारात शेतमाल आणण्यास शेतकरी तयार नाही. तुरीला किमान ८,००० रुपये प्रति क्विंटल इतका दर अपेक्षित आहे.

**- बळी कादे, तूर उत्पादक शेतकरी**

### तुरीचे उत्पादन वाढल्याने दर कमी

सोलापूर जिल्ह्यात तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. परंतु तुरीची प्रतवारी घसरली आहे. त्याचा परिणाम दरावर झाला आहे. त्यामुळे लाल व पांढरी अशा दोन्ही तुरीचे दर घसरले आहेत. गत वर्षात तुरीला दहा हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. परंतु आता दरामध्ये घसरण झालेली आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपला शेतमाल शेतात किंवा घरातच ठेवलेला आहे.

**- बसवराज इटकळे, भुसार अडत व्यापारी कृषी उत्पन्न बाजार समिती**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### सराईत गुन्हेगार आदित्य हिवरे दोन वर्षांसाठी तडीपार

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

जुना देगाव नाका परिसरातील साठे पाटील वस्तीमधील सराईत गुन्हेगार आदित्य हिवरे यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. आदित्य प्रकाश हिवरे (वय २०, रा. साठे पाटील वस्ती, जुना देगाव नाका, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्याचे नाव आहे. आदित्य हिवरे याच्याविरुध्द सन २०२४ मध्ये नागरीकांना दमदाटी व मारहाण करून दुखापत करणे, चोरी करणे, घरफोडी करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याच्यावर तडीपारीची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सलगर वस्ती पोलिसांकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजुरी देत हिवरे यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीनंतर हिवरे यास पिंपरी चिंचवड येथे सोडण्यात आलेले आहे.





### बोगस बांधकाम प्रकरणी संबंधितांवर चौकशीअंती कारवाई करा

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

**प्रहार जनशक्ती पक्षातर्फे निवेदन**

बोगस बांधकाम प्रकरणी संबंधित बिल्डर, अभियंता, अधिकाऱ्यांवर चौकशीअंती कारवाई करावी या मागणीचे निवेदन प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर शहरातील विविध ठिकाणी टोलेजंग इमारती बोगस बांधकाम परवानगी घेऊन उभे केल्याने महापालिकेने अनेक इमारतींची चौकशी करून महापालिकेतील काही अधिकारी व इंजिनियर यांच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई केली. फक्त २ ते ४ लोकांवर कारवाई करून हे चालणार नाही. तर यातील महापालिकेतील आणखी काही अधिकारी व कर्मचारी या प्रकरणात सामील आहेत का ? याची चौकशी करावी. बिल्डर्स व डेव्हलपर्स यांनी फ्लॅट विकून पुर्ण पैसे घेऊन फ्लॅटधारकांना अजून फ्लॅट खरेदी दिलेले नाही किंवा ते भविष्यात खरेदी होण्याची शक्यताही खूप कमी आहे. बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणातील इमारतींना वापर परवाना देणे हे कायद्याच्या चौकटीत बसणार नाही. खरेदी-विक्री करणे शक्य होणार नाही म्हणून संबंधित बिल्डर्स व डेव्हलपर्स यांच्यावर सुध्दा गुन्हे दाखल करून फ्लॅटधारकांबाबत योग्य तो कायदेशीर विचार करावा, अशी मागणी केली आहे. निवेदन देतेवेळी जिल्हा संपर्कप्रमुख जमीर शेख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### सकाळी थंडीची हुडहुडी तर भरदुपारी उन्हाचे चटके; तापमानात होतेय चढ-उतार

**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरातील तापमानात गेल्या काही दिवसांपासून चढ उतार पहावयास मिळत आहे. सकाळी थंडी अन दुपारी कडक उन्हाचे चटके बसत असून, या आठवड्यात देखील तसेच हवामान राहणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला. दरम्यान, शहरात सकाळी व रात्री गारठा, तर दुपारी उन्हाचा चटका, अशीच स्थिती सध्या राज्यात अनुभवायला मिळत आहे. सोलापुरात रविवारी (दि. २३) सर्वाधिक कमाल तापमान ३७.९ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले. तर आज सोमवारी (दि. २४) कमाल तापमान ३७.६ अंश सेल्सिअस इतके नोंदवले गेले होते. तर किमान तापमान १९.१ इतके राहिले. गेल्या काही दिवसांपासून राज्यासह शहर जिल्ह्यामध्ये सातत्याने दुपारचे तापमान वाढत आहे, तर सकाळी आणि रात्रीचे तापमान घसरत आहे. त्यामुळे सकाळी गारवा आणि दुपारी उष्णता असे विचित्र तापमान नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. राज्यातील कमाल तापमानात आता दिवसेंदिवस वाढ झालेली जाणवत आहे.

#### नागरिकांनी काळजी घ्यावी : डॉ. सुभाष भांगे

सकाळी गारवा दुपारी कडक उन्हाचे चटके तर पुन्हा संध्याकाळी गारवा पसरत असल्याने हे तापमान नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. अशा अवस्थेत नागरिकांनी आपल्या शरीराची काळजी घ्यावी. उन्हामध्ये जाताना टोपी, हात रुमाल, सुती कापडांचा वापर करणे गरजेचे आहे. शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहण्यासाठी भरपूर प्रमाणात पाणी प्यावे. उन्हातून घरी आल्यानंतर काही काळ आराम केल्यानंतर पाणी प्यावे, असे डॉ. सुभाष भांगे यांनी सांगितले.

## अवैध वाळू, गौण खनिज उत्खननावर कारवाई

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

अवैध वाळू व गौण खनिजाच्या उत्खननावर आळा घालण्यासाठी व दोषींवर तत्काळ कठोर कारवाई व्हावी या दृष्टीने जिल्ह्यातील वाळूघाट व खदानींवर पाळत ठेवण्याचे आदेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी डिपीसीमध्ये दिल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद चांगलेच ॲक्शन मोडवर आले आहेत. यामुळे जिल्ह्यातील अवैध वाळू, गौण खनिजाच्या उत्खननावर त्यांनी पथकांची नेमणूक केली आहे आणि या टीमच्या हाती कोणीही लागल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २४) पत्रकारांशी संवाद साधताना दिला.

#### दगड, मुरूम, वाळू वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर जीपीएस

दगड, मुरूम व वाळू वाहतून करणाऱ्या सर्वच वाहनांना आता जीपीएस प्रणाली लावण्यात येणार असून, यामुळे जिल्ह्यात सुरू असलेले अवैध गौण उत्खनन, अवैध वाळू वाहतूक करणारी वाहने समजून येतील आणि पुढील कारवाईची दिशाही सापडेल. यावरही वॉच ठेवण्यासाठी तहसीलदारांच्या मार्गदर्शनाखाली पथकांची नेमणूक करण्यात येणार असल्याचेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

काही जिल्ह्यात तर अवैध वाळू व गौण खनिजाच्या उत्खननावर आळा घालण्यासाठी व दोषींवर तत्काळ कठोर कारवाई व्हावी या दृष्टीने त्या-त्या जिल्ह्यातील वाळूघाट व खदानींवर ड्रोनद्वारे पाळत ठेवण्यात येत आहे. एकंदरीत, संपूर्ण राज्यातच वाळू आणि गौण खनिजांचे धोरण कडक केले असल्याचे दिसून येत आहे. या ड्रोनद्वारे प्रत्यक्ष जागेवर फुटेज आपल्या हाती लागल्यामुळे गुन्हेगारांवर सप्रमाण गुन्हा सिद्ध करण्यासह अशा कारवाईतील पारदर्शकता वाढीस लागेल. याच बरोबर शासनाच्या कारवाई पथकाला सुरक्षित राहून यामार्फत पुरावे गोळा करता येतील. सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रगत सेन्सर आणि कॅमेऱ्यांनी सुसज्ज ड्रोनद्वारे वेळीच कारवाई करणे शक्य होईल. सध्या आपल्या जिल्ह्यात अजून ड्रोनची सुविधा नसली तरी जिल्हा प्रशासनातील तलाठी भाऊसाहेब, तहसीलदार, प्रांतांना याबाबत कडक सुचना देवून अवैध वाळू आणि गौण खनिजाचे अती उत्खननावर आळा बसविण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## शहरातील अंतर्गत रस्ते विशेष स्वच्छता मोहीम सुरुच

### एकूण ८४ अंतर्गत रस्ते केले चकाचक

### सुमारे ६८० टन कचरा केला संकलित

### आमदार व नागरिकांनी केले मोहिमेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा | किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या संकल्पनेतून मुख्य रस्त्यांची स्वच्छता मोहीम यशस्वी केल्यानंतर दि. १० ते २२ फेब्रुवारी दरम्यान सोलापूर महापालिका प्रशासनाने शहरातील अंतर्गत रस्ते साफसफाई करण्यासाठी स्वच्छता मोहीम फत्ते केली. या अंतर्गत एकूण ८४ अंतर्गत रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. सुमारे ६८० टन कचरा संकलित केला. यामुळे आमदारांसह नागरिक व संस्था पदाधिकाऱ्यांनी या मोहिमेचे उत्स्फूर्त स्वागत केले.

महापालिकेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम २.० मध्ये दि. १० ते २२ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ६.३० ते ११ वाजेपर्यंत विविध अंतर्गत रस्त्यांची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेचा शनिवारी समारोप झाला. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडांची छाटणी केल्याने रस्ते प्रशस्त झाले. रस्त्यावरील सर्व मुता-या स्वच्छ केल्याने दुर्गंधी गायब झाल्याचे समाधानकारक चित्र पाहायला मिळाले.अनावश्यक साहित्य, कचरा, प्लास्टिक उचलण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे विविध ठिकाणी ऑन द स्पॉट उपस्थित राहत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह दिसून आला होता. महापालिकेचे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे माध्यमातून आरोग्य निरीक्षक आणि कर्मचारी पथकांकडून नियोजनपूर्वक स्वच्छतेची कामे करण्यात आली. या मोहिमेत ४९ आरोग्य निरीक्षक सुमारे २६७ कर्मचारी कार्यरत होते.

या मोहिमेंतर्गत आता शहरातील अंतर्गत सुमारे अंतर्गत ४८ रस्ते आणि ३६ नगरातील रस्त्यांची असे ८४ रस्त्यांची साफसफाई करण्यात आली. यामुळे अंतर्गत शहरातील रस्ते ही आता अधिक स्वच्छ आणि सुंदर त्याचबरोबर चकाचक दिसून येत आहेत. स्वच्छता मोहीम रस्त्यावरील सर्व मुता-या स्वच्छ करण्यात आल्या. डिव्हायडर, रस्त्याच्या कडेची सर्व अनावश्यक साहित्य, कचरा, प्लास्टिक उचलण्यात आले आहे.

उद्यान विभागाने रस्त्याच्या कडेची झाडांची छाटणी करून घेतली. रस्त्यांचे, चौकांचे नावाचे बोर्ड पाण्याने स्वच्छ करण्यात आले. त्यावरील अनाधिकृत स्टिकर्स, जाहिराती काढण्यात आले.



#### स्वच्छ - सुंदर सोलापूरसाठी नागरिकांनी सहकार्य करावे

विविध स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून महापालिका प्रशासनाने शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांची साफसफाई केली आहे. सोलापूर शहर स्वच्छ - सुंदर आणि नेटके ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे. स्वच्छतेचे कर्तव्य आणि जबाबदारी नागरिकांनी पार पाडावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केले आहे.

#### तीन स्मशानभूमींची केली साफसफाई

या मोहिमेअंतर्गतच शहरातील झोन क्रमांक तीन मधील अक्कलकोट रोडवरील हिंदू स्मशानभूमी, मुस्लिम कब्रस्तान आणि पद्मशाली स्मशानभूमी या तीन स्मशानभूमीची साफसफाई करण्यात आली.

मनोरमा परिवार अंतर्गत

**सोलापूर जिल्हा मनोरमा सखी महिला नागरी सह. पतसंस्था मर्या., सोलापूर**

अंकुर रोपवाटीकेसमोर कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर

६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर

९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

सौ. येरगुंटे स्वाती सिद्राम, चेअरमन (मो.७९७२६४९८७१)

सौ. जयश्री भोरे, व्यवस्थापिका (मो. ९९२१९११०१०)

## सोलापुरात ४ मार्च रोजी विभागीय हातमाग कापड स्पर्धेचे आयोजन

### प्रथम विजेत्यास मिळणार २५ हजाराचे पारितोषिक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

राज्यातील हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्याकरिता व विणकारांनी उत्पादित केलेल्या उत्कृष्ट वाणाला सम्मान मिळावा, या दृष्टीकोनातून विभागीय हातमाग कापड स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, या स्पर्धेतील प्रथम विजेत्यास मिळणार २५ हजाराचे पारितोषिक मिळणार आहे.

प्रादेशिक उपआयुक्त, वस्रोद्योग, सोलापूर यांचे अधिपत्याखाली सोलापूर जिल्ह्यासह सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या जिल्ह्यातील प्राथमिक हातमाग विणकर सहकारी संस्था/स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरासाठी हातमाग कापड स्पर्धा दिनांक ४ मार्च २०२५ रोजी स. १०.०० वाजता सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघ, अक्कलकोट रोड एम.आय. डी.सी. सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर कापड स्पर्धेकरीता हातमाग विणकरांनी हातमागावर विणलेल्या पारंपारीक व अपारंपारीक डिझाईनच्या अतिउत्कृष्ट नाविण्यपुर्ण व कलात्मक वाणाची प्रदर्शीत वाणामधून निवड करुन उत्कृष्ट वाणास प्रोत्साहनपर बक्षिस देवून हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. विभागीय हातमाग कापड स्पर्धा करीता पारंपारीक (साड्या, लुगडी, लुंगी, खणावळी, धोतरे इत्यादी) व अपारंपारीक (टॉवेल, चादरी, शर्टींग, कोटींग पडद्याचे कापड, मफलर, शॉल, वॉल हॅगींग इत्यादी) वाणाचे हातमाग विणकरांनी त्यांनी हातमागावर उत्पादन केलेले कलात्मक व नाविण्यपुर्ण वाण दिनांक ०३ मार्च २०२५ पर्यंत प्रादेशिक उपआयुक्त, वस्रोद्योग, सोलापूर, सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी पत संस्था इमारत, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर येथे स्विकारण्यात येतील. आयोजित केलेल्या स्पर्धेत विभागीय हातमाग कापड निवड समिती मार्फत उत्कृष्ट वाणाची निवड करण्यात येणार आहे. विभागीय हातमाग कापड स्पर्धेत सहभाग घेवून प्रदर्शीत केलेल्या वाणामधून प्रथम पारितोषीक रु. २५ हजार, द्वितीय २० हजार व तृतिय बक्षिस १५ हजार प्रमाणे पारितोषीक जाहिर करुन हातमाग विणकरांना समारंभाच्या वेळी प्रशस्तिपत्रकासह देण्यात येणार आहे. तरी सदर विभागीय हातमाग स्पर्धेकरीता हातमाग सहकारी संस्था, स्वयंसहाय्यता गट व खाजगी क्षेत्रातील हातमाग विणकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्रादेशिक उपआयुक्त, वस्रोद्योग उज्वला पळसकर यांनी केले आहे.

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १३/२०२५
नि.नं. ५

**बार्शी येथील मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**कु. आर्या बिपीन रंगदाळ,**
वय - १२ वर्षे, धंदा - शिक्षण, अ.पा.क. पिता
**बिपीन शिवाजी रंगदाळ,**
वय - ५७ वर्षे, धंदा - शेती, व्यापार,
रा. मनगिरे मळा, बार्शी, ता. बाशी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरूध्द

**महाराष्ट्र शासन**
**(याचे समन्स मा. जिल्हाधिकारी साहेब सोलापूर यांचेवर बजावणेत यावे)** — **सा.वाला**

**अर्ज - गाडीयनशिप ॲक्ट १९५६ व कलम २९ गाडीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्टप्रमाणे**

ज्याअर्थी, डि. सोलापूर सब. डि. ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठो) येथील जमीन गट नं ६२८/२ पैकी लिहून देणार नं. १ व २ यांचे नावे ७/१२ हक्कपत्रकी दाखल असलेले क्षेत्र खालीलप्रमाणे -

अर्जदार यांचे नावे असलेले ०० हे ४२ आर पो.ख. ०० हे ०२.५० आर आकार ०० रू. ११ पैसे सदर बागायत जमीन आतील सर्व झाड झुडूप तदंगभूत वस्तुसह व वहीवाटीचे हक्कासह. सदर जमीन यातील अज्ञान अर्जदार आर्या बिपीन रंगदाळ याचे ७/१२ हक्क पत्रकी दाखल असून सदर जमीन विक्री करणेकामी परवानगी मिळणेबाबत हा या अर्जाचा विषय आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन आतील तदंगभूत वस्तूसह.

अर्ज कलम १ मधील मिळकतीतील अज्ञान अर्जदार याचे मालकीची मिळकत निलेश शरद वखारिया व इतर यांना विक्री करणेस मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरूरीचे आहे त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

त्याअर्थी, वरील मिळकतीचे अज्ञान अर्जदाराचे मालकी हक्काबाबत अगर विक्री हस्तांतरण करणेचे व्यवहारास कोणाची काहीही हरकत अडथळा असल्यास त्यांनी सदर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाचे आत किंवा पुढील नेमली ता. २५/०३/२०२५ रोजी सदर अर्जाचे कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर त्यांचे तर्फे मुखत्यार, वकील यांनी हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. मुदतीत कोणाची हरकत अडथळा न आल्यास कोणाचे काहीही म्हणणे नाही असे समजून अर्जाप्रमाणे अर्जदाराची मागणी मंजूर करणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण दिले. ता. २४/०२/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी

### सावधानतेची जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील येथील तमाम जनतेस या सावधानतेच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः डि. व सब डि. सोलापूर, ता. अक्कलकोट येथील मौजे बोरोटी (बु) ग्रामपंचायत हद्दीतील जिरायत शेतजमीन मिळकत यांसी गट नं. ११५ याचे एकूण क्षेत्र ६ हेक्टर, ४५ आर यापैकी पोटखराब ० हे. १३ आर इतके यांसी आकार ११ रू.८७ पैसे यांसी चतुः सिमा पुर्वेस गटनं. ११६, पश्चिमेस गटनं. १११, ११२, उत्तरेस-गट नं. ११४, दक्षिणेस-गटनं. ९१, येणेप्रमाणे, जिरायतशेतजमिन मिळकत व त्यातील तदंगभूतवस्तु व कब्जेवहिवाटीचे हक्कासह. वर नमूद जिरायत शेतजमीनीबाबत में. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे येथील अर्ज क्रं. SH/II/५/२०१८ अन्वये न्यायप्रविष्ठ आहे व तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी सदर प्रकरणात जसे आहे तसेठेवण्याचे आदेश पारित केलेले आहे. सदर नमूद शेतजमिनीबाबत देवसिंग रामचंद्र चव्हाण व इतर विरूध्द मैनोदिन सैपन बाबरे यांच्यातील वाद न्यायप्रविष्ठ असून याबाबत कोणीही कसल्याप्रकारचे करार-मदार, खरेदी, कुलमुख्यत्यार, गहाण, टाच अथवा इतर कोणत्याही कराराने कोणताही व्यवहार करू नये. वर नमूद शेतजमिनीबाबत व्यवहार केल्यास त्यास व्यवहार तथा इत्तर कोणताही करार करणारी व्यक्ती तथा इतर कोणीही व्यवहार केल्यास ते सर्वस्वी स्वतः जबाबदार राहतील व तसेच तद्नंतर होणा-या परिणामास तथा आर्थिक फसवणूकीस सर्वस्वी स्वतः जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली.

तारीख. २४/०२/२०२५

सही/-
ॲड. संतोष सुखदेव राठोड
बी.ए.एल., एल.बी
ऑफीस नं.४ ग्लोबल हाईट्स,
दिवाणी कोर्टासमोर, मो.नं. ७८७५८५६६००
अशिलातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर प्रसिध्दीकरण

**जागा/जमीनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे**

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर पोट तुकडी ता. माळशिरस पैकी मौजे- यशवंत नगर हद्दीतील व माळशिरस तालुक्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः- डि. सोलापूर सब. डि. माळशिरस व ता. माळशिरस पैकी मौजे- यशवंत नगर हद्दीतील बिनशेती खुला प्लॉट याचा सर्व्हे नं. ९१/१/अ/१/ब/१/ब/२/अ यापैकी एन.ए. प्लॉट नं. ४४ पैकी उत्तरेचा प्लॉट याचे क्षेत्रफळ १४१.६५ चौ.मी. आहे. यांसी चतुःसिमा पुर्वेस-प्लॉट नं. ४१ व ४६, दक्षिणेस प्लॉट नं. ४४ पैकी उर्वरीत प्लॉट, पश्चिमेस कॉलनी रोड व उत्तरेस- ओढा, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक प्लॉट, या मिळकतीबाबतचे खरेदीखताचे दस्त १) दस्त क्र ६५९/२००८ २) दस्त क्र. ९२७/२०११ व ३) दस्त क्र. ११८७/२०१९ हे रजिस्टर खरेदीखताचे दस्त आमचे अशिलांकडुन अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहेत, ते अद्यापपर्यत आढळून आलेले नाहीत.

तद्नंतर सदर मिळकती संदर्भाने मिळकती हस्तांतरणाचे कोणतेही व्यवहार केलेले नव्हते व नाहीत अथवा व्यवहाराबाबत कोणाकडुनही इसार म्हणुन रक्कम देखील स्विकारलेली नाही. तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतलेले नाही. तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचे खरेदीदस्त मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये, सदरचे दस्त मिळाल्यास खालील पत्यावर आणुन दयावेत. सदर दस्ताचे अनुषंगाने कुणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये, कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास या जाहीर प्रसिध्दीकरणापासून ०८ दिवसाचे आत खालील पत्यावर कळवावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे.

दि. २४/०२/२०२५

सही/-
ॲड. सुप्रिया शेखर गुंडपाटील
धर्माधिकारी प्लॉट, गाडेगांव रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर मो. नं.
९५११८२१३१४

### MAHATRANSCO — E-Enquiry call Notice

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-enquiry process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **E-Enquiry No. EE/400kV/R.S/DN/LBT/T-58 Dtd. 17.02.2024**, **Particulars:** Work of double jumpering work (Bypass Jump) by providing and fixing of boltless C Type wedge connector to the 400kV Parli- Karjat Ckt-I & Ckt-II line. **Estimated cost:** Rs. **9,96,372/-** **Enquiry cost in Rs.** 100.00+ 18% GST i.e. Rs. 118/-, **Sale period:** 17.02.2025 to 27.02.2025, **Last Date of Submission:** 27.02.2025 up to 18:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 28.02.2025 at 11:00 Hrs (If possible). **Contact person:** Executive Engineer -8554995020. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Executive Engineer, 400 kV R.S. Div Lamboti.**

FORM NO. 3.
[See Regulation 15(2)(a)]

### कर्ज वसुली न्यायाधिकरण पुणे

युनिट नं.३०७ ते ३१० तिसरा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग, शिवाजी नगर, पुणे - ४११००५

केस नं. OA/162/2023

अधिनियमाच्या कलम १९ च्या उप कलम (४) अंतर्गत समन्स, कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियम, १९९३ च्या नियम ५ च्या उप कलम नियम (2A) सह वाचा

Exh. No. : 10700

**विदर्भ कोकण ग्रामीण बँक**
विरुध्द
**अभिजीत पवार**

प्रति,
**१) अभिजीत पवार**
**~~डी/डब्लू~~/एस/ओ- श्री. बाळासाहेब**
**रुम नं. ४२, बिल्डींग नं. ९, अरविंद धाम, पोलीस वसाहत, मुरारजी पेठ, सोलापूर महाराष्ट्र - ४१३००१**

**समन्स**

जेथे, OA/162/2023 हे **२०/०१/२०२५** रोजी माननीय पीठासीन अधिकारी / निबंधक यांच्यासमोर, सूचीबुध्द केले गेले होते.

तर या माननीय न्यायाधिकरणाला अधिनियमाच्या कलम १९(४) अन्वये (OA) तुमच्या विरुध्द **रु. ३७,१५,६३५.१६/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या उक्त अर्जावर समन्स / सूचना जारी करण्यात येत आहे. (अर्जासह कागदपत्रांच्या प्रती इ. संलग्न)

अधिनियमाच्या कलम १९ च्या उपकलम (४) नुसार, तुम्हाला, प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

i) समन्स बजावल्यापासून तीस दिवसांच्या आत कारणे दाखविणे, ज्यासाठी प्रार्थना करण्यात आलेली मदत मंजूर केली जाऊ नये.

ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करणे,

iii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक 3A अंतर्गत उघड केलेल्या सुरक्षित मालमत्तेचे व्यवहार किंवा विलेव्हाट लावण्यापासून तुम्हाला प्रतिबंधित केले आहे, प्रलंबित सुनावणी आणि मालमत्ता संलग्न करण्याच्या अर्जाची विलेव्हाट लावणे.

iv) तुम्ही जी मालमत्ता तारण ठेवलेली आहे आणि/किंवा मुळ अर्जाचा अनुक्रमांक 3A अंतर्गत निर्दिष्ठ किंवा उघड केलेले इतर मालमत्ता न्यायाधिकरण्याच्या पुर्व परवानगी शिवाय विक्री, भाडेपट्ट्यानी किंवा इतर मार्गाने हस्तांतरीत करु शकणार नाही.

v) सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तेच्या विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नासाठी तुम्ही जबाबदार असाल आणि अशा मालमत्तेवर सुरक्षा व्याज असलेल्या बँक किंवा वित्तीय संस्थांकडे ठेवलेल्या खात्यात विक्रीची रक्कम जमा करा.

तुम्हाला अर्जदाराला दिलेल्या प्रतीसह लिखित विधान दाखल करण्याचे आणि **दि. १६/०४/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता रजिस्ट्रार** समोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसे न केल्यास तुमच्या अनुउपस्थितीत अर्जावर सुनावणी होऊन निर्णय घेतला जाईल.

दि. ०३/०२/२०२५ रोजी माझ्या समक्ष न्यायाधिकरणाच्या शिक्क्या सहीत

(मज़कूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरावा)

शिक्का

सही/-
समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी
निबंधक
कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे

### केनरा बैंक Canara Bank

A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**ARM BRANCH :** Circle Office Building, Balmatta Road, Mangaluru - 575001.
**(A GOVERNMENT OF INDIA UNDERTAKING)**

**विक्री सूचना**

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना, नियम 8 (6) आणि 9(1) च्या तरतुदीसह वाचलेली सुरक्षा हिताच्या नियम 6 (2) सह वाचली आहे (अंमलबजावणी 20 मध्ये सर्वसाधारणपणे दिली आहे) विशेषतः कर्जदार (ते) आणि जामीनदारांना की खाली वर्णन केलेल्या जंगम आणि जंगम मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/शुल्क आकारल्या आहेत, ज्याचा भौतिक ताबा कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, जसे आहे तसे, जसे आहे तसे आणि जे काही आहे ते 120 रुपये 120 वर वर विकले जाईल. 31/01/2025 रोजी 35,76,14,309.59 (रुपये पस्तीस कोटी सत्तर लाख चौदा हजार तीनशे नऊ आणि एकोणपन्नास पैसे फक्त) देयता तसेच 01/02/2025 पासून पुढील व्याज, करारानुसार देय शुल्क आणि घटना तारखेपर्यंतचे इतर देय व्याज दर इ. कॅनरा बँकेची A.R.M. शाखा, सर्कल ऑफिस बिल्डिंग, मंगळुरु 575001 मे. शिवप्रियदर्शिनी कास्टिंग्स प्रायव्हेट लि., त्याचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अण्णासाहेब सदाशिव चौगुला यांनी प्रतिनिधित्व केले. ज्ञात भारांसह जंगम आणि स्थावर मालमत्तेचे तपशील आणि संपूर्ण वर्णन, जर असेल तर.

| Lot No. | मालमत्तेचे वर्णन | राखिव किंमत | बयाणा रक्कम ठेव |
|---|---|---|---|
| **मालमत्ता १: मालमत्ताधारकाचे नाव : M/s. शिवप्रियदर्शिनी एंटरप्रायझेस** | | | |
| Lot 1. | Sy मध्ये स्थित होनागा औद्योगिक क्षेत्राचा भूखंड क्रमांक 48- म्हणून ओळखला जाणारा तो सर्व जमिनीचा तुकडा. नं. 536 होनागा गाव, काकती होबळी, बेळगाव तालुका, बेळगाव जिल्हा, ज्यामध्ये जाहिरात-मापनानुसार 2121.89 चौ.मी. 03/11/1997 कर्नाटक इंडस्ट्रियल एरिया डेव्हलपमेंट बोर्ड, बंगळुरू) सर्व सोयीस्कर मार्ग आणि त्यासंबंधीच्या पाण्याच्या अधिकारांसह. सीमा:- पूर्व - भूखंड क्रमांक 48/बी; पश्चिम - 60 रुंद रस्ता; उत्तर - भूखंड क्रमांक 47/-2; दक्षिण - भूखंड क्रमांक 49/A. | रु. 3,49,25,000.00 | रु. 34,92,500.00 |
| Lot 2: | होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, काकती तालुका आणि जिल्हा बेळगावी येथे स्थित RS No.536 मधील भूखंड क्रमांक 48, KIDB, बेळगाव येथील औद्योगिक इमारतीमध्ये स्थापित उपकरणे, प्लांट आणि यंत्रसामग्रीचा समावेश असलेली सर्व गृहित जंगम मालमत्ता. | रु. 46,90,000.00 | रु. 4,69,000.00 |
| लॉट क्रमांक 1 ची विक्री फक्त लॉट 2 च्या आयटमच्या बाबतीत वेगळी वैध बोली प्राप्त झाली आणि यशस्वी झाली तरच केली जाईल. तथापि, पक्ष लॉट - 1 आणि लॉट - 2 दोन्हीसाठी बोली लावू शकतात आणि दोन्ही आयटम घेऊ शकतात. | | | |
| **मालमत्ता २ : मालमत्ताधारकाचे नाव : M/s. शुभम इंडस्ट्रीज (भागीदारी फर्म)** | | | |
| 2 | मालमत्ता (पुढील भाग कार्यालय आणि मागील बाजूस औद्योगिक शेड/गोदाम यांचा समावेश आहे) भूखंड क्रमांक 49/ (भाग) R.S.No.536 900 चौरस मीटर आकाराचा, KIDB होनागा औद्योगिक क्षेत्र होनागा, बेळगावी येथे स्थित आहे, तेथे सर्व सोयीसुविधा आणि पाण्याचे उपभोग्य अधिकार आहेत. सीमा:- पूर्व - भूखंड क्रमांक 49/बी; पश्चिम - 60 रुंद रस्ता; उत्तर - भूखंड क्रमांक 49 चा भाग; दक्षिण - भूखंड क्रमांक 50/A. | रु. 1,16,73,000.00 | रु. 11,67,300.00 |
| **मालमत्ता ३ : मालमत्ता मालकाचे नाव: M/s. शिवप्रियदर्शनी कास्टिंग प्रा. लि** | | | |
| 3 | KIDB औद्योगिक क्षेत्र, होनागा, बेळगाव येथील R.S.No.536 मध्ये, भूखंड क्रमांक 49-A (उत्तर भाग) असलेल्या भूखंडाचा समावेश असलेला मालमत्तेचा सर्व भाग आणि पार्सल, तेथे सर्व सोयीस्कर हक्क आणि पाण्याचे प. सीमा: पूर्व: भूखंड क्रमांक 49/B; पश्चिम: रस्ता क्रमांक 4 म्हणजेच 60 फूट रुंद रस्ता; उत्तर: भूखंड क्रमांक 48/E; दक्षिण: भूखंड क्रमांक 49 (भाग) म्हणजे 49/A (भाग) | रु. 79,58,000.00 | रु. 7,95,800.00 |

बयाणा रक्कम जमा 10/03/2025 रोजी किंवा त्यापूर्वी संध्याकाळी 5.00 वाजता जमा केली जाईल. वरील मालमत्तेवर आमच्या माहितीनुसार लिलाव खरेदीदाराच्या शीर्षकाला प्रभावित करणारे कोणतेही भार नाहीत.

अधिक तपशिलांसाठी श्रीमती गीता यशोधर, अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम शाखा, सर्कल ऑफिस बिल्डिंग, मंगळुरु यांच्याशी संपर्क साधा (फोन क्रमांक 0824-2863367, 9741157746, 0824-2440469) ई-मेल आयडी: cb6296@canarabank.com or/s PSB Alliance Pvt. Ltd), (संपर्क नं. 7046612345/ 6354910172/ 8291220220/ 9892219848/ 8160205051, ईमेल : support.BAANKNET@psballiance.com).

दिनांक : 21/02/2025
ठिकाण : मंगळूरु

सही/-
अधिकृत अधिकारी, कॅनरा बँक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### इंडियन वेल्समध्ये जोकोविच खेळणार



**इंडियन वेल्स :** दुखापतींच्या चिंतेनंतर नोवाक जोकोविच इंडियन वेल्स टेनिस स्पर्धेत खेळणार असल्याची समाज माध्यमावर पुष्टी झाली आह. कारण सर्बियाचा स्टार खेळाडू दुखापतींच्या चिंतेतून दूर होऊन १०० व्या एकेरी विजेतेपद जिंकण्यास उत्सुक आहे. २४ वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता गत महिन्यात अॅलेक्झांडर झ्वेरेव्हविरुद्धच्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या उपांत्य फेरीतून पायाच्या दुखापतीमुळे निवृत्त झाला आणि गत आठवड्यात कतार ओपनच्या पहिल्या फेरीत पराभूत झाला. मी दोहामध्ये वेदनेशिवाय खेळलो, परंतु आपल्या निराशाजनक कामगिरीमुळे चाहत्यांमध्ये चिंता निर्माण झाली की मी दक्षिण कॅलिफोर्निया स्पर्धेत खेळणार नाही, असे ३७ वर्षीय जोकोविचने सांगितले. एक दिग्गज वाळवंटात परतला," असे स्पर्धेच्या संयोजकांनीएक्सवर लिहिले, ज्यामुळे जोकोविच खेळेल की नाही याबद्दलच्या चिंता दूर झाल्या. पाच वेळा इंडियन वेल्स विजेता जोकोविच जिमी कॉनर्स (१०९) आणि रॉजर फेडरर (१०३) यांच्यानंतर व्यावसायिक टेनिस युगात १०० एकेरी विजेतेपदे जिंकणारा तिसरा खेळाडू होण्याचे ध्येय ठेवेल. तथापि, महिला गटात वाईल्ड कार्डवर प्रवेश मिळाल्यानंतरही स्टार टेनिसपटू व्हीनस विल्यम्स या स्पर्धेत भाग घेणार नाही. काही वैयक्तिक कारणांमुळे मी स्पर्धेत भाग घेऊ शकणार नाही, असे व्हीनसने म्हटले आहे.

### रशियाविरुद्धच्या लढतीसाठी महिला फुटबॉल संघ सज्ज

**मानवगत :** येथे सुरू असलेल्या पिंक लेडीज युथ चषक फुटबपॉल स्पर्धेत पहिले दोन सामने जिंकल्यानंतर भारतीय २० वर्षांखालील महिला संघ मंगळवारी येथील एमिर्हान स्पोर्ट्स सेंटर येथे तिसऱ्या आणि शेवटच्या मैत्रीपूर्ण सामन्यात रशियाविरुद्ध लढणार आहे. या सामन्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला आहे. शनिवारी, भारतीय संघाने १४ खेळाडू असलेल्या हाँगकाँग संघावर १-० असा संघर्षपूर्ण विजय मिळवला, गत आठवड्यातही भारताने जॉर्डन २० वर्षांखालील संघाविरुद्ध २-१ असा विजय मिळवला आहे. हाँगकाँगविरुद्धच्या पूर्वार्धात आमचा संघ चांगला खेळला, मात्र उत्तरार्धात चेंडूवर ताबा व दबाव या दोन्ही बाबतीत संघर्ष करावा लागला, असे भारताचे मुख्य प्रशिक्षक जोआकिम अॅलेक्झांडरसन म्हणाले. सिबानी देवीने भारताला आघाडी मिळवून दिल्यानंतर, अधिक अनुभवी हाँगकाँग संघाने बरोबरीच्या गोलच्या शोधात दबाव वाढवला, त्यामुळे भारतीय संघाच्या बचावात काही चिंताग्रस्त क्षण आले. परंतु त्यांनी धैर्याने प्रयत्न केले.

### श्रीधरन श्रीराम सीएसकेचे सहायक गोलंदाजी प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२५ च्या हंगामापूर्वी माजी भारतीय क्रिकेटपटू श्रीधरन् श्रीराम यांची पाच वेळच्या विजेत्या चेन्नई सुपर किंग्जच्या (सीएसके) सहायक गोलंदाजी प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. फ्रॅन्चायझीने सोमवारी आपल्या समाज माध्यमावर ही घोषणा केली. सध्या चॅम्पियन्स चषकासाठी स्टार स्पोर्ट्स तामिळ समालोचन संघात ब्रॉडकास्टर म्हणून काम करणारे श्रीराम हे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग, फलंदाजी प्रशिक्षक मायकेल हसी, गोलंदाजी सल्लागार एरिक सिमन्स, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षक राजीव कुमार यांच्यासह सीएसके सपोर्ट स्टाफमध्ये सहभागी होतील. सीएसकेमध्ये, श्रीराम रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा आणि श्रेयस गोपाळ सारख्या आपल्या अनुभवी फिरकी गोलंदाजांसोबत काम करतील, तर दीपक हुडा अर्धवेळ ऑफ-स्पिन गोलंदाजी करण्यास सक्षम असेल. आयपीएल २०२५ साठी सीएसकेकडे अफगाणिस्तानचा मनगटी फिरकी गोलंदाज नूर अहमद आणि न्यूझीलंडचा डावखुरा फिरकी गोलंदाज रचिन रवींद्र यांचाही समावेश आहे.



### सांगलीतील राज्य बुद्धिबळ स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा गुंटूकचा सत्कार

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सुरज स्पोर्ट्स क्लब व नूतन बुद्धिबळ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या २१ वे सुरज राज्य जलद बुद्धिबळ स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटुक यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यात दोघांनी १४ वर्षाखालील वयोगटात भाग घेऊन कोणत्याही सरावाशिवाय ८ पैकी ४ राऊंड जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केले. या यशाबद्दल त्यांना प्रमाणपत्र देऊन यथोचित गौरविण्यात आले. यावेळी साईश्वर व श्रद्धा यांचा धावण्याच्या स्पर्धेत केलेल्या उत्तुंग कामगिरीची दखल घेत विशेष सत्कार करण्यात आले.

# टीम इंडिया आणि न्यूझीलंड संघाचे सेमीफायनलचे तिकीट पक्के!

## पाकिस्तान आणि बांगलादेश स्पर्धेतून बाहेर

**रावळपिंडी, दि. २३ फेब्रुवारी -**

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये न्यूझीलंडने सलग दुसरा विजय मिळवला आहे. सोमवारी त्यांनी बांगलादेशचा ५ विकेट्सने पराभव केला. या निकालामुळे बांगलादेश आणि पाकिस्तान संघ स्पर्धेतून बाहेर पडले. न्यूझीलंड आणि भारताचे संघ अ गटातून उपांत्य फेरीत पोहोचले.

रावळपिंडी क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशने ५० षटकांत ९ गडी गमावून २३६ धावा केल्या. न्यूझीलंडने ४६.१ षटकांत ५ गडी गमावून लक्ष्याचा पाठलाग केला. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्रने १०५ चेंडूत ११२ धावांची खेळी केली. त्याने १२ चौकार आणि एक षटकार मारला. टॉम लॅथमने ५५ धावा केल्या. मायकेल ब्रेसवेलने ४ विकेट्स घेतल्या. बांगलादेशकडून कर्णधार नझमुल हुसेन शांतोने ७७ आणि झाकीर अलीने ४५ धावा केल्या.

न्यूझीलंड, बांगलादेश, भारत आणि पाकिस्तानचे संघ अ गटात आहेत. या गटात भारत आणि न्यूझीलंडने त्यांचे दोन्ही सुरुवातीचे सामने जिंकले आहेत आणि दोन्ही संघांचे






४-४ गुण आहेत. अशा परिस्थितीत, आता बांगलादेश आणि पाकिस्तान २-२ सामने गमावल्यानंतर इतके गुण मिळवू शकत नाहीत, ज्यामुळे न्यूझीलंडसह भारताला सेमीफायनलचे तिकीट मिळाले आहे. दरम्यान, दोन संघांनी उपांत्य फेरीसाठी पात्रता मिळवली आहे, ज्यामध्ये टीम इंडियाचे नाव समाविष्ट आहे. टीम इंडियाला स्पर्धेतील शेवटचा ग्रुप स्टेज सामना २ मार्च रोजी खेळायचा आहे, परंतु त्यांनी आधीच सेमीफायनलसाठी पात्रता मिळवली आहे. याचा अर्थ असा की न्यूझीलंडविरुद्धचा सामना ही टीम इंडियासाठी एक औपचारिकता आहे. या सामन्याचा निकाल उपांत्य फेरीच्या शर्यतीवर परिणाम करणार नाही. दोन्ही संघांनी शानदार कामगिरी करत गट फेरी जिंकून पुढील फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. आता सर्वांचे लक्ष उपांत्य फेरीकडे आहे, जिथे हे दोन्ही संघ त्यांचे जेतेपदाचे स्वप्न साकार करण्यासाठी मैदानात उतरतील.

# आता विराटच्या फॉर्मबद्दल कोणीही विचारणार नाही : राजकुमार शर्मा

◆ **दुबई, २४ फेब्रुवारी**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीच्या फॉर्मवरील प्रश्न आता थांबतील, अशी आशा विराटचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांनी व्यक्त केली. चॅम्पियन्स चषकामध्ये पाकिस्तानविरुद्ध विराट कोहलीच्या शौर्यपूर्ण कामगिरीवर राजकुमार शर्मा यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.

कोहलीने रविवारी येथे पाकिस्तानविरुद्धच्या सहा गड्यांनी मिळविलेल्या महत्त्वपूर्ण विजयात आपले ५१ वे वन-डे शतक झळकावले. त्यामुळे भारताला स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचवले.

आता विराट फॉर्मामध्ये नाही का असे प्रश्न मला कुणी विचारणार नाही अशी आशा आहे, असे शर्मा वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले.



राजकुमार शर्मा

नोव्हेंबर २०२३ नंतर कोहलीचे हे पहिले एकदिवसीय शतक होते. गत काही वर्षांत पुरेशी मोठी खेळी न केल्याबद्दल ३६ वर्षीय कोहलीवर बरीच टीका होत होती.

तो नेहमीच एक मोठा सामनावीर आहे असे मी नेहमीच म्हणतो आणि आज त्याने हेच सिद्ध केले आहे, असे सांगून शर्मा कोहलीच्या नाबाद १०० धावांच्या खेळीबद्दल म्हणाले की, त्याने नेहमीच कठीण प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध चांगली कामगिरी केली आहे आणि पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. त्याने देशासाठी सर्वाधिक सामने जिंकले आहेत.

आपल्या खेळीदरम्यान, कोहली १४,००० एकदिवसीय धावा पूर्ण करणारा सर्वात जलद खेळाडू झाला आणि तो केवळ सचिन तेंडुलकर व कुमार संगकारा यांच्या मागे आहे. शर्मा यांना या कामगिरीचा अभिमान आहे.

५१ व्या एकदिवसीय आणि ८२ व्या एकूण शतकाशिवाय त्याने १४,००० एकदिवसीय धावा पूर्ण केल्या आहेत. ही एक मोठी कामगिरी आहे आणि मला त्याचा अभिमान आहे. त्याने संपूर्ण देशाला आनंद दिला आहे, असे तेम्हणाले. (वृत्तसंस्था)

# लहान बदल मोठे परिवर्तन घडवू शकते : मीराबाई चानू

## लठ्ठपणाविरुद्धच्या पंतप्रधानांच्या लढाईत १० व्यक्तींची नियुक्ती

◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

जीवनशैलीतील लहान बदल आरोग्याच्या या प्रमुख चिंतेचा सामना करण्यासाठी महत्त्वपूर्ण फरक करू शकतात.आपल्या दैनंदिन जीवनात छोटे बदल केल्यास देशासाठी मोठे परिवर्तन घडू शकते. फिट इंडिया करण्याचे आपले स्वप्न पूर्ण करण्यास मदत होऊ शकते. आपल्या विकासासाठी सर्व भारतीयांनी या दिशेने वाटचाल करण्याची आवश्यकता आहे, असे ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती भारोत्तोलक मीराबाई चानू म्हणाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लठ्ठपणाविरुद्धच्या लढाईत नेतृत्व करण्यासाठी चानूसह विविध क्षेत्रातील १० व्यक्तींची नियुक्ती केल्यानंतर सोमवारी हा उपक्रम सुरू झाला. या उपक्रमात सहभागी होताना चानू बोलत होती.

लठ्ठपणाविरुद्धच्या लढाईत जागरूकता पसरविण्यासाठी पंतप्रधान मोदींनी नामांकन दिल्याबद्दल आनंद झाला. ही एक मोठी आरोग्य समस्या आहे जी योग्य जीवनशैली निवडी करून आणि सक्रिय, निरोगी आणि तंदुरुस्त राहून दूर केली जाऊ शकते. वाढत्या



मीराबाई चानू

आरोग्याच्या चिंतेला तोंड देण्यासाठी लोकांना सक्रिय उपाययोजना कराव्या, असे आवाहन माजी विश्व विजेती भारोत्तोलक ३० वर्षीय मीराबाई चानू हिने केले.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, चानूने अनेक प्रमुख खेळाडूंना नामांकित केले, यात जागतिक बुद्धिबळ विजेता डी. गुकेश, ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती बॅडमिंटनपटू सायना नेहवाल, नेमबाज गगन नारंग, माजी महिला हॉकी कर्णधार राणी रामपाल, पुरुष हॉकीपटू मनप्रीत सिंग, टेनिसपटू लियांडर पेस, दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, पॅरिस ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज सरबजोत सिंग, टेबल टेनिस स्टार मनिका बत्रा आणि पॅरालिम्पिक विजेती नेमबाजी अवनी लेखरा यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# बीसीसीआय, आयपीएल पदाधिकाऱ्यांनी कोहलीवर उधळली स्तुतिसुमने

◆ **दुबई, २४ फेब्रुवारी**

रविवारी पाकिस्तानविरुद्धच्या चॅम्पियन्स चषक सामन्यादरम्यान भारताच्या स्टार फलंदाज विराट कोहलीने आपल्या शतकी खेळीदरम्यान दबावाखाली असाधारण संयम दाखवला. तो भारतीय संघाला अतुलनीय स्थिरता प्रदान करतो, अशा शब्दांत भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने तसेच आयपीएलच्या पदाधिकाऱ्यांनी कोहलीचे कौतुक केले.

कोहलीच्या नाबाद शतकाच्या बळावर भारताने पाकिस्तानवर सहा गड्यांनी दणदणीत विजय संपादन केला.

कोहलीने दबाव कसा हाताळायचा व देशासाठी कसे खेळायचे हे दाखवून दिले आहे. त्याच्या उत्कृष्ट खेळीद्वारे विराटने अनेकांची मने आणि देशासाठी सामना जिंकला आहे, असे बीसीसीआयचे माजी अध्यक्ष अनुराग ठाकूर म्हणाले.



कोहली थेट शतकासाठी खेळला नाही,तर त्याने भारताच्या विजयाला प्रथम प्राधान्य दिले. तो स्ट्राईक फिरवत होता, केवळ स्वतःच्या धावांसाठी खेळत नव्हता. तो शेवटपर्यंत खेळून भारतासाठी सामना जिंकू इच्छित होता. त्याच्यासारख्या मोठ्या खेळाडूंसाठी वैयक्तिक खेळी फार महत्त्वाची नसून देशाचा विजय महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.

कोहलीचे शतक केवळ शानदार होते. ज्या पद्धतीने त्याने शतक झळकावले. ज्या पद्धतीने त्याने भारतीय संघाला स्थिरता दिली, ते कोणीही करू शकत नाही, असे असे बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला म्हणाले.

संपूर्ण देश विराटच्या शतकाची वाट पाहत होता व आज त्याने ही शानदार शतकी खेळी केली,असे आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल म्हणाले.

केवळ भारतीय क्रिकेटनेच ,नाही तर आयपीएलने जगभरातील क्रिकेट बदलले आहे. गत काही वर्षांत दृष्टिकोनात हाच बदल झाला आहे. त्यामुळे क्रिकेट खूप मनोरंजक झाले आहे आणि म्हणूनच नवीन प्रेक्षक क्रिकेटकडे आकर्षित होत आहेत, असेही ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

## शोएब ची अज्ञानी संघ व्यवस्थापनावर टीका

◆ **दुबई, २४ फेब्रुवारी**

चॅम्पियन्स चषकामध्ये भारताकडून सहा गड्यांनी झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या (पीसीबी) अविवेकी आणि अज्ञानी संघ व्यवस्थापनावर जोरदार टीका केली. पाकिस्तान संघाने कोणत्याही स्पष्ट दिशाशिवाय स्पर्धेत प्रवेश केला. कोणालाच काय करावे हे कळत नाही, असे शोएब अख्तर म्हणाला. रविवारी पाकिस्तानला स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

## कोहली पुढील २-३ वर्षे खेळेल : सिद्धू



◆ **नवी दिल्ली, २४ फेब्रुवारी**

'पिढीतून एकदा येणारा' कोहिनूरसारखा खेळाडू विराट कोहली आणखी २ ते ३ वर्षे खेळत राहील, असे भारताचा माजी क्रिकेटपटू नवज्योत सिंग सिद्धू म्हणाला. पाकिस्तानविरुद्धच्या नाबाद शतकामुळे गत सहा महिन्यांत विराट कोहलीच्या अढळ लचकतेमुळे सिद्धूला खात्री पटली आहे. कोहली पुन्हा एकदा फॉर्ममध्ये परतला व त्याने ५१ वे वन-डे शतक झळकावून भारताला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर सहा गड्यांनी विजय मिळवून दिला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले.

हा वंशावळ, जोश असलेला माणूस आहे. त्याच्या या शतकी खेळीमुळे मी खात्रीने म्हणू शकतो की हा खेळाडू पुढील २-३ वर्षे खेळत राहील व तो आणखी १०-१५ शतके ठोकेल, असे नवज्योतसिंग सिद्धू म्हणाला. कोणत्याही व्यक्तीसाठी अंतिम परीक्षा ही असते. तो प्रतिकूल काळातून कसा जातो, प्रतिकूल परिस्थिती कशी स्वीकारतो, हे बघणे महत्त्वाचे आहे असे तो म्हणाला.

# दिल्ली, गुजरात विजयी मार्गावर परतण्यास उत्सुक

### महिला प्रीमियर लीग

◆ **बंगळुरू, २४ फेब्रुवारी**

महिला प्रीमियर लीगमध्ये येथे मंगळवारी होणाऱ्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायण्ट्स एकमेकांविरुद्ध झुंजणार आहे. फलंदाजीच्या कमकुवतपणामुळे संघर्ष करत असलेले गुजरात जायण्ट्स आणि दिल्ली कॅपिटल्स विजयी मार्गावर परतण्याचा प्रयत्न करतील.

हे दोन्ही संघ पराभवानंतर या सामन्यात उतरणार आहेत. गत दोन हंगामात शेवटच्या स्थानावर राहिलेले गुजरात जायण्ट्स तीन सामन्यात केवळ एका विजयासह गुणतालिकेत तळाशी आहे.

दरम्यान, यूपी वॉरियर्सकडून ३३ धावांनी पराभव पत्करल्यानंतर दिल्ली कॅपिटल्स तिसऱ्या स्थानावर घसरले आहे, हा त्यांचा पाच





सामन्यांतील तिसरा पराभव आहे.

डब्ल्यूपीएलच्या स्थापनेपासून सर्वात सातत्यपूर्ण संघांपैकी एक असूनही, दिल्ली कॅपिटल्सने या हंगामात निराशाजनक कामगिरी केली आहे. ते अद्याप आपल्या स्पर्धेपूर्वीच्या प्रबळ दावेदार या लौकीकाप्रमाणे टिकू शकलेले नाहीत. त्यांना एकत्रित कामगिरी करण्यात संघर्ष करावा लागत आहे.

दिल्ली कॅपिटल्सची फलंदाजीची फळी सातत्याने अपयशी ठरत आहे. सलामीवीर शेफाली वर्मा व मेग लॅनिंगने आपल्या फॉर्मची झलक दाखवली आहे परंतु त्यांचा इतरांनी फायदा घेतला नाही.

विशेषतः मेग लॅनिंगला संघर्ष करावा लागला आहे. आंतरराष्ट्रीय निवृत्तीचा तिच्या खेळावर परिणाम झाला असावा असे सूचित होते.शेफाली, जेमिमा रॉड्रिग्ज व ॲनाबेल सदरलॅण्डने अधूनमधून फटाके उडवले आहेत, परंतु कोणीही आपल्या सुरुवातीचच्या खेळाला मोठ्या खेळीत रूपांतर केले नाही.

दुसरीकडे, गुजरात जायण्ट्स ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडू ॲशले गार्डनरवर खूप अवलंबून आहे. गार्डनर उत्तम कामगिरी करत असून ती स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या तिसऱ्या क्रमांकाची फलंदाज आहे, तिने तीन डावात १४१ धावा केल्या आहेत.

तथापि, मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात, तिच्या अपयशामुळे संघाची फलंदाजीची फळी कोसळली व गुजरातचा डाव केवळ १२० धावांतच आटोपला. त्यामुळे या सामन्यात डी. हेमलता व दक्षिण आफ्रिकेची फलंदाज लॉरा वोल्वार्डलासुद्धा भरीव योगदान द्यावे लागणार आहे. (वृत्तसंस्था)

# एजी पाटील तंत्रनिकेतनला फुटबॉल स्पर्धेत उपविजेतेपद

## आयईडीएसएसए मैदानी स्पर्धेतही कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

विजापूर रोड सैफुल येथील शांती एज्युकेशन सोसायटी संचलित ए. जी. पाटील तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी आयईडीएसएसए अंतर्गत सी झोनमधील फुटबॉल स्पर्धेत उपविजेतेपद व मैदानी स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी केली. कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे झालेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत २०० मीटर धावणेमध्ये उत्कर्ष रेवणसिद्ध कस्तुरे तसेच लांब उडी स्पर्धेत शोएब इन्नुस शेख यांनी प्रथम



क्रमांक पटकाविला. ४ बाय १०० मीटर रीले प्रकारात व्यंकटेश शिरीष साळवे, गणेश संतोष राऊत, उत्कर्ष रेवणसिद्ध कस्तुरे व शोएब इन्नुस शेख यांनी अव्वल स्थान मिळविले. गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक सोलापूर येथे आयईडीएसएसए सी झोन अंतर्गत आयोजित फुटबॉल स्पर्धेत ए. जी. पाटील तंत्रनिकेतनने कर्णधार यश उंबरजीकर यांच्या नेतृत्वाखाली उपविजेतेपद पटकावले. संघास प्रा. आर. आर. कांबळे व प्रा. एस. एल. मुडगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, उपाध्यक्ष एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले आणि उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी अभिनंदन केले.

# राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेमध्ये रुद्रशक्ती गुरुकुलची १६ पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मुंबई (विरार) येथे झालेल्या ९ वी राष्ट्रीय योंगमुडो स्पर्धेमध्ये पूमसे आणि क्युरोगी या प्रकारात रुद्रशक्ती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी १४ सुवर्ण १ रौप्य १ कास्य अशी पदकाची कमाई केली.

या सर्व विद्यार्थ्यांना मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन यांचे मार्गदर्शन लाभले. योंगमुडो असोसिएशन महाराष्ट्र सचिव नागेश शेट्टीकर, इंडिया अध्यक्ष




रोहित नारकर, रुद्रशक्ती गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. **कामगिरी : १० वर्षाखालील:** जानवी म्हेत्रे, दुर्वा रोहिटे (प्रत्येकी २ सुवर्ण) **१४ वर्षाखालील :** दिव्या मिस्कीन, आदिती नल्ला, गौरी माळी, बिंदूप्रिया कुने (प्रत्येकी २ सुवर्ण) हार्दिक चिलका (१सुवर्ण, १ रौप्य) भावेश कुने (१ रौप्य, १ कास्य).

# 'मोदी सरकार'कडून कायम समाज जोडण्याचे काम

## • केंद्रीय मंत्री रामदास आठवले | काँग्रेसने लोकसभेत केला होता संविधानाचा अपप्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारकडून (एनडीए) कायम समाज जोडण्याचे काम सुरू असते; मात्र लोकसभेमध्ये संविधानाचा अपप्रचार करून जनतेची मते वळवून मताधिक्य मिळविणाऱ्या महाविकास आघाडीचा डाव विधानसभा निवडणुकीत पूर्णत: फसला. यामुळेच हरियाना, दिल्लीतही जनतेची मतदानातून मविआला मोठी चपराक बसल्याची टिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज (दि. २४) सोलापुरात केली. दरम्यान, महाराष्ट्रात तर न भुतो न भविष्यती असे मतदान महायुतीला झाल्याचाही आनंद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उत्तर सोलापूर तालुक्यातील खेड येथील कृषी विज्ञान केंद्राच्या एका कार्यक्रमानिमित्त केंद्रीय मंत्री आठवले हे सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी शासकीय विश्रामगृहात माध्यमांशी बोलताना मोदी सरकारबाबत वरील विधान केले. यावेळी त्यांच्या समवेत रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे व इतर पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना आठवले म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या भावना सर्व समाजघटकांवर सारख्याच आहेत. सबका साथ, सबका विकास हे तर त्यांचे ब्रीदवाक्य आहे. शेतकरी बांधवांविषयी तर त्यांची अती तळमळ असते; शेतकरी जगला तर आपण जगू असेही ते म्हणतात. यामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी आमचे एनडीए सरकार कायम असते. किसान सन्मान निधी ही योजना यामुळेच मोदींनी चालू केली आहे. यावेळी आठवले यांनी खा. संजय राऊत यांच्याही अती बोलण्यावर नाराजी व्यक्त केली. दरम्यान, कर्नाटकात महाराष्ट्राच्या बसेसला काळे फासणे हा चुकीचा प्रकार होत असून, पंतप्रधान मोदी हे कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांना समज देतील, असे सांगितले. इतकेच नाहीतर २ मार्च मध्ये होणारी धम्म परिषद, जागतिक युध्द थांबविण्याची गरज आणि राज अन् उध्दव ठाकरेबांबतही पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला आठवले यांनी आपल्या स्टाईलमध्ये मार्मिक उत्तरे दिली.



### ▸ ऑक्टोबरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

यावेळी मंत्री आठवले यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात भाष्य केले. आगामी पावसाळ्यानंतर महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदींच्या निवडणुका होतील, असे स्पष्ट केले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार? याची उत्सुकता राज्यातील सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना लागली आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयात ओबीसी आरक्षणासंदर्भातील याचिका अजूनही प्रलंबित आहे, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुतेक ऑक्टोबर महिन्यात म्हणजे पावसाळ्यानंतर होतील, अशी माहितीही आठवले यांनी यावेळी दिली.

### ▸ पाकव्याप्त कश्मिर भारताकडे द्यावा

यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आठवले यांनी दुसरे एक महत्वाचे विधान या पत्रकार परिषदेत केले. पाकिस्तानने पाकव्याप्त कश्मिर भारताकडे द्यावा, पाकव्याप्त कश्मिरमधील जनता भारतात येण्यास उत्सुक आहे. इतकेच नाहीतर पाकिस्तानने आतंकवादी कारवाया करायचे सोडून दिल्यास भारत आणि पाक संबंध सुधारतील. जर पाकने अशाच खोड्या काढत राहिला तर पाकला नुसते क्रिकेटमध्येच नाहीतर युध्दातही आपण हरवू शकतो, असा इशाराही दिला.

### लवकरच महामंडळांवर रिपाइंच्या पदाधिकाऱ्यांची वर्णी

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे मताधिक्य मिळाले आणि सत्ताही मिळाली. यामध्ये लाडक्या बहिणींसह दलित बांधवांच्या मताचाही महायुतीला फायदा झाल्याचा निर्वाळा केंद्रीय मंत्री आठवले यांनी आज दिला. इतकेच नाहीतर रिपाइं पार्टीतील प्रामाणिक पदाधिकाऱ्यांना सरकारकडून काहीही मिळाले नसले तरी सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे निवडणुकीत काम केले आहे. यामुळे आगामी महामंडळांच्या निवडीत रिपाइंमधील जेष्ठ नेत्यांना आपण संधी देणार असल्याचाही खुलासा आठवले यांनी केला. इतकेच नाहीतर आपण विधान परिषदेवर एक आमदार करणार असल्याचेही आठवले शेवटी म्हणाले.



### वाहतूक पोलीस शाखेची कारवाई

सोलापूर : शहरात वाहतूक पोलीस शाखेची कर्कश आवाजाच्या दुचाकीवर कारवाई करण्यात सुरुवात झाली. सोमवारी दिवसभरात २५ ते ३० गाड्यांचे सायलेन्सर जप्त करण्यात आले व दंड करण्यात आला. नवीवेस पोलिस चौकी परिसरात टिपलेले छायाचित्र.



# बाजार समितीच्या निवडणुकीची आज उच्च न्यायालयात सुनावणी

### बाजार समितीमधील सर्व घटकांचे लागले सुनावणीकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकी संदर्भातील उच्च न्यायालयात प्रलंबित असलेली सुनावणी आज मंगळवार दि.२५ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार आहे. त्यामुळे या सुनावणीकडे संपूर्ण बाजार समितीचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भात सुनावणी संपन्न होणार होती. परंतु उच्च न्यायालयाच्या बोर्डावर सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकी संदर्भातील विषय आला नसल्याने यावर सुनावणी होऊ शकले नाही. मात्र आजच्या नजरा लागल्या आहेत. कारण आज यावर अंतिम सुनावणी केली जाईल असा आशावाद व्यक्त केला जात आहे. बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा बिगुल यापूर्वीच वाजला होता.

परंतु विधानसभा निवडणुकीमुळे बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया ३१ डिसेंबर पर्यंत स्थगित करून यापुढे निवडणुकीचे प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबवली होती त्या टप्प्यावरून सुरू करण्यासंबंधी आदेश देण्यात आले होते. परंतु प्रारूप मतदार यादी चा विषय समोर आल्याने पुन्हा एकदा निवडणुकीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली. कायद्यानुसार सहा महिन्यानंतर मतदार यादी चे नूतनीकरण करणे बंधनकारक असल्याने सदरची स्थगिती देत असल्याचे आदेश राज्याचे पणन विभागाकडून देण्यात आले होते. मात्र या आदेशावर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आले होते. त्यामुळे हे प्रकरण न्यायप्रविष्ठ बनले आहे. प्रारूप मतदार यादी जाहीर करून निवडणूक प्रक्रिया राबवावी, असे आदेशात नमूद करण्यात आले होते. मात्र या आदेशाला आव्हान देत, आहे त्याच मतदार यादीवर बाजार समितीची निवडणूक घ्यावी अशी याचिका याचिकाकर्त्यांनी दाखल केली होते. त्या आदेशावर उच्च न्यायालयात सुनावणी होणार संपन्न आहे.

### उच्च न्यायालयाच्या आदेशावर नजर

सोलापूर बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या विविध घटकांचे आज होणाऱ्या उच्च न्यायालयातील सुनावणीकडे लक्ष लागून राहिले आहे. बाजार समितीतील शेतकरी, अधिकारी कर्मचारी, अडत व्यापारी, खरेदीदार, तोलार, हमाल माथाडी कामगार, यांचे लक्ष याकडे लागले आहे. उच्च न्यायालय ज्याप्रमाणे आदेश देईल त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी केली जाईल असे यापूर्वीच बाजार समितीच्या प्रशासनाद्वारे कळवण्यात आले आहे. त्यामुळे उच्च न्यायालयात कोणता युक्तिवाद मांडला जातो त्यावर काय निर्णय होईल हे पाहणे महत्त्वाचे आहे.



### तयारी महाशिवरात्रीची

**सोलापूर : महाशिवरात्रीनिमित्त प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय व मातोश्री पुष्पलताताई इंचगिरी मठ आयोजित महाशिवरात्री मेला महोत्सवामध्ये द्वारका येथील नागेश्वर ज्योतिर्लिंग दर्शन देखावा उभारण्यात आला आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# आरोग्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर आरोग्यमित्रांचे आंदोलन स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील आरोग्य मित्र कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आरोग्य मित्रांनी १८ फेब्रुवारीपासून सुरू केलेला संप स्थगित केला आहे.



राज्यात २०१४ पासून कार्यरत असलेल्या आरोग्यमित्रांना अल्प वेतनावर काम करावे लागते. त्यांना किमान वेतनही दिले जात नाही. तसेच मूळ वेतन, महागाई भत्ता, बोनस कायद्यात नमूद केल्यापेक्षा कमी दिला जातो. १० ते १४ वर्षे काम करूनही वेतन वाढ दिली नसल्यामुळे राज्यातील आरोग्य मित्रांनी संप सुरू केला होता. संपामध्ये आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेल्या दीड हजार आरोग्य मित्र सहभागी झाले होते.

यासंदर्भात ७ फेब्रुवारी रोजी राज्य आरोग्य हमी सोसायटीचे सीइओ अण्णासाहेब चव्हाण यांनी टीपीए व संघटनेचे संयुक्त बैठक बोलावून सकारात्मक निर्णय करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर टीपीए यांनी सुमारे दोन ते तीन हजार रुपये वाढीचा प्रस्ताव संघटनेला दिला. तसेच महागाई भत्ता व रजांचे सुविधा लागू करण्याबद्दल मान्य केले. यावर राज्य आरोग्य हमी सोसायटीचे सीइओ अण्णासाहेब चव्हाण यांनी किमान वेतन कायद्यानुसार मूळ वेतन, महागाई भत्ता, रजा देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच वेतन वाढ व अन्य मागण्याबाबत बैठक बोलावून मार्ग काढण्याचे आश्वासन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी संघटनेचे अध्यक्ष डॉ. डी.एल कराड यांना दिले.




# सम्राट अशोक शिक्षण संकुलास रोटरी क्लबची शैक्षणिक मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सम्राट अशोक शिक्षण संकुलाच्या प्राथमिक विभागास रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ ईस्ट यांनी ३० हजार रुपयांची शैक्षणिक मदत दिली आहे.

या रकमेचा धनादेश डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुरेश साबू यांच्या हस्ते तसेच डिस्ट्रिक्ट व्हाईस गव्हर्नर पुनम देवदास, कलप्पा कांबळे, आनंद पाटील, राकेश उदगीरी, महाराणा, रो. लब्बा, रो. दुबे यांच्या प्रमुख उपस्थित प्रदान करण्यात आलाया प्रसंगी यशोधरा जुनिअर कॉलेजचे प्राचाय सुबोध सुतकर, सम्राट अशोक मराठी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवानंद डुणगे, सदस्या प्रा. पंकज सुतकर सुधीर वाघ, सुवर्णा भांगे, न्यामतबी शेख, अनिता वाघमारे, अस्मिता केदार, केशर कस्तुरकर, लक्ष्मी बेनुरे, चंद्रशेखर खानापुरे, अमरीन अंजूम मुजावर, सोमशेखर माने, प्रा. प्रियंका कांबळे, सीमा सरवदे, स्वप्नीका बायस, शुभांगी नरळे, रोहिणी सुरवसे आदी उपस्थित होते

# मराठी दिनानिमित्त माय मराठीला मराठमोळी वंदना

### राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मराठी राजभाषा या दिनाचे औचित्य साधून रविवार राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशन ब्रिजधाम आश्रम सोरेगाव येथे मराठी दिनाचा कला गुणांचा कार्यक्रम घेतला.

या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे उपाध्यक्ष प्रेमचंद मेने यांनी मराठी दिनाचे महत्त्व सांगून केली. प्राचीन शीला लेखापासून मराठी भाषेची प्राचीनता सांगून मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी व्यवहारांमध्ये देखील सर्वांनी प्रयत्न करावे असे ते मनोगतात म्हणाले.



या कार्यक्रमात मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम घेतला गाण्यांमध्ये भक्ती गीते, कोळीगीत, भावगीत, गोंधळ गीत अशी विविधता होती. महाराष्ट्रातील मराठीचा साज दाखवताना महाराष्ट्राचा पारंपारिक खेळ लेझीम याचेही सादरीकरण करण्यात आले. यात संस्थेचे अध्यक्ष प्रांजली मोहीकर, राजू अनंतकर, विश्वस्त वेदांत मोहीकर, आदर्श अनंतकर, पूजा हडपद, प्रेमचंद मेने, दीपक कांबळे यांनी शिवाजी महाराजांच्या पोवाड्यावर उत्तम लेझीमचे सादरीकरण केले. यानंतर या कार्यक्रमात कवयित्री प्रांजली मोहीकर यांनी ''मराठी बाणा'' ही कविता तसेच राजू अनंत कर यांनी ''काय करू राणी मला गाव सुटेना ही कविता आणि मनोहर कोसंदर यांनी सुंदर कविता सादर केली. अशा बहारदार कार्यक्रमांमुळे या आश्रमाच्या कार्यक्रमाची शोभा वाढते असे ब्रिजधाम आश्रमचे संस्थापक फोफलिया मनोगतात म्हणाले. भतगुणकी यांनी उपस्थित मराठमोळ्या सर्व रसिकांना त्यांच्यातर्फे हुरडा पार्टी दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर खमितकर यांनी केले.




# सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवा

### ▸▸ कृती समितीचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

सोलापुर वाढत्या कडक उन्हामुळे शहर व जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात.या मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना दिल्याची माहीती डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली.

डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद,महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना,युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दु शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळाने प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांची भेट घेतली.या शिष्टमंडळात सुनिल चव्हाण, आप्पाराव इटेकर, आप्पासाहेब पाटील,सचिन चौधरी, बरगली लांडगे, मनोज पाटील उपस्थित होते.

सध्या उन्हाळा कडक असुन तापमान ३९ अंश सेल्सियस इतके आहे.पिण्याच्या पाण्याची टंचाई,कडक उन्हाळा याचा विपरित परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे शाळा सकाळच्या सत्रात भरविण्यात याव्यात. या मागणीवर शिक्षण समितीच्या बैठकीत विषय मंजुर करुन हा विषय मार्गी लावण्याचे आश्वासन शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी संघटनेच्या शिष्टमंडळाला दिले.

# राष्ट्राच्या उभारणीत अभियंत्यांचा सिंहाचा वाटा

## • जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत | स्थापत्य २०२५ प्रदर्शनाचा उत्साहात समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनियर्स या अभियंत्यांच्या संघटनेने आजवर समाज हिताचे काम केले आहे. राष्ट्राच्या उभारणीत अभियंत्यांचा वाटा सिंहाचा आहे, असे प्रतिपादन जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी केले. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सतर्फे नॉर्थकोट मैदानावर आयोजित स्थापत्य २०२५ या बांधकाम व अंतर्गत सजावट विषयक प्रदर्शनाचा समारोप ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी व्यासपीठावर मेटारोल इस्पात प्रा. लि. चे प्रमुख वितरक इब्राहिम मोतीवाला, असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष इंजि. प्रशांत मोरे, सचिव इंजि. मनोहर लोमटे, उपाध्यक्ष इंजि. भगवान जाधव, खजिनदार इंजि. संतोषकुमार बायस उपस्थित होते. स्थापत्य २०२५ या स्थापत्य प्रदर्शनाचे प्रायोजकत्व मेटारोल इस्पात प्रा. लि. जालना यांनी घेतले होते. जिल्हा सरकारी वकील



ॲड. प्रदीपसिंग राजपूत म्हणाले, बांधकाम विषयक सर्व कायदे आणि नैतिकता पाळून अभियंतांनी केलेले काम समाजाच्या हिताचे ठरते. एसीसीईकडून इमारत बांधणीबरोबरच समाजाच्या विकासाचे काम होत आहे. बांधकाम क्षेत्रात जगभरात येणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवून त्यांना माहितीने अद्ययावत करण्याचे काम स्थापत्य २०२५ या प्रदर्शनामुळे झाले आहे, असेही ॲड. राजपूत याप्रसंगी म्हणाले. या कार्यक्रमासाठी असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे सहसचिव जवाहर उपासे, सहखजिनदार मनोज महिंद्रकर, माजी अध्यक्ष अमोल मेहता, प्रकाश तोरवी, इफ्तेखार नदाफ, वैभव ढोनसळे, किरण कदम, राजीव दीपाली, कार्यकारी समिती सदस्य वैभव होमकर, चंद्रमोहन बत्तूल, सिद्धाराम कोरे, काशिनाथ हरेगावकर, गणेश इंदापुरे, शैराज होमकर, रामकृष्ण येमुल, सुनील दूधगुंडी यांची प्रमुख उपस्थिती होती. असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर्सचे अध्यक्ष प्रशांत मोरे यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष भगवान जाधव यांनी परिचय करुन दिला. नर्मदा कनकी यांनी सूत्रसंचालन तर असोसिएशनचे सचिव मनोहर लोमटे यांनी आभार मानले.

### स्टॉलधारकांना उत्तम प्रतिसाद

स्थापत्य २०२५ प्रदर्शनातील स्टॉलधारकांना सोलापूर परिसरातील जिल्ह्यातील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. स्थापत्य प्रदर्शन एक वर्षाआड घेण्याऐवजी दरवर्षी भरवावे अशी मागणी नागरिकांनी आणि स्टॉलधारकांनी केली. सर्व विजेत्यांना जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. आर्किट. वीरेंद्र बोलाबत्तीन, प्रा. एस.बी. मोरे, क्रेडाई सदस्य उमेश लोलगे यांनी यांनी परीक्षण केले. स्थापत्य २०२५ प्रदर्शनास सोलापुरातील विविध अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या हजारो विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली.

### स्थापत्य २०२५ प्रदर्शनातील विजेते

उत्कृष्ट कमर्शियल स्टॉल : प्रथम : मेटारोल इस्पात प्रा. लि. (जालना), द्वितीय : ॲस्ट्रल बाथ वेअर, तृतीय : वर्धमान ग्लास ट्रेडर्स. उत्कृष्ट अभियंता : इंजि. भगवान जाधव, उत्कृष्ट मशिनरी : गुब्बी ग्रुप.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दहा दिवस तरावीह नमाजचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

येत्या एक मार्चपासून मुस्लीम धर्मियांचा पवित्र रमजान महिन्याचा आरंभ होत आहे. चंद्र दर्शनानंतर दि. १ ते १० मार्च पर्यंत कुर्बान हुसेन हॉल, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर येथे १० दिवस तरावीह नामाजचे आयोजन पी. एस. ग्रुप व मुस्लिम पाच्छा पेठ युवक संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे, अशी माहिती माजी नगरसेवक पिर अहमद शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली. या तरावीह नमाजला इशा ची अजान रात्री ८.१५ वजता व जमात ८.३० वाजता असेल. या दहा दिवसांत तरावीह नमाजमध्ये हाफिज व कारी गुलाम गौस सहाब हे पूर्ण कुराणपठण करतात. याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पिर अहमद शेख यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस जावीद शिकलकर, रिजवान शेख, साजिद शाह, रियाज लिंबूवाले, आसिफ शेख, मतीन बागवान, शहानवाज कंपली आदी उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### बुटात ठेवलेली चावी घेऊन चोरले साडेचार लाखाचे दागिने

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

बुटात ठेवलेली चावी घेऊन अज्ञाताने घर उघडून घरातील सुमारे साडेचार लाखाचे दागिने चोरून नेले. हा प्रकार २३ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० ते रात्री ९ यादरम्यान घडला. याबाबत शहेबाज शौकत पठाण (वय ३०, रा. मौलाली चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी यातील फिर्यादीने त्यांचे घर कुलूप लावून बंद केले. त्यानंतर ती चावी घराजवळील बुटात ठेवली. त्यानंतर ते कामासाठी म्हणून दुपारी १२.३० च्या सुमारास बाहेर पडले. रात्री ९ च्या सुमारास ते घरी परतले. त्यांनी घर नेहमीप्रमाणे उघडले. बेडरूममधील कपाटातील दागिने त्यांना नसल्याचे दिसून आले. त्यांनी घरात इतरत्र दागिन्यांचा शोध् घेतला, परंतु दागिने आढळून आले नसल्याने पोलिसात तक्रार दिली. या गुन्ह्याचा तपास पोसई शिंदे करत आहेत.

### गतीरोधकारवरून पडून मृत्यू पावलेल्या व्यक्तीविरूध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

देशमुख वस्तीजवळील रस्त्यावरील गतीरोधकावर दुचाकी आदळून पडल्यानंतर जखमी होऊन मृत पावलेल्या व्यक्तीविरूध्द सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात १६ फेब्रुवारी रोजी घडला होता. याबाबत अंमलदार कुंभार यांनी दिलेल्या तक्रारीवरून आणण्पा शिवराम चोपडे (वय ६२, रा. हिरज ता उ सोलापूर) विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ फेब्रुवारी रोजी आणण्प्पा हे एमएच १३/ ई/ आर/ ०४२४ क्रमाकाच्या दुचाकी चालवित जात होते. देशमुखवस्तीजवळील गतिरोधकावरून दुचाकी आदळून आणण्पा खाली पडले. यात गंभीर होऊन त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूस ते स्वत: जबाबदार असल्याने त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सपोनि खामकर करत आहेत.

### मैत्रिणीला भेटायला निघालेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मैत्रिणीला भेटायला निघोलल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तसेच तिचा मोबाईल नंबर मागून विनयभंग केल्याप्रकरणी एकाविरूध्द पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार २२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास शहर परिसरात घडला. याबाबत पिडीतेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून बाबूराव विठ्ठल दिक्षीत (रा. सोलापूर) विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तक्रारदार यांची मुलगी ही रविवारी सायंकाही ६.३० च्या सुमारास मैत्रिणीला भेटण्यासाठी म्हणून घरातून बाहेर पडली. वाटेत थांबलेल्या आरोपीने तिला एका मुलामार्फत बोलायचे आहे असा निरोप पाठविला. तुझ्यावर प्रेम करतो, तुझा मोाबईल नंबर दे म्हणून त्याने अल्पवयीन मुलीचा पाठलाग केला. तपास पोलीस करत आहेत.

# सोलापुरात मराठी-कानडी वाद पेटला






सोलापूर : बस स्थानकात शिंदे सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी कर्नाटक एसटी बसेसच्या चालक वाहकांना गुलाब पुष्प देऊन गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले. दुसऱ्या छायाचित्रात ठाकरेंच्या शिवसैनिकांनी सात रस्ता येथे कर्नाटक राज्याची एसटी अडवून त्यावर भगव्या रंगात जय महाराष्ट्र लिहले. तसेच भगवा गुलाल उधळून एसटी चालकाचा सत्कार केला.

### ठाकरें सेनेने कर्नाटक बसेसवर स्प्रे पेंटिंगने लिहले जय महाराष्ट्र

### शिंदें सेनेचे कर्नाटकच्या चालक वाहकांना गुलाब पुष्प देऊन आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

मराठी कानडी वाद विकोपाला गेला आहे. चित्रदुर्ग येथे महाराष्ट्र एसटी बसेसला काळे फासले आहे. तसेच चालक वाहकांना मारहाण करून त्यांच्या चेहऱ्यावर देखील काळे फासल्यांनतर हा वाद वाढत चाललेला आहे. कोल्हापुरात त्यानंतर पुणे आणि आता सोलापुरात याचे पडसाद उमटत आहेत.

शहरातील ठाकरे आणि शिंदे यांच्या शिवसेनेने या घटनेचा निषेध नोंदवत तीव्र आंदोलने केली. गांधीगिरी पद्धतीने कर्नाटकच्या चालक वाहकांचा सत्कार केला. त्यांच्यावर गुलाल उधळला गुलापुष्प दिले. महाराष्ट्रात यायचं असेल तर जय महाराष्ट्र बोलण्याचा इशाराही दिला. याप्रसंगी उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांनी आक्रमक रूप घेत सात रस्ता येथील कर्नाटक बसवर भगव्या स्प्रे प्रिंटिंगद्वारे जय महाराष्ट्र लिहिले. कर्नाटक राज्याचा निषेध नोंदवला. यावेळी ठाकरे यांच्या शिवसैनिकांनी कर्नाटक एसटीच्या चालकाला जय महाराष्ट्र बोलण्याचा सज्जड दम भरला.

दुसरीकडे याच पार्श्वभूमीवर सोलापूर बसस्थानकात शिंदेसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले.

### कर्नाटक सरकारला नुकसान पोहोचवू शकतो

कर्नाटक येथील कानडी वेदिका संरक्षण समितीच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र एसटी महामंडळाच्या एसटी बसेसला काळे फासले चालक वाहकांना मारहाण करून त्यांच्या चेहऱ्याला देखील काळेफासले. हे अत्यंत चुकीचे आहे. आम्हालाही वेगळ्या पद्धतीने कर्नाटक सरकारला नुकसान पोहोचवता येऊ शकते. परंतु आम्ही तसे करणार नाही. यापुढे जर अशा घटना घडत राहिल्या, तर मग नक्कीच वेगळे पाऊल उचलून यापुढे आणखीन तीव्र आंदोलन करू आणि कर्नाटक सरकारला त्याचे नुकसान सहन करावे लागेल. त्याची जबाबदारी सर्वस्वी कर्नाटकची राहील.

**- अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट.**

### महाराष्ट्रात यायचं असेल तर जय महाराष्ट्र बोलावे लागेल

महाराष्ट्रात येणाऱ्या कर्नाटकच्या बसेसवर आम्ही जय महाराष्ट्र लिहिले आहे. यापुढे कर्नाटकच्या बसेसला महाराष्ट्रात प्रवेश करायचा असेल तर त्यांच्या चालक वाहकांना जय महाराष्ट्र बोलावे लागेल. त्यांची मुजोरी यापुढे खपवून घेतली जाणार नाही.

**- अतुल भंवर, शिवसैनिक ठाकरे गट**

# प्रयागराजला जाऊ न शकलेल्यांसाठी सोलापुरात अमृत स्नान नियोजन

### श्री सिध्देश्वर तलावानजीक गणपती घाटावर जय्यत तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सोलापुरातील समस्त नागरिकांसाठी श्री सिद्धेश्वर तलावानजीक गणपती घाटावर बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीला अमृत स्नान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जय संतोषी माता गोशाळा सोलापूर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम होत आहे, अशी माहिती गोशाळेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र गाजुल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विश्व हिंदू परिषदेचे ह.भ.प अभिमन्यू डोंगरे महाराज तसेच डॉ. राजेंद्र गाजुल यांनी प्रयागराज येथे जाऊन गंगाजल आणले आहे. हे गंगाजल सोलापुरात ज्या भाविकांना प्रयागराज येथे जाता आले नाही त्यांच्यासाठी अमृत स्नानासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी गणपती घाटावर विशेष सुविधा करण्यात आली आहे.एका हौदामध्ये तसेच पाण्याच्या टँकरमध्ये हे गंगाजल टाकण्यात येईल. येथे भाविकांना स्नान करता येईल. त्याआधी या गंगाजलाची विधिवत पूजा पुरोहितांच्या हस्ते करण्यात येईल. पहाटे पाच वाजल्यापासून हा मुहूर्त आहे.

स्नान करण्याचा शुभमुहूर्त पहाटे ५.०९ ते ५.५९ पर्यंत आहे. गंगाजल हे स्वच्छ टँकरच्या नळाद्वारे गोमुखातून पाणी सोडले जाणार आहे. हे गंगाजल घरी घेऊन जाता येईल अशी सोय करण्यात आली आहे. प्रारंभी संत, महंत गुरु व महाराज हे गंगापूजन करून स्नान करतील व प्रसाद वाटप करण्यात येणार आहे. त्यानंतर सोलापुरातील भाविक भक्तांनी साधुसंतांचा महा कुंभ अमृत स्नान सोहळा अनुभवता येणार आहे. पर्व काळात सकाळी ६.१९ ते सायंकाळी ६.२६ पर्यंत आहे. त्यानंतर महा कुंभ अमृत स्नान होईल. संध्याकाळी ७.३० वाजता महागंगा आरती होणार आहे.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून हभप गहिनीनाथ औसेकर महाराज, हभप सुधाकर इंगळे महाराज, हभप अभिमन्यू डोंगरे महाराज, हभप श्री लक्ष्मण महाराज चव्हाण, रमेश सिंगजी महाराज, मातोश्री पुष्पलता भोसलेताई महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्त्री आणि पुरुषांसाठी वेगवेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी मंडप आणि स्टेज उभारण्यात येत आहे. अशीच सुविधा सोलापुरात इंचगिरी मठ आणि दमानी नगर येथेही करण्यात येणार आहे.या वेळेत सोलापूरकरांनी या अमृत स्नानाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस श्रीकांत कुलकर्णी, लक्ष्मण भंडारी, हभप अभिमन्यू डोंगरे महाराज , केतन शहा, संजय जमादार आदी उपस्थित होते.

# प्रयागराज येथून दर्शन घेऊन परतणाऱ्या कारला अपघात

### सोलापुरातील चार भाविक जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभनिमित्त दर्शन घेऊन परतत असताना कारचा अपघात झाला. या अपघातात सोलापुरातील चार भाविक जखमी झाले.

हा अपघात २१ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास आग्राच्या पुढे तीन किलोमीटरवर घडला. धोंडिराज पिरप्पा कमळे (वय २१ रा. भंडारकवठे ता दक्षिण सोलापूर), गंगाबाई अंबण्णा बिराजदार (वय ५२ रा सुलेरजवळगे,ता अक्कलकोट), लक्ष्मण यल्लप्पा नाईकवाडे (वय ५० रा. गणेश नगर,मडकी वस्ती सोलापूर),अप्पासाहेब श्रीमंत कोळी (वय २३ रा निंबर्गी ता दक्षिण सोलापूर) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. आठदिवसापूवी एका कारमधून सात जण प्रयाग राज या ठिकाणी दर्शनासाठी गेले होते. प्रयाग राज येथे स्नान व देवदर्शन केल्यानंतर ते सर्वजण आयोध्याला गेले. अयोध्यावरून आग्रा येथे गेले. तेथून परत २१ फेब्रुवारी रोजी रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास आग्रा ते सोलापूरच्या दिशेने येत होते. आग्रापासून तीन किमोमीटर पुढे आल्यानंतर समोरून जाणा-या ट्रॅव्हल्स बसला कारची पाठीमागून धडक बसली. अपघातानंतर सर्व जखमींवर त्या ठिकाणी प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील




उपचार करण्यासाठी नातेवाईकांनी रुग्णवाहिकेतून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. चौकट यातील धोंडीराज हा कार चालक आहे. तो कारमधील एअर बॅगमुळे बालबाल बचावल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्या कमरेला मार लागून तो जखमी झाला आहे. तर गंगाबाई यांना पायास मुका मार लागला आहे. आप्पासाहेब व लक्ष्मण हे मार लागून जखमी झाल्याने सिव्हिलमध्ये दाखल केले आहे.

# गॅरेजसमोरील आयशर टेम्पो पेटल्याने जळून खाक

### कोणतीही जीवितहानी नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

सोलापूर-हैद्राबाद रस्त्यावर दुरूस्तीच्या कामासाठी गॅरेजसमोर सोडण्यात आलेल्या आयशर टेम्पोने पेट घेतला. या आगीत टेम्पो जळून खाक झाला. सोमवारी दुपारी ही घटना घडली. अग्निशामक दलाच्या जवानांनी दोन गाड्या पाणी मारून आग नियंत्रणात आणली. आगीचे नेमके कारण समोर आले नाही.

हैद्राबाद रस्ता अलीकडील काही दिवसांत चांगलाच चर्चेत आला आहे. काही दिवसांपासून या रस्त्यावर अपघात तसेच वाहन पेटणे या घटना घडत आहेत. मागील बल्करच्या अपघातात तीन लोकांचा जीव गेला. यानंतर आता टेम्पो पेटण्याची घटना घडल्याने लोकांमध्ये भीती बसली आहे. हैद्राबाद रस्त्याला लागून गॅरेज आहे. या गॅरेजमध्ये हा टेम्पो दुरूस्तीच्या कामाकरीता सोडण्यात आला आहे. सोमवारी दुपारी त्या टेम्पोने अचानक पेट घेतला. त्यावेळी रस्त्यावर बघ्याची मोठी गर्दी दिसून आली. लोक मोबाईलमध्ये चित्रिकरण करत होते. आगीच्या घटनेनंतर बराच वेळाने ही बाब अग्निशामक दलास कळविण्यात आली, असे अधिका-याचे म्हणणे आहे. माहिती मिळाल्यानंतर काही वेळात दाखल झालेल्या अग्निशामक दलाच्या जवानांनी दोन गाडी पाणी मारून आग आटोक्यात आणली. परंतु तोपर्यंत टेम्पोचा संपूर्ण टेम्पो जळाला होता.

### वाहतूक वळविण्यात आली

हैदराबाद रस्त्यावर उभारलेल्या टेम्पोला आग लागल्याने त्या बाजूनी जाणारी वाहतूक दुस-या बाजूने वळविण्यात आली होती. आग पूर्ण नियंत्रणात आल्यानंतर वाहतूक पूर्ववत करण्यात आली. आगीच्या नेमका कारणाचा शोध घेतला जात आहे. टेम्पो पेटला की पेटविला याचा खुलासा पोलिसांच्या तपासानंतर लागणार आहे.

# 'तरुण भारत'मध्ये जागतिक मुद्रण दिन उत्साहात

## दै. 'तरुण भारत' व प्रिसिजन प्रिंटस्‌मधील कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभावृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

मुद्रण कलेचे संशोधक जोहान्स गुटेनबर्ग यांचा २४ फेब्रुवारी हा जन्मदिवस जागतिक मुद्रण दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. दैनिक तरुण भारतमध्ये सोमवारी जागतिक मुद्रण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कै. वि.मो. मेहता प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या हस्ते तरुण भारत व प्रिसिजन प्रिंट्समध्ये कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुष्पगुच्छ, प्रशस्तीपत्र आणि भेटवस्तू असे सन्मानाचे स्वरूप होते. यावेळी पेठे फूडसच्या संचालिका, उद्योजिका सुवर्णा पेठे, अनुजा पेठे आणि तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, व्यवस्थापक विनायक पुला यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्या श्रुती बागेवाडी यांचा सत्कार सुवर्णा पेठे यांच्या हस्ते तर सुवर्णा पेठे यांचा सत्कार प्रशांत माने यांच्या हस्ते आणि नर्मदा कनकी यांचा सत्कार श्रुती बागेवाडी यांच्या हस्ते करण्यात आला.





### समाजात दैनिकांचे महत्त्व

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना श्रुती बागेवाडी यांनी मुद्रण दिनाचा इतिहास कथन केला. मुद्रणाच्या माध्यमातून दैनिकांसह संपूर्ण प्रिंटिंग क्षेत्रात झालेली प्रगती आणि समाजातील दैनिकांचे महत्त्व त्यांनी विशद केले. मुद्रण दिनानिमित्त सर्व उपस्थित त्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. उद्योजिका सुवर्णा पेठे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना मुद्रण दिनाच्या शुभेच्छा देत सर्वांचे आभार मानले आभार मानले. नर्मदा कनकी यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले.

### या कर्मचाऱ्यांचा झाला सन्मान

विनायक पुला (तरूण भारतचे व्यवस्थापक), मनोहर बायनी (जाहिरात व्यवस्थापक), सिध्दाराम चिट्टे (प्रिसिजनचे विभाग प्रमुख), राजेंद्र महाले (वसुली प्रमुख), रविकांत गायकवाड (फोर कलर मशीन ऑपरेटर), सचिन कांबळे (सी.टी.पी. मशीन ऑपरेट), जयभिम इंगळे (बायडींग प्रमुख), गोरख वाघमारे (सिंगल कलर मशीन ऑपरेटर), जाफर मनियार (कटिंग मशीन ऑपरेटर), किरण सुतार (रोटा मशिन ऑपरेटर), अमोल खरात (सी.टी.पी. मशीन ऑपरेटर), प्रशांत अष्ठपुत्रे (रोटा मशीन ऑपरेटर), मनिषा विभूते (डी.टी.पी. ऑपरेटर). कर्मचारी : शिवशरण नागसेन, महेश पाटील, आकाश पाटील, राज बंडगर, ओंकार करजगी, मोहित माने, दिपक माने, वामन बावडेकर, विक्रांत माळवदकर, रवि जक्का, अक्षय भातोंडे, अक्षय स्वामी, जयराम गड्डुम, प्रसाद नडीमेटला, गीता स्वामी, धानेश्वरी वाणी, सरिता सालीमठ, सुकन्या दिंडोरे, वर्षा कांबळे, दैवशाला रजपुत, रंजना घोडके.

# जातवैधता प्रमाणपत्रासाठी ६ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी -**

राज्यातील सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सरकारकडून जात पडताळणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रियेत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ६ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे व्यावसायिक, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शासनाने जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत वाढवून दिली आहे. याचा फायदा राज्यातील अभियांत्रिकी, फार्मसी, वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. संगणक प्रणालीत सुरळीतपणे प्रक्रिया पार पडत नाही. ऑनलाइन प्रक्रियेत त्रुटी पूर्ततेसाठी ही अडचणी येतात. त्यामुळे अधिनियमाच्या कलम पाच नुसार ६ एप्रिलपर्यंत प्रमाणपत्र सादर करण्याची विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली आहे.

अभियांत्रिकी आणि फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्यासह आवश्यक कागदपत्रेही त्यासोबतच स्कॅन करून जोडण्याचे स्पष्ट आदेश आहेत. त्यामुळे ही कागदपत्रे अपलोड होण्यास सर्व्हर डाऊन मुळे वेळ लागत असल्यानेच विद्यार्थ्यांची चिंता वाढली होती.

यातच परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी अर्ज प्रक्रियेमुळे अपुरा वेळ मिळत असल्याने विद्यार्थ्यांची अर्ज भरते वेळी घालमेल होत होती. या मुदत वाढीचा या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. फॉर्म भरल्यानंतरही जात पडताळणीसाठी अर्ज केला तरी त्यांना ते मिळू शकणार आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०३९

**तेथ सुह्द आणि शत्रु । कां उदासु आणि मित्रु ।**
**हा भावभेद विचित्रु । कल्पूं कैचा ।।**

आत्मसुखात रममाण झालेल्या व्यक्तिबद्दल अदयापही भगवंत बोलत आहेत. जो विचारयुक्त विवेकपुर्णचित्ताने आपल्या आत्म्याला जिंकतो, तो स्वत:च स्वत:चा मित्र आहे, आणि ज्याचा स्वत:वर,स्वत:च्या मनावर ताबा नाही तो स्वत: आत्म्याच्या ठिकाणी शत्रुप्रमाणे वर्तन करतो.असा त्याचा अर्थ आहे . ज्याने आपले मन जिंकले आहे, त्याचा परमात्मा आत्मभावाने त्याच्याजवळच असतो. त्या तत्वस्वरुपी योग्याला शीत, उष्ण, सुख-दु:ख , मान-अपमान ही द्वंद्वे समान असतात. या योग्याच्या ठिकाणी दुजेपणा उरला नसल्याने हे आत्मस्वरुपाचे तत्व सर्वव्यापी आहे की, स्थल कालाने मर्यादित आहे. या विषयीच्या साधकबाधक तर्कांची चर्चा त्याच्याठिकाणी आपोआप थांबते. असा योगी देहधारी असला तरी त्याने आपली इंद्रिये जिंकली असल्याने तो सहजच परब्रम्हाच्या बरोबरीचा ठरत असतो. लहानथोर असा भेद या योग्याच्या ठिकाणी राहत नाही. पर्वताएवढा सोन्याचा ढिग आणि



मातीचा ढेकुळ हे त्याला दोन्ही समान असतात. रत्न आणि दगड या दोन्हीतला फरक त्याच्या मनाला शिवत नाही. अशा योग्याच्या ठिकाणी सखा आणि शत्रु किंवा उदास आणि मित्र अशी भेदभावाची विचित्र कल्पना शिल्लक नसते. हे सांगतांना भगवंत म्हणाले, तेथ सुहद आणि शत्रु । कां उदासु आणि मित्र । हा भावभेद विचित्रु । कल्पूं कैचा ।। आत्मस्वरुपाचा अखंड प्रकाशाने प्रकाशमय असणा-या योग्याला अधम, उत्तम, शत्रु, मित्र, लहान-मोठा असा कसलाही भेद दिसत नाही. त्याला सर्वसमान वाटतात. सर्वांसाठी त्याची दृष्टी ही सुखदायी असते. तो वर-वरचा दिखावा करीत नाही. अशा व्यक्तींचा सहवास सोबतच्यांना सुख देऊन जातो. समाजात जातीभेद, वर्णभेद, लिंगभेद, प्रांतभेद, भाषाभेद असे अनेक भेद फोफावले आहेत. या भेदांनी समाजाला भेदून टाकले आहे. प्रत्येकजण आप-आपले वेगळे गट निर्माण करीत आहेत. आम्ही इतरांपेक्षा किती वेगळे व चांगले आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे वेगवेगळया कारणांनी विषमतेची दरी वाढत आहे. समदृष्टीने पाहणा-या योग्यांची आज समाजाला फार गरज आहे. समाजाच्या एकसंघतेचे वेगळे महत्व पटवून देण्याची गरज नसावी. समाजातच काय पण कुंटूंबा-कुंटूंबात सुध्दा एकता राहिली नाही. प्रत्येकजण आपले वेगळे अस्तित्व दाखवित असतो. समता, बंधुता, प्रेम, आपुलकी असे शब्द इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहेत. या शब्दांचा वापर केवळ दिखावा म्हणून अनेकजण करीत असल्याचे आपणाला दिसुन येत आहे. श्रीकृष्णांनी, अर्जुनाला समदृष्टी ठेवणा-या योग्याची जी लक्षणे सांगीतली आहेत., अशा योग्यांची आज आपणा सर्वांना फार गरज आहे. असा योगी आपणाला मिळो अथवा न मिळो आपण आपल्याअंगी अशा योग्याचे जेवढे गुण उतरविता येतील, तेवढे उतरविण्याचा यशस्वी प्रयत्न करु या. यासाठी आपली मानसिकता तयार होण्याची आवश्यकता आहे. आपली मानसिकता जर तयार झाली तर अशा स्थितप्रज्ञ योग्याची लक्षणे आपल्यात उतरायला वेळ लागणार नाही. आपल्या या प्रयत्नाला यश देण्यासाठी ज्ञानदेवांची श्री ज्ञानेश्वरी आपल्या सोबत आहेच.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# युवकांनी महापुरुषांच्या आदर्श विचारांची कास धरावी

## सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, सोलापुरातील चार हुतात्मे यांच्यासह महापुरुषांनी आपल्या आदर्श कार्यातून समाज परिवर्तन घडविले. भारत देश हा युवकांचा देश आहे तेव्हा युवकांनी या आदर्श महापुरुषांच्या विचारांची कास धरली पाहिजे. त्यांचे विचार आचरणात आणले पाहिजेत. तरच चांगला समाज घडेल, असे प्रतिपादन सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने युवा प्रेरणा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी संध्याकाळी ५ वाजता रंगभवन समोरील समाजकल्याण केंद्रात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगर रचना विभागाचे प्रथम लिपिक श्रीकृष्ण मस्तूद, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे माजी ग्रंथपाल नागनाथ नवगिरे, सुखकर्ता रुग्णालयचे डॉ.योगिराज बिराजदार, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

चेअरमन गंभीरे पुढे म्हणाले, श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घेऊन विविध उपक्रम राबवत आहे. हे कौतुकास्पद आहे. अशा संस्थांना समाजातील सर्वांनी आधार आणि पाठबळ दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.



### श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या युवा प्रेरणा पुरस्काराचे वितरण

युवा दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील विवेक ओझा (वित्त व लेखा व्यवस्थापक-महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सोलापूर मंडळ कार्यालय), डॉ.निखिल नवले (वैद्यकीय), शशांक भोसले (अम्बिशन इन्स्टिट्यूट), प्रा.रेखा राजमाने (एस ई एस पॉलिटेक्निक सोलापूर), महेश भाईकट्टी (सामाजिक-अनुभव प्रतिष्ठान), चेतन देवरकोंडा ( इव्हेंट मॅनेजमेंट) आदी मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहे.

यावेळी शिवजयंती निमित्ताने १९ तास १९ मिनिटे १९ सेकंद दांडपट्टा चालवून विश्वविक्रम केल्याबद्दल आदिनाथ खंडेराव, सुयश हुच्चे या दोन मावळ्यांचा श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या वतीने शाल व बूके देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक संस्थापक महेश कासट यांनी केले. सुत्रसंचालन प्रशांती काटवे यांनी केले तर आभार गणेश येळमेली यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संतोष अलकुंटे, महेश ढेंगले, दिपक करकी, श्रीनाथ श्रीरंग, अभिजीत व्होनकळस, प्रकाश आलंगे, विजय जाधव, शिवराज नगरकर, नागेश गंडगे, सुरेश लकडे, महेश बुब, मनुश्री कासट, अक्षता कासट, उमा मुगुंड, रुपा कुत्ताते, भारती जवळे, वंदना आलंगे, शुभांगी लचके आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## अनुभव महाकुंभातील



### भक्तांची सोय चांगली होती

१४४ वर्षानंतर महाकुंभ २०२५ प्रयागराज त्रिवेणि संगम पवित्र स्नान करण्यच सुवर्ण योग आमच्या भाग्यात होते. या ठिकाणी भाविक भक्तांसाठी अत्यंत चांगली सुविधा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने केलेले दिसून येत होत.




संपूर्ण संगम घट मार्ग पर्यंत दिशादर्शक बोर्ड लावण्यात आले होते. घाटच्या जवळ पास मोठमोठे यात्रिक निवासस्थान सोबत बेड व थंडी पासून बचाव करण्यासाठी उलन ब्ल्यांकेट व्यवस्था केले आहे. घाट परिसर वाळूमध्ये चालत जाणेसाठी लोखंडी प्लेट अथरले दिसून आले. पवित्रा संगम घाट परिसर मध्ये महिला व पुरुष करीता टॉयलेट व शुद्ध पिण्याची पाणी सोय मोफत केली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात व अँब्युलन्स सोय होती. या वेळी जागोजागी अन्नदान केले जात होते. संपूर्ण घाट परीसर मधे महिला भाविकांसाठी कपडे चेंज करीता १० बाय १० लोखंडी शेड नियोजन केले होते. या सबंध घाट परिसर सुरक्षा रक्षक पोलीस यंत्रणा सजग व सक्षम दिसून येत होते. याकरीता एक भाविक या नात्याने सरकार व प्रशासन अधिकारी सफाई कर्मचारी यांचं आभार आणि अभिनंदन करतो.

**-विजयकुमार मुत्यप्पा बिराजदार, शेळगी**
**मो.९८५०९७८७१२**

# महाशिवरात्रीच्या महापर्वावर सद्‌गुरू श्रीनिवासजी देणार दीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

महा शिवरात्री महापर्वानिमित्त बुधवार दि. २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी, अखंडमहायोगी परमपूज्य श्रीगुरुदेव श्रीनिवासजी काटकर यांच्या दिव्य सानिध्यात श्रीविद्याअखंडमहायोग परंपरेतील दीक्षित साधक-साधिका व तसेच हिंदू, जिज्ञासू, भाविकभक्त यांच्यासाठी पूज्य श्रीगुरुदेव श्रीनिवासजींचा दर्शनसोहळा, सत्संग व ध्यानशिबीर श्रीविद्याअखंडमहायोग सत्संग सभेच्या वतीने आयोजित करण्यात येत आहे.



महाशिवरात्रीच्या महापर्वावर पूज्य श्री गुरूदेव श्रीनिवासजींकडून उपस्थितांना शिव-शक्ती ध्यान दीक्षा प्राप्त होणार आहे अशी माहिती श्रीविद्याअखंडमहायोगी सत्संग सभेच्या वतीने देण्यात आली. सदरहू महाशिवरात्रीचा कार्यक्रम सोलापूरातील अक्कलकोट रोडवरील एम आय डी सी पोलीस स्टेशन समोरील पद्मावती कनवेंशन हॉल येथे सायंकाळी ६ ते ९ यावेळेत आयोजित केला आहे. सनातन हिंदूंची अशी श्रद्धा आहे की, महाशिवरात्री महापर्व हे भाविकभक्त आणि आध्यात्मिक जीवन जगू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी खूप महत्वाचे असते. अशा महापर्वावर आदिगुरू भगवान शंकर आपले कृपासामर्थ्य पृथ्वीवर वास करणाऱ्या कल्याणेच्छुक व्यक्तींना, साधकांना प्रदान करत असतात. ही भगवान शंकराची कृपा प्राप्त व्हावी या हेतूने श्रीविद्याअखंडमहायोग परंपरेचे विद्यमान आचार्य व महायोगी पूज्यश्री श्रीगुरुदेव श्रीनिवासजींचे दर्शन, सत्संग व शिवशक्ती ध्यान दीक्षा हा आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केला जात आहे. सत्संग व ध्यानशिबिराचा हा कार्यक्रम सश्रद्ध, भाविकभक्त व तसेच आध्यत्मिक जिज्ञासू असणाऱ्या सर्व महिला व पुरुष मंडळींसाठी खुला आहे.

# राज्यात पाण्याच्या नियोजना संदर्भात शासनासोबत काम करणार; भारतीय जैन संघटनेचा पुढाकार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भारतीय जैन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ फेब्रुवारी-**

भारतीय जैन संघटना ही मागील १३ वर्षापासून पाण्याच्या संदर्भात काम करत असून यावर्षीही महाराष्ट्र शासनासोबत पाण्यासंदर्भात काम करणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा यांनी दिली. यावेळी त्यांनी राज्य कार्यकारणी, विभाग अध्यक्ष, सचिव, जिल्हाध्यक्ष यांच्याशी पाण्याच्या नियोजना संदर्भात नियुक्त केलेले जिल्हा प्रतीनिधी यांच्याशी झूम मीटिंगव्दारे त्यांनी संवाद साधला.

मुथा म्हणाले, भारतीय जैन संघटना पाण्याच्या संदर्भात गेल्या १३ वर्षापासून काम करत असून पूर्वी तलावातील गाळ काढण्यासाठी, खोलीकरणासाठी पोकलेन व जेसीबी संघटनेने पुरविले. नंतर डिझेलची व्यवस्था सरकारने केली व आता सर्वच खर्च शासन करणार असून जैन संघटना प्रचार, प्रसार व जनजागृती करणार आहे .त्यासाठी शासनाची करार झालेला आहे. मागील दोन वर्षापासून संघटनेने तलावातील गाळ काढण्यासाठी खोली करणासाठी प्रचार प्रसार केला असून सरपंचांकडून याबाबत मागणी केली आहे. कोणत्या गावात हे काम करायचे आहे. याबाबत शासनाच्या आराखडा तयार असून प्रत्यक्ष काम एनजीओ किंवा ग्रामपंचायत सोसायटी कडून करून घेतले जाणार आहे.सदर कामे ही प्रतेक जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात होणार असून यासाठी



जवळपास ३०० कोटी रूपये शासनाने तरतूद केली आहे. सहा महिन्याच्या आत हे काम पूर्ण होणार आहे.

या कामासाठी लागणारी टेक्नॉलॉजी व ॲप हे संघटनेचे वापरणार आहे.संघटना जिल्हास्तरावर पगारी जिल्हा समन्वयकाची नियुक्ती करत आहे. या सर्व कामाची अधिक माहिती देण्यासाठी १ मार्च रोजी पुणे येथील वर्धमान प्रतिष्ठान मध्ये भारतीय संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मीटिंग आयोजित केली असुन जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर सांखला यांनी केले.राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, राज्य सचिव प्रविण पारख यांनी मनोगत व्यक्त केले.सभेची सुरुवात नवकार महामंत्राने संतोष भाभी बंब यांनी केली तर आनंद ओस्तवाल यांनी आभार मानले. तत्पूर्वी राज्य अध्यक्ष केतन शाह यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्तविक केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २५ फेब्रुवारी २०२५ | भौमप्रदोष |
| विक्रम संवत् २०८०-८१ | अवतार मेहेरबाबा जयंती |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वादशी (१२.४७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (१८.३०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - व्यतिपात (०८.१४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२४.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. जीवनात आनंदी रहाल.

# हुतात्मा स्मृती मंदिरात तीन दिवसीय मराठी चित्रपट गीतांचा महोत्सव

### रोज २५ ते ३० गाण्यांचे होणार सादरीकरण, सोबतच मराठी चित्रपटातील रंजक गोष्टी ऐकण्याची संधी

### दिग्गज कलाकारांचा समावेश असलेला विनामूल्य कार्यक्रम खास सोलापूरकरांसाठी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयमार्फत सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिरात तीन दिवसीय मराठी चित्रपट गीतांचा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

रसिकांसाठी विनामूल्य असलेल्या या कार्यक्रमात तीन दिवसात शंभर पेक्षा जास्त गाण्यांचे सादरीकरण आणि मराठी चित्रपटाशी संबंधित रंजक गोष्टी ऐकावयास मिळणार असल्याने, याचा सर्व सोलापूरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री ड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारघे यांच्या मार्गदर्शनातून सोलापूर मध्ये प्रथमच या प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे.

ऋषिकेश रानडे, आनंदी जोशी, कार्तिकी गायकवाड, अजित परब, संज्योती जगदाळे, सिद्धेश जाधव, संपदा माने, चैतन्य कुलकर्णी, मयुर सुकाळे अशा प्रथितयश गायकांसोबतच दीप्ती भागवत, सीमा देशमुख, विघ्नेश जोशी यांच्या रंजक निवेदनाचा आस्वाद घेता येणार आहे. मराठी चित्रपटाच्या इतिहासातील रंजक गोष्टी, गाजलेली गाणी आणि शंभर वर्षाचा मराठी चित्रपटाचा घेतलेला आढावा हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. कार्यक्रमासाठीच्या सन्मानिका हुतात्मा थेटर हुतात्मा स्मृती मंदिराच्या तिकीट विक्री केंद्रावर उपलब्ध आहेत.

सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण मारुती चवरे यांनी केलेले आहे.

# डॉ. असदुल्लः खान स्कूलचे वार्षिक विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

शहरातील प्रख्यात महाविद्यालय डॉ. असदूल्लाह खान इंग्लिश हायस्कूल एंड ज्यू. कॉलेज चा वार्षिक विज्ञान प्रदर्शन सोहळा ''टेक्नोफिलीया २०२५'' उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान संबधी विविध प्रकल्प यावेळी प्रदर्शित केले. जसे, रोबोटिक्स, सेन्सर्स वर आधारित प्रकल्प, मोबाईल एप्स, कोडींग वर आधारित शैक्षणिक गेम्स, प्लास्टोस्कोप, सौर उर्जेवर आधारित विवध प्रकल्प, तसेच विज्ञानाच्या मुलभूत संकल्पना दर्शविणारे सुमारे शंभर हून अधिक प्रकल्पांची मांडणी यावेळी



करण्यात आली होती. या कार्यक्रमास शहरातील नामवंत व्यक्तींनी भेट दिली त्यामध्ये प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. अमजद सय्यद, एड. रियाझ शेख, मुफ्ती मोहम्मद गौस, लोकप्रधान चे अय्याझ शेख, डॉ. वसिम शेख, सिराज सय्यद यांनी आपली उपस्थिती नोंदवून विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

# सोलापूर विद्यापीठात उत्कृष्ट वाचकांचा झाला सन्मान

## कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्रातर्फे डॉ.जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त उत्कृष्ट वाचकांचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.




विद्यापीठातील सभागृहात या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, शिवाजी शिक्षण मंडळाचे सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे यांची उपस्थिती होती. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत केले. यावेळी जयकुमार शितोळे यांचे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल व्याख्यान पार पडले. यावेळी त्यांनी मामासाहेब जगदाळे यांनी बार्शीत सुरू केलेल्या बोर्डिंग, शिक्षण संस्था याबद्दल माहिती दिली तसेच त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य मोठे असल्याचे सांगून गोरगरिबांना त्याचा फायदा झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी शिक्षक गटातून उत्कृष्ट वाचक पुरस्कार प्रा शिवानंद तडवळ, कर्मचारी गटातून सुप्रिया जाधव-अनभुले आणि विद्यार्थी गटातून ओंकार सोनवले, स्वाती कोळी यांनी पटकाविले. यावेळी त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच पुस्तक परीक्षण स्पर्धेतील विजेते विद्यार्थी भारती गुरव, सुजाता गावडे, अमीर बारस्कर यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. वरिष्ठ ग्रंथालय सहायक डॉ. पल्लवी सावंत यांनी आभार मानले.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (६२) विरासत

डॉक्टरजींनी विशेष रूपाने समर्थ रामदासांद्वारे रचित दासबोध व लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिलेले गीतारहस्य यातून गहन बौद्धिक प्रेरणा मिळवली होती. विदेशी अक्रांतांच्या हल्ल्याचा सामना करण्यासाठी समर्थांनी एकूण ११०० मठ स्थापन केले होते व शक्ती-बुद्धि-बल देणाऱ्या मारुतीची पूजा केली होती. डॉक्टरांनी सुद्धा जागोजागी स्वयंसेवकांची शाखा उभे केली होती. व राष्ट्रभक्तीसाठी भारत मातेची पूजा केली होती गुरु रामदासांकडून मार्गदर्शन घेऊन शिवाजी महाराजांनी हिंदू समाजाला संघटित केले. आंतरिक कलह आणि मतभेदांना तिलांजली दिली होती. हे दोघेही सद्गुरू कर्मयोगी बना, नुसती शब्दांची हवा फेकू नका, असा संदेश देत असत. डॉक्टरांनी डायरीत समर्थ रामदासांची वचने लिहिली होती. ती डायरी नंतर श्री गुरुंजीजवळ होती. डॉक्टरजी शुभम् करोति कल्याणम्।

श्रीरामरक्षा। शाखेत म्हणत असत पत्राच्या मध्यभागी 'श्री' लिहीत असत. व त्याखाली संत तुकारामांचा दया तिचे नाव, भूतांचे पालन, आणिक निर्दालन कंटकांचे असे लिहीत असत. व त्यानंतर पत्र प्रपंच करायचे. अर्थात केवळ अहिंसा / अनुकंपेनी समाजाचे कल्याण होणार नाही. तर येणाऱ्या संकटांचा समूळ नाश महत्त्वपूर्ण आहे, हे समजावून सांगताना म्हणत, कोणत्याही राष्ट्राचा इतिहास हा त्या राष्ट्राचा प्राण असतो. समर्थ रामदास स्वत:साठी काहीच मागत नव्हते. ते समाजाचे कल्याण व उत्तम आत्मबोधासाठी प्रयत्नशील होते. तोच आदर्श डॉक्टरजींचा पण होता. थोडक्यात आम्हाला आमच्या विरासतीवर गर्व हवा, हे डॉक्टरजी पटवून देत असत.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### जय-विजय शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाळू लोखंडे

**अकलूज, दि. २४ फेब्रुवारी-**

जय-विजय शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित अकलूज या पतसंस्थेच्या नूतन चेअरमनपदी बाळू बाबू लोखंडे तर व्हाईस चेअरम नपदी राजेंद्र शांताराम लोहार यांची एकमताने बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जाधव साहेब यांनी काम पाहिले.या खेळीमेळीच्या वातावरणातील निवड प्रक्रियेला जय विजय शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष मिसाळ, मार्गदर्शक अशोकभाऊ रुपनवर, संघटनेचे जिल्ह्याचे नेते एकनाथ कदम,माजी चेअरमन दत्तात्रय गायकवाड, माजी व्हॉइस चेअरमन विजया गुडे - सरूडकर मॅडम , संघटनेचे मार्गदर्शक प्रशांत सरूडकर सर, सर्व संचालक - मधुकर यादव, दिलीप मुळे, कविता शेळके, सोमनाथ मिसाळ, बाबासाहेब चंदनशिवे, धनंजय पिसे, संतोष रुपनवर, बापू हाके, राजेश झेंडे, अशोक राजगुरू, बशीर मुलाणी,पतसंस्थेचे सचिव ज्ञानेश्वर मगर , जय विजय शिक्षक संघाचे अध्यक्ष विजय अस्वरे ,जय विजय शिक्षक संघाच्या महिला आघाडी अध्यक्षा वनिता शिंदे मॅडम, संघटनेचे कार्याध्यक्ष हमीद मुलाणी व संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. निवडीबद्दल नूतन चेअरमन व व्हॉईस चेअरमन यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी अभिनंदन केले.



### मोडनिंब येथे विकासकामाचे उद्घाटन

**मोडनिंब, दि. २४ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथील प्रभाग क्र. पाच दत्तनगर येथे माजी खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांच्या निधीतून दहा लाख रुपये निधी मंजूर असलेल्या विकासकामाचे उद्घाटन करण्यात आले. या विकासकामाचे उद्घाटन भारतीय जनता पार्टी मंडल अध्यक्ष योगेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राहुल पाटील, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष हनुमंत कुंभार, हनुमंत पाटोळे, डॉ. प्रदीप पाटील, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी धनाजी लादे, किसान मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. गणेश सुर्वे, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष नंदकुमार मोरे, शहराध्यक्ष विशाल पाटील, ओबीसी सेलचे शहाजी माळी, अमोल काटकर, विनायक खिलारे, सागर शेलार, संतोष चवरे, नकुल खंदारे, श्याम काटकर, रोहित कणसे, भारत गुमते, सुभाष सुर्वे, निखिल सुर्वे, प्रशांत खिलारे,यासह मोडनिंब परिसरातील ग्रामस्थ व भारतीय जनता पक्षाचे माढा तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### रिपाइं एकतावादीची कार्यकारिणी जाहीर

**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी अक्कलकोट तालुका शहर कार्यकारणी निवड करण्यात आली. लिंबाजी कलकुटगी तालुका शेतकरी संघटना, सागर बरबडे दहिटणे विभाग शेतकरी संघटना, दाजी चव्हाण शेतकरी संघटना तालुका सचिव, नामदेव गरडे कामगार आघाडी दहिटणे विभाग, मजनू कोंडीबा नदाफ कलाकार संघटना दहिटणे विभाग, दिगंबर सालपे वाहक चालक संघटना तालुकाध्यक्ष, बलभीम मधुरकर कामगार सेल तालुका सचिव या पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली निवड करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब इंदिसे, युवा अध्यक्ष भैय्यासाहेब इंदिसे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विलास निकम यांच्या आदेशाने सोलापूर जिल्ह्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचे काम प्रामाणिकपणे व निष्ठेने मोठी ध्येय धोरण ठेवून पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी रोजगार आघाडी प्रदेशाध्यक्ष विकीबाबा चौधरी, राम चव्हाण, शंकर चव्हाण, दिनेश रसनभैरे, तम्मा चौधरी, शंकर चव्हाण, ताजुद्दीन शेख, सोमनाथ बनसोडे उपस्थित होते.



### घोळसगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला विविध साहित्यांची भेट

**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा घोळसगाव येथील माजी विद्यार्थी कमलाकर सुतार यांनी स्वच्छतेचा संदेश देत शाळा स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी जिल्हा परिषद मराठी शाळेतील प्रत्येक वर्गासमोर कचरा गोळा करण्यासाठी कचराकुंडी, सुपली आणि झाडांना पाणी देण्यासाठी झाऱ्या वस्तू शाळेस भेट दिली. एसबीआय बँक शाखा घोळसगाव येथे असल्यामुळे त्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांचे बचत खाते काढण्यात मदत केली. त्यांच्या सहकार्यामुळे जिल्हा परिषद मराठी शाळा व शाळा व्यवस्थापन समिती यांच्यातर्फे त्यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर पाटील, रामेश्वर दरेकर, अमोल गुंजोटे, मुरलीधर वागदकर उपस्थित होते. आभार मुख्याध्यापक सोमनाथ मोरे यांनी मानले.

# जेऊर झाले शिवमय

## शिवजयंती मिरवणूक उत्साहात; पारंपारिक वाद्यांसह, टाळ-मृदंगाचा घुमला नाद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२४ फेब्रुवारी-**

संभाजी ब्रिगेड मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने जेऊर येथे सनई चौघडा व टाळ मृदंगाच्या व ढोल ताशाच्या गजरामध्ये शिवजयंती मिरवणूक उत्साहाच्या वातावरणाम ध्ये साजरी करण्यात आली. त्यावेळेस मूर्तीचे पूजन माता-भगिनी व वारकरी संप्रदाय व जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते मूर्तीस पुष्पहार घालून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली.तसेच मुस्लिम समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती पुष्पहार घालण्यात आला.

यावेळी अहिल्यामाता होळकर, राजश्री शाहू महाराज, संत गाडगे महाराज व इतर महापुरुषांची एक हजार पुस्तके उपस्थितांना वाटप करण्यात आली. यावेळी लहान मुला-मुलींनी राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवराय, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, फतिमा शेख,व माता रमाई यांच्या वेशभूषेतील रणरागिनी घोड्यांवर स्वार झाल्या. घोडे आणि उंटांचा समावेश होता.जेऊर आणि शेटफळ व कोर्टी येथील वारकरी संप्रदायातील मान्यवरांनी टाळ, वीणा, मृदंगाच्या गजरात मिरवणुकीमध्ये सहभागी झाले. रथामध्ये सजावट केलेली

### शिवभोजनाची व्यवस्था

शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने सर्व शिवप्रेमींसाठी भोजनाची व्यवस्था केली होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व मराठा सेवा संघ जिजाऊ ब्रिगेड व संभाजी ब्रिगेड या सर्व पदाधिकाऱ्यांनी यशस्वीरित्या कार्यक्रम यशस्वी केला.

आकर्षक छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती लक्ष वेधून घेत राहिली. हा रथ विद्युत रोशनाईने झळाळून निघाला. रथाच्या समोरील बाजूस मावळ्यांची वेशभूषा करून तरुणाईने लक्ष वेधले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मिरवणुकीस लक्षवेधी ठरले शेटफळ (ना) येथील लेझीम पथक शेटफळ येथील ग्रामस्थांचा यामध्ये सहभाग होता.

योद्धा करिअर अकॅडमी येथील मुलांनी व मुलींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गीतावर व देश गीतावर लेझीम सादर केले. तसेच कोंढेज व पांगरे येथील ग्रामस्थांनी जुन्या पारंपरिक पद्धतीने लेझीम सादर केले. जेऊर येथील लहान



मुले व मुली यांचा देखील लेझीम पथकामध्ये समावेश होता. कोल्हापूर येथील लेझीम करंडी व दांडपट्टा व छत्रपती वीर शिवाजी महाराज ग्रुप व शिवनेरी मर्दानी खेळ व झांज पथक व श्रीराम हलगी ग्रुप व गोफ लेझीम पथक तसेच बाभूळगाव येथील हलगी पथक व स्वराज्य मर्दानी खेळ सर्व पथकांनी आकर्षक अशी कला सादर केली.




### चप्पळगाव येथे शिवजयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

छ्त्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान चपळगाव यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवजयंतीचे औचित्य साधून सायंकाळची छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे प्रथमेश इंगळे, उत्तर पोलिस ठाणे अक्कलकोटचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी शिवजयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील सर्व स्पर्धकांनी अत्यंत सुंदर पद्धतीने आपले विचार व्यक्त केले. प्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी श्रीकांत झिपरे, सुनिल पवार, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, तुषार मोरे, स्वामी, चिदानंद हिरेमठ, मेजर माने, विजयकुमार नन्ना, संजय बानेगाव, रमेश शिंदे, अविनाश कदम, प्रकाश सुरवसे, शिवाजी संभाजी सुरवसे, मल्लिनाथ पाटील, सुरेश इंगुले, विशाल सुरवसे, शाम इंगुले, अविनाश इंगुले, संजय भोसले, महेश इंगुले, श्रीकांत दुलंगे, सचिन म्हेत्रे, अंबना डोळे, श्रीमंत इंगुले, प्रदीप सुरवसे, मेघराज इंगुले, योगेश मोरे, संतोष मोरे, गंगाराम भोसले, गोकुळ मोरे, राम मोरे, अभिषेक भोसले, स्वाम ीराज इंगुले, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मनोज इंगुले, सचिव सुरेश सुरवसे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन यशवंत दुलंगे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर कदम यांनी मानले.

# जवळाच्या सरपंचपदी सज्जन मागाडे यांची बिनविरोध निवड

## दीपकआबांनी निर्माण केला सामाजिक समतेचा आदर्श

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२४ फेब्रुवारी-**

जवळा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सज्जन मागाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सुषमा घुले यांनी आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या सरपंचपदाची सोमवार दि.२४ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय, जवळा येथे निवडणूक पार पडली.





या निवडणुकीत सरपंच पदासाठी सज्जन मागाडे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सज्जन मागाडे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला.

स्व.आ.काकासाहेब साळुंखे पाटील यांनी कधीच जातीपातीचे राजकारण केले नाही. त्यांच्या विचारांचा आणि कर्तृत्वाचा वारसा जपणाऱ्या दिपकआबा यांनीही कधीच जातीपातीला थारा दिला नाही.

आज दिपकआबांच्या याच राजकीय दूरदृष्टीमुळे जवळा गावाला प्रथमच दलीत सरपंच लाभला आहे. दिपकआबांनी जो विश्वास आपल्यावर दर्शवला आहे तो नक्कीच सार्थ ठरवून आबांच्या नेतृत्वात गावाला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी प्रयत्न करेन असे मत सज्जन मागाडे यांनी यावेळी व्यक्त केले.

### समाजासमोर ठेवला वेगळा आदर्श

विशेष म्हणजे जवळा गावचे सरपंचपद खुल्या प्रवर्गासाठी राखीव असतानाही माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी बौद्ध समाजातील सुशिक्षित तरुण सहकाऱ्याला स्वतःच्या गावाचा बिनविरोध सरपंच बनवून एक वेगळाच सामाजिक आदर्श सांगोला तालुक्यासमोर निर्माण केला आहे.

# रणजितदादांचा शिलेदार आपल्या दारी अभियान

## माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २४ फेब्रुवारी-**

माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त पालकमंत्री जयाभाऊ गोरे, माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांच्या माध्यमातून पिलीव जिल्हा परिषद गटातील सर्वसामान्य नागरिकांची शासन दरबारी प्रलंबित असलेली व्यक्तीगत कामे व गावोगावी जाऊन वाड्यावस्त्यांवरील समस्या सोडविण्यासाठी रणजितदादांचा शिलेदार आपल्या दारी हे अभियान भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे यांच्या आयोनामधे सुरू करण्यात येत आहे.



या अभियानांतर्गत तलाठी कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत तसेच ग्रामसेवक ते जिल्हा परिषदेपर्यंत प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी. पिलीव जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावामध्ये जाऊन वाड्यावस्त्यापर्यंत घरोघरी पोहचून वाड्यावस्त्यांवरील समस्या जाणून घेऊन त्या वरिष्ठांपर्यंत पोहचवणार आहे. त्या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार असे शिवराज पुकळे यांनी सांगितले. पिलीव गटातील सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लागतील हा उद्देश या अभियानाचा आहे. या निमित्ताने भाजपा युवा मोर्चा सोलापूर जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे हे पिलीव जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावामध्ये वाड्या वस्तीपर्यंत पोहोचून प्रत्येक घरोघरी जाऊन तेथील सम स्या लेखी स्वरूपात घेणार आहेत. मंगळवार २५ फेब्रुवारी पासून गुरुवार ६ मार्चपर्यंत चालणार आहे.



# भगवंत महोत्सवासाठी उद्योजक स्वराज लोखंडे यांनी दिली पाच लाखांची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

बार्शीतील श्री भगवंत मंदिर म्हणजे श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचे प्रतीक. दरवर्षी श्री भगवंत प्रगट उत्सवानिमित्त वैशाख महिन्यच्या सुरुवातीस आयोजित होणाऱ्या भगवंत महोत्सवासाठी अनेक श्रद्धाळू भक्तगण, उद्योजक, व्यावसायिक, नोकरदार आणि शेतकरी वर्ग आपापल्या श्रद्धेनुसार देणगी अर्पण करतात. यंदाच्या महोत्सवाच्या तयारीची सुरुवात होत असतानाच एक विशेष घटना घडली. तरुण उद्योजक स्वराज लोखंडे यांनी तब्बल पाच लाख रुपयांची देणगी भगवंत महोत्सवासाठी भगवंताच्या चरणी अर्पण केली.

याप्रसंगी माजी आमदार राजेंद्र राऊत, भगवंत महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, रावसाहेब मनगिरे, नाना सुरवसे, मदन गव्हाणे, अजित कुंकूलोळ तसेच स्वराज लोखंडे यांचे मित्र यश कुंकूलोळ आणि अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. स्वराज राजेंद्रसिंह लोखंडे यांचा व्यवसाय गेल्या काही वर्षांत वेगाने फुलला आहे. परंतु, २०२४ हे वर्ष त्यांच्यासाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत कठीण होते. व्यवसाय अडचणीत आला, मार्ग सापडत नव्हता आणि मनात अस्वस्थता होती. अशा स्थितीत त्यांनी भगवंताच्या मंदिरात जाऊन एकटा बसून भगवंता, माझ्या उद्योगाला भरभराट दे. मी माझ्या नफ्याचा अर्धा टक्का तुझ्या चरणी आणि भक्तांच्या सेवेसाठी अर्पण करेन! अशी प्रार्थना केली. ही प्रार्थना श्रद्धेने आणि भक्तीने भरलेली होती. त्यांच्या या प्रार्थनेला यश आले. वर्षभरात त्यांच्या व्यवसायाने अभूतपूर्व यश मिळवले. भगवंताने माझ्यावर जी कृपा केली, त्याची ही छोटीशी परतफेड आहे, असे सांगत स्वराज लोखंडे यांनी यंदा अर्धा टक्का नफा भगवंत महोत्सवासाठी अर्पण केला. त्यांनी मंदिर ट्रस्टला पाच लाख रुपयांचा चेक प्रदान केला. याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# शाळेचे ऋण कधीही फेडता येत नसतात : पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २४ फेब्रुवारी-**

आपण कितीही मोठे झालो तरीही ज्या शाळेमुळे आपण मोठे झालो त्या शाळेसाठी काहीतरी करण्याची जिद्द मनी बाळगणे ही फार मोठी गोष्ट असून नेमकी तीच गोष्ट, दत्तू आण्णा पाटील विद्यालयात शिकून गेलेल्या सन२०००ते २००१ या वर्षातील १० वि च्या विद्यार्थ्यांनी करून एक आदर्श निर्माण केला असून ,आपण कितीही मोठे झालो तरी ज्या शाळेने आपणास घडवले त्याचे ऋण कधीच फेडता येत नसतात असे प्रतिपादन तुळजापूर तालुक्याच्या माजी पंचायत समि ती सभापती, तथा चिवरी येथील ज्ञानविकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मनीषाताई पाटील यांनी व्यक्त केले.

त्या चिवरी येथील दत्तू पाटील (आण्णा) म ाध्यमिक विद्यालयात सन २००० ते २००१ या शैक्षणिक वर्षात शालांत प्रमाणपत्र परीक्षेत बसलेल्या म्हणजेच दहावी बॅच च्या ४५ विद्यार्थ्यांनी आयोजित स्नेहबंधमध्ये बोलत होत्या. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटराव पाटील, मुख्याध्यापीका लक्ष्मी बिराजदार उपस्थित होते. जुन्या आठवणींच्या स्मृतीला उजाळा देऊन भूतकाळातील आनंदाच्या क्षणांना पुन्हा एकदा अनुभवण्याचा क्षण साजरा करण्यासाठी स्नेह बंध अर्थात (गेट-टुगेदर) हा कार्यक्रम संपन्न केला असल्याचे सांगितले. यावेळी शाळेतील शिक्षक शिंदे एस. एम., शिंदे एस. बी., मस्के एस. ए., सूर्यवंशी के. एस., ठाकूर के. पी., ढगे एस. बी., शिंदे बी.बी., युवा प्रशिक्षणार्थी महेश सूर्यवंशी, घोडके पी. एल., सूर्यवंशी बी. एल. आदी शिक्षकांनी शाळेचे तास घेतले. या स्नेहबंध कार्यक्रमात अनेक वेगवेगळे मनोरंजनपर खेळ घेतले गेले. त्या खेळात प्रथम येणाऱ्या खेळाडूस ट्रॉफी देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम अतिशय आनंदात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न करण्यासाठी राजकुमार भातागळे, विकास बलसुरे, सुरेश हिंगमिरे, आनंद साखरे, भैय्या इंगळे, अमोल बिराजदार, वैभव कोरे, रमा भुजबळ, राहुल नगदे, आण्णा काळे, लक्ष्मण शिंदे, गिरजप्पा झांबरे यांनी विशेष प्रयत्न केले. प्रास्ताविक प्रा. अश्विनी लबडे याने केले तर सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले. आभार स्वाती सूर्यवंशी यांनी मानले.

# निरगुडीत विविध धार्मिक कार्यक्रम

## महाशिवरात्रनिमित्त आयोजन; हवा मल्लिनाथ महाराजांची राहणार उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील आळंद तालुक्यातील निरगुडी येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान जागृत श्री रेवणसिद्धेश्वर मल्लिनाथ देवस्थान येथे महाशिवरात्र यात्रा महोत्सव यंदाही देश देशभरातील लाखो भाविकांच्या उपस्थित विविध धार्मिक सामाजिक व देशभक्ती कार्यक्रम मोठ्या थाटात शिवभक्तांनी आपले जिवन सार्थक करून शिवभक्तीतुन देशभक्ती मार्गाकडे वळावे, म्हणून आंध्रा, कर्नाटका, गुजरात आणि महाराष्ट्र अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात जय भारतमाता सेवा समितीची शाखा स्थापना केली असून सुमारे साडेसहा हजारांहून अधिक शिवलिंग देवस्थानाची उभारणी केली आहेत.

निरगुडी येथील हे सर्वोच्च देवस्थान



असल्याने देशभरातून लाखो भाविकांनी येथे श्रीचे रथोत्सव दर्शन आणि महाप्रसादाची लाभ घेण्यासाठी आवश्य उपस्थित राहतात. दरम्यान बैल, खोंड, गाईसह अनेक जनावराचे गड्डा यात्रा भरविण्यात आला असून बुधुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री दिवशी देशभक्तीसह भजन भारूड कीर्तन आदी भरगच्च कार्यक्रम आयोजित केला आहे. रात्री ८ वाजता निरगुडी येथील वें. कै. शंकरय्या स्वामी यांच्या घरातून श्री रेवणसिदेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत श्रीचे पालखी, नंदिध्वजचे पुरवंतसह विविध वाद्यसमवेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. गुरूवार दि.२७ मार्च रोजी आमवशाच्या पहाटे ५ वाजता श्रीचे रुद्राभिषेक पूजा, अग्नी पूजा, यानंतर दिवसभर सर्व धर्माचा आणि सर्व पक्षाचा प्रमुख उपस्थिती धर्मसभा कार्यक्रम होणार आहे. दुपारी ४ वाजता श्रीचे रथोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानंतर जंगी पैलवानाची भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे. दि.२६ व २७ फेब्रुवारी रोजी देशभक्ती गीत गायन भजनासह श्रीचे दर्शन सोहळा कार्यक्रम होणार असून या काळात दिवस रात्र सलग महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आला आहे.



### सांगोल्यात घरकुल मंजूर आदेश, पहिला हप्ता वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२४ फेब्रुवारी-**

बचत भवन, पंचायत समिती, सांगोला येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत घरकुल मंजूर आदेश व पहिला हप्ता वितरण करण्यात आला.

आ. डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आ. दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या हस्ते लाभार्थींना मंजुरीचे आदेश वाटप करण्यात आले. यावेळी १० ग्रामपंचायत म धून ३०० लाभार्थी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, विस्ताराधिकारी अमोल तोडकरी, देवराज पुकळे, मिलिंद सावंत, पुंडलिक गंगदे, अभिजीत पवार, घरकुल विभागातील भारत हत्तेकर, एच.सी.सुतार, कांबळे, चंदनशिवे, बुणगे, कमलेश सातपुते, प्रीतम गोंगाने, खाडे, आनंद जाधव या अधिकाऱ्यांनी काम पाहिले.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २४ फेब्रुवारी-**

गरीब परिस्थितीतून आई वडील भावांच्या सहकार्यातून कष्टाच्या व चिकाटीच्या जोरावर उद्योग उभा करून गरीब परिस्थितीची जाण असणारे नातेपुते येथील युवा उद्योजक सोमनाथ महादेव काळे यांनी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा मोरोची (ता. माळशिरस) येथील आश्रम शाळेतील १६१ मुला-मुलींना चांगल्या क्वालिटीचे शालेय साहित्य वाटप करून आपला वाढदिवस साजरा केला.

यावेळी शाळेतील छोट्या मुला मुलींनी सोमनाथ काळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त केला. यावेळी नवनाथ राऊत, श्रीकांत बाविस्कर, विलास भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त



केले. यावेळी रोहित टिंगळे, तुकाराम विरकर, शिवम काळे, सुरज डफळ, शितलकुमार कोल्हाळे, आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका सूळ, मुख्याध्यापक माने, सहशिक्षक कांबळे, सहशिक्षिका मडके, कर्मचारी काकडे आदी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### अन्नछत्र परिसरात वाहतोय भक्तीचा झरा : अमित बेरे

**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या धार्मिक कार्यामुळे न्यासाचा परिसर हा भक्तीसागराचा झरा असल्याचे मनोगत स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बीकेसी मुंबईचे व्यवस्थापक अमित बेरे यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले सहपरीवार आले असता न्यासाचे पुरोहित अपपू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, या वेळी ते बोलत होते. यावेळी प्रवीण घाडगे, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, भारत पाटील, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस. के. स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी उपस्थित होते.



### मोदी सरकारमुळे गरिबांच्या घरांचे स्वप्न सत्यात : यतीन शहा

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नामुळे राज्यातील निवार्यापासून वंचित असणाऱ्या वीस लाख लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळत आहेत. देशात एकही कुटुंब हक्काच्या घरापासून वंचित राहू नये, म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. म्हणून लाभार्थ्यांनी स्वप्नातील घर सत्यात उतरविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन भाजपाचे चिटणिस यतीन शहा यांनी केले. भंडारकवठे येथील ग्रामपंचायतीकडून ११३ लाभार्थ्यांना पंतप्रधान आवास योजनेचे मंजुरीपत्र देताना ते बोलत होते. घरकुल मंजुरीचे पत्र वितरण विविध मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी संदीप खरबस, माजी पंचायत समिती सदस्य महादेव कमळे, उपसरपंच सरिता तुर्भे, ग्राम पंचायत सदस्य संगप्पा बिराजदार, सोमनिंग कमळे, ग्रामपंचायत अधिकारी डी. सी. कोळी, माजी पंचायत समिती सदस्य अमसिद्ध कांबळे, लक्ष्मीकांत बबलेश्वर, अप्पू शिरगुर यांच्यासह लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### भोईरे येथील तलावाची झाली स्वच्छता

**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

भोईरे येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन शाखा बार्शी व वैराग यांच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या आदेशाने अमृत प्रोजेक्ट 'स्वच्छ जल स्वच्छ मन' अंतर्गत भोईरे तलाव परिसर स्वच्छ करण्यात आला. यासाठी भोईरे गावचे सरपंच दशरथ टेकाळे, बाबा देशमुख, शहीद मेजर कुणाल गोसावी संस्थेचे संस्थापक शिवशंकर गोसावी, बार्शी ब्रँच इन्चार्ज महात्मा शशिकांत शिंदे, वैराग ब्रँच मुखी महात्मा अंगत अंबुरे, राजेंद्र चव्हाण, विठ्ठल बचुटे, उत्तम कावरे यांची उपस्थिती लाभली. आज संपूर्ण भारतभर १५०० पेक्षा जास्त ठिकाणी 'स्वच्छ जल स्वच्छ मन' अभियान अंतर्गत स्वच्छता कार्यक्रम घेण्यात आला. बार्शी व वैराग ब्रँचच्यावतीने दोन्ही युनिटमधील अधिकारी आ. किशोर ढोले, आ. ऋषिकेश शेळके, आ. संगीता भोसले, आ. चंद्रकांत उंबरे, आ. नागनाथ अंकुश, आ. नीता घोडके, साधसंगत व सेवादल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी सर्वांचे आभार बार्शी ब्रँच इन्चार्ज महात्मा शशिकांत शिंदे यांनी मानले.

### सहकारी युनियनच्या अध्यक्षपदी एम. सी. मुल्ला यांची बिनविरोध निवड

**विजयपूर, दि. २४ फेब्रुवारी-**

विजयपूर जिल्हा सहकारी युनियन निच्या आज झालेल्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत एम. सी. मुल्ला यांची बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक अधिकारी दानेश्यरी उमचगीमठ यांनी पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी उपाध्यक्ष एस. एस. तळेवाड, तसेच संचालक के.बी. पाटील, आर. एम. तोटद, शशिधर एम. बेण्णूर, दानप्पा एम. दुर्ग, शिवनगौडा एस. बिरादार, श्रीहर्षगौडा एस. पाटील, एन. ए. नावी, वीरनगौडा एस. पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी के.एन. पारगोंड, पी.एस. कणमेश्वर उपस्थित होते.

## मोडनिंब येथे विजेचा लपंडाव; नागरिक त्रस्त

**● लोडशेडिंग व्यतिरिक्त वीजपुरवठा खंडित; विजेची करावी लागते प्रतिक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २४ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) येथे विजेच्या सततच्या लपंडावाने नागरिक त्रस्त झाले आहेत. वीज पुरवठा कोणत्या ना कोणत्या कारणाने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार सातत्याने सुरू आहेत. मागील काही महिन्यांपासून मोडनिंब आणि परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे. रात्री अपरात्री बत्ती गुल होत असल्याने ऐन उन्हाळ्याच्या दिवसात नागरिकांचे हाल होत आहेत.

शहरात दिवसांतून किमान चार ते पाच वेळा वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडत असून महावितरणच्या



कारभाराबाबत नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.वीज पुरवठा खंडित झाला की नागरिकांना प्रतिक्षा करावी लागते.महावितरणकडून वेळी अवेळी होत असलेल्या विजेच्या लपंडावाचा परिणाम नागरिकांच्या कामकाजावर होत आहे.

तंत्रज्ञानाशी संबंधित संगणकीय खासगी तसेच व्यावसायिक कामे घरोघरी चालत आहेत. अशावेळी विजेचा लपंडाव होत असल्याने संगणक व इतर वस्तूमध्ये तांत्रिक बिघाडाच्या शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे विजेचा लंपडाव सुरु असताना वीज देयक मात्र ठरल्याप्रमाणे येते. ते भरावेच लागते. त्यामुळे, महावितरणने तातडीने लक्ष देऊन ग्रामीण भागात वीजपुरवठा अखंडित सुरू ठेवावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

#### विजेच्या लंपडावामुळे पाणी नाही..

मोडनिंब शहरात घरोघरी होणारा पाणी पुरवठा हा विजेवर अवलंबून असल्याने वीज असेल तरच पाणी असते. पाणी येण्याची वेळ झाली की नेमकी बत्तीगुल होते. ह्याचा फटका महिलांच्या दैनंदिन काम काजावर होऊ लागला आहे. विजेची प्रतीक्षा करत बसावे लागते.

दहावी बारावीच्या परीक्षा चालू आहेत.लोड शेडिंग व्यतिरिक्त दहा-बारा वेळा लाईट जाते. त्यामुळे व्यापारी दुकानदार यांना व्यवसायात त्रास सहन करावा लागत आहे. वारंवार वीज पुरवठा खंडित झाल्याने शेतकरी, विद्यार्थी आणि नागरिक त्रस्त आहेत.

**- दत्ता सुर्वे, माजी सरपंच**

## अभ्यासाबरोबरच कौशल्यपूर्ण शिक्षणाची गरज

**● प्राचार्य डॉ. एस. सी. अडवितोटे : अक्कलकोटच्या खेडगी कॉलेजमध्ये कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणाबरोबर कौशल्यपूर्ण शिक्षण घेण्याची गरज आहे. आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देत कौशल्ये विकसित केली पाहिजेत. त्या माध्यमातून व्यक्तिमत्त्वाचा विकास साधावा. बातमी लेखन व सूत्रसंचालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर करिअरच्या अनेक संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन प्रा.डॉ. एस.सी. अडवितोट यांनी केले.

अक्कलकोटमधील सी. बी. खेडगीज महाविद्यालयात पीएम उषांतर्गत सुरू करण्यात आलेल्या



बातमी लेखन व सूत्रसंचालन या प्रमाणपत्र वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रा. विजय साळवे, प्रा. डॉ. डी. डी. बनसोडे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी पीएम उषाचे समन्वयक डॉ. जी. एस. धबाले होते. यावेळी प्रा. डॉ. डी. डी. बनसोडे म्हणाले, सूत्रसंचालन ही एक कला आहे. ती विकसित करण्यासाठी वाचन आणि चालू घडामोडीचे ज्ञान आवश्यक आहे. विद्यार्थीदशेपासूनच सभाधीटपणे व्यासपीठावर बोलण्याची सवय करून घेतल्यास सूत्रसंचालनाची ही कला विकसित होते. संत वचनं, सुभाषितं, कविता, चारोळ्या यांचा संग्रह जवळ असला पाहिजे. ज्यामुळे सूत्रसंचालन नीटपणे करता येते. अध्यक्ष डॉ. जी. एस. धबाले म्हणाले, केंद्र सरकार व यूजीसी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी सतत नवनवीन अभ्यासवर्ग सुरू करत आहे. त्यातून विद्यार्थ्यांमधील कौशल्ये विकसित करण्यासाठी महाविद्यालयही सतत प्रयत्नशील आहे. त्यामुळे भविष्यात कौशल्ये अंगी असलेले विद्यार्थी सक्षमपणे पुढे जातील. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सी. डी. अणेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ए. जी. माळगे यांनी केले. आभार प्रा. एस. जे. पाटील यांनी मानले. या वेळी प्रा. एस. एम. परांजपे, डॉ. ए. एम. देशमुख, डॉ. किशोर थोरे उपस्थित होते.

## महाशिवरात्रीनिमित्त वटवृक्ष मंदिरातील दिनक्रमात बदल

**रात्री १० ते १२ या वेळेत महापूजा, आरती**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात बुधवार दि. २६ फेब्रुवारी रोजी माघ वद्य त्रयोदशी रोजी महाशिवरात्री संपन्न होणार आहे.



यंदा महाशिवरात्री उत्सव निमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील दिनचर्येत व स्वामींच्या नित्योपचारात पारंपारीक पध्दतीचे बदल करण्यात आले आहेत अशी माहिती मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली. सालाबाद प्रमाणे सकाळी साडेअकरा वाजता नित्यनेमाने होणारी नैवेद्य आरती व रात्रीची शेजारती महाशिवरात्रीमुळे होणार नाही. महाशिवरात्री रोजी रात्री १० ते १२ या वेळेत पुरोहीत मोहन पुजारी व मंदार पुजारी यांच्या विधीवत मंत्रोच्चारात रुद्राभिषेक व महाशिवरात्रीची महापूजा होऊन रात्री बारा वाजता श्रींची आरती होईल याची सर्व स्वामी भक्तांनी नोंद घ्यावी अशी माहीतीही महेश इंगळे यांनी याप्रसंगी देऊन यावेळी भाविकांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

**वयाच्या तिसऱ्या वर्षातच केला ऐतिहासिक पराक्रम**

## कळसुबाई शिखर सर करणारा बालक राया घारेचा महेश इंगळे यांनी केला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रातील सर्वांत उंच किल्ला साल्हेर आणि महाराष्ट्राचे माऊंट एवरेस्ट शिखर कळसुबाई सर्वात लहान वयात सर करणारा रायाजी घारे याचा महेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र देवून सन्मान केला.

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील ओझर्डे गावचा रायाजी सुधीर घारे या बालकाने वयाच्या २ वर्ष १० महिन्यातच केलेल्या या पराक्रमाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रसंगी माहिती देताना महेश इंगळे यांनी राया घारे बालकाने १५ दिवसांमध्ये साल्हेर किल्ला आणि कळसूबाई शिखर सर करणारा तो एकमेव लहान मुलगा आहे. ११ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्वांत उंच किल्ला साल्हेर. उंची ५१७५ फूट (१५७६ मीटर) व त्याचप्रमाणे दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई जे महाराष्ट्राचे एव्हरेस्ट शिखर म्हणून ओळखले जाते उंची ५४०० फूट (१६४६ मी) ते सर केले आहे. आत्तापर्यंत रायाने १६ गड किल्ले सर केले आहेत. त्यामध्ये सर्वात उंच किल्ला साल्हेर ही त्याची १५ वी मोहीम व सर्वांत उंच कळसुबाई शिखर ही त्याची १६ वी मोहीम होती.

या दोन्ही मोहिमचे नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड,




आशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये करण्यात आली आहे. त्यातील इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड बुकचे स्वामी चरणांना स्पर्श करून आज येथे अनावरण करण्यात आले. त्याच्या या पराक्रमास स्वामी कृपेचे बळ मिळावे व भविष्यातील जीवनात त्याने असे अनेक पराक्रम करून इतिहास घडवावा या करीता राया घारे याचा इथे सन्मान केला असल्याचे महेश इंगळे यांनी सांगीतले. यावेळी मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, आनंद बुक्कानुरे, सागर गोंडाळ, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, विपूल जाधव, गिरीश पवार इत्यादी उपस्थित होते.

## राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळ पुनर्गठीत करा

**● सामाजिक मंत्र्यांकडे समुदयाने केली मागणी; पुण्यात घेतली भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ फेब्रुवारी-**

राज्यातील तृतीयपंथी समदायाच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेले राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळ पुनर्गठीत करा, अशी मागणी राज्यातील सर्व तृतीयपंथी समुदाय यांच्यावतीने करण्यात आली.

यासाठी पुण्यात केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याच्या सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची भेट घेऊन त्यांना तसे निवेदन देण्यात आले. तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्ता डॉ. सान्वी जेठवानी (अध्यक्ष, सप्तारंग सेवाभावी संस्था, नांदेड), मयुरी आळवेकर (अध्यक्ष, मैत्री फाउंडेशन, कोल्हापूर) आणि बार्शीचे सामाजिक कार्यकर्ता सचिन वायकुळे उपस्थित होते. तृतीयपंथी समुदायाच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच रोजगार उपलब्धता, समाजकल्याण आणि विविध सामाजिक सेवांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने तृतीयपंथी कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली. मध्यंतरी काही कारणास्तव हे खंडित झाले. पुन्हा एकदा या मंडळाची पुनर्स्थापना करावी, या मागणीचे निवेदन दोन्ही मंत्र्यांना देण्यात आले.



#### राज्यमंत्री मिसाळ यांचे आश्वासन

या प्रस्तावावर मंत्रीमंडळात चर्चा करण्याचे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. भविष्यात यासाठी योग्य पावले उचलली जातील. हे मंडळ स्थापन केल्याने समाजातील विविध घटकांचे कल्याण होईल आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल, असेही मिसाळ म्हणाल्या.

## शेकडो भक्तांनी घेतले महाकुंभ तीर्थजलाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ फेब्रुवारी-**

१४४ वर्षानंतर उत्तरप्रदेशमधील प्रयागराज येथे महाकुंभ संपन्न होत आहे. हिंदु धर्मामध्ये महाकुंभ व गंगा, यमुना व सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमातील तीर्थजलाला विशेष महत्व आहे. आर्थिक अडचण व इतर अनेक कारणांमुळे प्रयागराज येथे महाकुंभाला दर्शनासाठी प्रत्यक्ष जाता न आलेल्या भाविकांसाठी मंद्रुपमधील भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे व त्यांच्या मित्र परीवारांनी महाकुंभातील तीर्थजलाच्या दर्शनाचे आयोजन केले होते.

यावेळी मंद्रुपसह परीसरातील शेकडो भाविकांनी महाकुंभातील तीर्थजलाचे दर्शन घेतले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य शिवपुत्र जोडमोटे, माजी सरपंच विश्वनाथ हिरेमठ, सोलापूर उपविभाग प्रमुख पांडुरंग शिंदे, दक्षिण सोलापूर भाग जनसेवक आदित्य शिंदे, संघ स्वयंसेवक महेश माळगे-पाटील, भाजपाचे तालुका उपाध्यक्ष शिवराज कालदे, चिदानंद घाले, मिथुन मुगळे, विजयकुमार दिक्षित, गणेश ख्याडे, अनिल म्हेत्रे, राजकुमार नंदुरे, दत्तात्रय रजपूत, श्रीधर लोभे, सागर व्हनमाने, सिध्दाराम ख्याडे, मळसिद्ध पुजारी, सिध्दू नंदुरे, तमन्ना पुजारी, मळसिद्ध पाचवे, शांतप्पा लोभे, मळसिद्ध घाटे आदी उपस्थित होते.



#### आयोजनाचे भाग्य मिळाले

आर्थिक अडचण व इतर कारणाने प्रयागराज येथील महाकुंभाला प्रत्यक्ष जाता न आलेल्या भाविकांसाठी मळसिध्द मंदिर येथे गंगा, यमुना व सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमातील पवित्र तीर्थजलाचे दर्शन सोहळा ठेवण्यात आले होते. यावेळी मंद्रुपसह परीसरातील शेकडो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. या पवित्र सोहळयाच्या आयोजनाचे भाग्य मिळाले.

**- मळसिध्द मुगळे, जिल्हा उपाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी**



## अक्कलकोट येथे संत श्री सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट,दि.२४ फेब्रुवारी-**

शिवसेना शिंदे गटाच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुख रवीना राठोड यांच्या वतीने बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

अक्कलकोट शहरातील बस स्थानकासमोर श्री संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी शिवसेना संपर्क प्रमुख शिवाजीराव सावंत, जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, हरीभाऊ चौगुले, महेश साठे, प्रा. सूर्यकांत कडबगांवकर, अनिता माळगे, वैशाली हवनूर, रविना राठोड, तम्मा शेळके, उमेश पांढरे, स्वामीनाथ हेगडे, सखाराम राठोड, सागर चव्हाण, शशिकांत चव्हाण, अशोक राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी भेट देऊन अभिवादन केले. सूत्रसंचालन सूर्यकांत कडबगावकर यांनी केले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नुतन पोलीस निरीक्षकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**
शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख बापूसाहेब भोसले यांच्या वतीने तुळजापूर पोलीस ठाण्यात नूतन पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे रुजू झाल्यानंतर त्यांचा स्वागत सत्कार करण्यात आला. तीर्थक्षेत्र तुळजापूर शहरात मांजरे यांच्या हातून चांगले कार्य घडो अशा शुभेच्छा शिवसेना शिंदे गटाच्या वतीने देण्यात आल्या. यावेळी विठ्ठल केवडकर, मोहनराव भोसले, संजय गायकवाड, संभाजी नेपते, अमोल जाधव यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### मंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

**तेरखेडा, दि.२४ फेब्रुवारी -**
राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे हे दि.२३ फेब्रुवारी रोजी परंडा दौऱ्यावर आले असता त्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. स्वागत करताना भाजप जिल्हा चिटणीस सचिन इंगोले, वाशी तालुका सरचिटणीस सुधीर घोलप, कायम निमंत्रित सदस्य प्रदीप ठाकूर उपस्थित होते. मंत्री गोरे हे भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त धाराशिव जिल्ह्यातील परंडा दौऱ्यावर आले होते.




### होनाळा ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**
तालुक्यातील होनाळा येथे ग्रामपंचायत कार्यालयात २२ फेब्रुवारी रोजी जे.एस.डब्ल्यू. एनर्जी आणि जे.एस. डब्ल्यू. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये जे.एस.डब्ल्यू. संजीवनी हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने १२६ पेक्षा अधिक ग्रामस्थांनी मोफत बीपी शुगर तपासणी, सामान्य शारीरिक तपासणी, नेत्र तपासणीद्वारे गरजू ग्रामस्थांना मोफत चष्मे निश्चित करणे, तज्ञ डॉक्टरांचा सल्ला व मोफत औषधोपचार इ. सेवांचा मोफत लाभ घेतला. यामध्ये गावातील तरुण, जेष्ठ नागरिक, महिला, मुले यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. तज्ञ महिला डॉक्टर यांनी किशोरवयीन मुली व महिला यांना मासिक पाळीबाबत मार्गदर्शन केले. सरपंच कोरे व ग्रामस्थांनी सदर शिबिराबाबत आणि मिळालेल्या सेवा आणि उपचारांबाबत समाधान व आभार व्यक्त केले.



### लोहाऱ्यात गाडगेबाबांची जयंती साजरी

**लोहारा, दि.२४ फेब्रुवारी -**
लोहारा शहरातील महात्मा फुले चौकात संत गाडगेबाबा महाराज याची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. संत गाडगेबाबानी जनतेला स्वच्छता, शिक्षण, समाजसेवा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे उपदेश दिले. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी बालाजी मक्तेदार, शंकर जाधव, शैलेश जट्टे, यशवंत चंदनशिवे, गौरव रोडगे, अमित बोराळे, तम्मा स्वामी, गोपाळ सुतार, बंडू पोतदार, खंडू शिंदे, पिंटू लोखंडे, बालाजी माटे, विक्रांत संगशेट्टी, दगडू तिगाडे आदी उपस्थित होते.

### पोकलेन मशीनमधील डिझेलची चोरी

**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**
धाराशिव तालुक्यातील दहिफळ शिवारात चोरट्यांनी पोकलेन मशीनमधील २१० लिटर डिझेल (किंमत १९,३२० रुपये) लंपास केले. फिर्यादी सुहास केशवराव पाटील (वय ५८, रा. तांबरी विभाग, धाराशिव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वडगाव एमआयडीसीमध्ये गुंतवणुकीसाठी उद्योजक उत्सुक...

# आपण केलेल्या आवाहनाला ९४ उद्योजकांनी दिला प्रतिसाद : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**
धाराशिव या जिल्हा मुख्यालयापासून अगदी जवळ असलेल्या सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव एमआयडीसीत ८० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. त्यापैकी अंदाजे १५० एकरचा औद्योगिक वापर करण्यात येणार आहे. यात ७५ एकर जमिनीवर मध्यम,लघु व सूक्ष्म उद्योग (चडचए) पार्क उभारण्याचे तत्वतः ठरले आहे. या पार्कमध्ये गुंतवणूक करून ज्यांना माध्यम, लघु व सुक्ष्म उद्योग उभे करायचे आहेत अशा इच्छुकांनी जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांकडे नोंदणी करावी असे आवाहन आपण २८ जानेवारी रोजी केले होते त्यानुसार आपल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्हा आणि परिसरातील तब्बल ९४ उद्योजकांनी नोंदणी करून वडगाव एमआयडीसीत गुंतवणूक करण्यासाठी उत्स्फूर्तपणे तयारी दर्शविली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

शुक्रवारी २१ फेब्रुवारी रोजी वडगाव सिद्धेश्वर येथील औद्योगिक क्षेत्रात होऊ घातलेल्या 'एमएसएमई पार्क' संदर्भात धाराशिव येथील लघुउद्योग भारती या औद्योगिक संघटनेच्या समन्वयाने उद्योजकांसोबत लघु व सूक्ष्म उद्योग स्थापनेविषयी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली झाली. या बैठकीस मोठ्या संख्येने धाराशिवसह इतर जिल्ह्यातील उद्योजकही उपस्थित होते.

यावेळी वडगाव एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योग उभारणीकरिता अनुदान, सहाय्य, भूखंडाच्या वाटप पद्धती, पायाभूत सुविधांकरिता आवश्यक असणाऱ्या बाबींची पूर्तता यासह इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. आपल्या आवाहनाला प्रतिसाद देत तब्बल ९४ उद्योजकांनी वडगाव एमआयडीसीमध्ये गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने उत्स्फूर्तपणे तयारी दर्शविली आहे. २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात लघु, सुक्ष्म व मध्यम उद्योजकांना २० कोटीपर्यंतच्या कर्जाची तरतूद करण्यात आली आहे.

प्रथमच व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांना व महिलांना केंद्र सरकार यामाध्यमातून २ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देणार आहे. लघु, सूक्ष्म व मध्यम औद्योगिक पार्क उभारणीसाठी एमआयडीसीकडून



पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी ४६ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे सदर निधी उपलब्ध होण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचेही आमदार पाटील म्हणाले.

धाराशिव येथील लघुउद्योग भारतीने लघु, सूक्ष्म आणि मध्यम औद्योगिक क्षेत्राबाबत केंद्र सरकारने जाहीर केलेल्या योजना व वडगाव औद्योगिक वसाहतीत उद्योग उभारल्याने मिळणारे फायदे अधिकाधिक उद्योजकांना माहीत करून देता यावेत यासाठी विशेष अभियान राबविण्यात यावे अशी सूचना उपस्थित पदाधिकाऱ्यांना केली.

यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, अमित शिंदे, लघुउद्योग भारती मराठवाडा विभागाचे सहसचिव प्रवीण काळे, लघुउद्योग भारती धाराशिवचे अध्यक्ष राजाभाऊ कोंढारे, एमआयडीसीच्या वतीने खाडे व जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने घोडके, संजय देशमाने, निशांत होनमुटे, कुमार स्वामी, विकास बेलुरे, प्रशांत कुलकर्णी, गजानन मसलेकर, संजय शेटे यांची उपस्थिती होती.

## भरधाव कंटेनरच्या धडकेत तरुण जागीच ठार

### सुरक्षेअभावी राष्ट्रीय महामार्ग बनतोय मृत्यूचा सापळा...

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२४ फेब्रुवारी -**
असुरक्षित राष्ट्रीय महामार्गावर दुभाजकातील झाडांना पाणी देणाऱ्या तरुणाला कंटेनरने जोराची धडक दिली या घटनेत रतन सुरेश गायकवाड (वय २५, रा. खानापूर ता. तुळजापूर) हा जागीच ठार झाला हा अपघात सोलापूर हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील केरूर जवळ सकाळी ११ च्या सुमारास घडला. मयत रतन गायकवाड हा टँकर मधून राष्ट्रीय महामार्गावर दुभाजकातील झाडांना पाणी घालत असताना कंटेनरने (क्र. एन.एल.१/ए.सी.८८००) पाठीमागून रतनला जोराची धडक दिल्याने तो टँकरवर आदळला आणि दोन्ही वाहनांमध्ये चिरडला गेल्याने तो जागीच ठार झाला. यावेळी गावकऱ्यांनी रस्ता अडविल्याने काही वेळ वाहतूक ठप्प होती या महामार्गावर काम करताना कोणतीही काळजी संबंधित प्रशासनाकडून घेतली जात नसल्यानेच ही दुर्घटना घडली.



अपघाताच्या ठिकाणाहून एक किलोमीटरवर टोलनाका असून अम्बुलन्स येण्यासाठी बराच वेळ लागल्याने लोकांनी रस्ता अडवून धरल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

येथील महामार्ग हा निकृष्ट दर्जाचा असून कसलीच सुविधा येथे नसल्याने गेल्या वर्षभरात अनेक अपघात होऊन बऱ्याच जणांना प्राण गमवावा लागला. रतन गायकवाड यांचा अपघाती मृत्यू झाल्याने गाव परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## शिवचरित्र सुंदर जगण्याची प्रेरणा : कानडे

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२४ फेब्रुवारी -**
शिवप्रभुंच्या विचार कार्यावरच आमच्या राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असून शिवचरित्र हे आमच्या सर्वांग सुंदर जगण्याची प्रेरणा आहे, असे विचार महाराष्ट्र शासन राज्य शिक्षक पुरस्कार विजेते भैरवनाथ कानडे यांनी व्यक्त केले.

वागदरी (ता. तुळजापूर) येथे शिव, बसव, राणा, काशिबा महाराज जन्मोत्सव मंडळाच्यावतीने आयोजित शिवसप्ताह प्रसंगी शिवचरित्र जगण्याची प्रेरणा या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून भैरवनाथ कानडे हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कार्यकर्ते भालचंद्र यादव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. गणेश बिराजदार,तंटामुक्त अध्यक्ष तथा माजी सरपंच राजकुमार पवार उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंग व संत काशिबा महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन ॲड. अमोल पाटील यानी केले.



यावेळी जेष्ठ कार्यकर्ते फतेसिंग भाई ठाकूर, माजी उपसरपंच दत्ता सुरवसे, उत्तम झेंडारे, रिपाइं (आठवले) जिल्हा समन्वयक एस.के. गायकवाड, नामदेव यादव, पांडू बिराजदार, जन्मोत्सव मंडळाचे प्रमोद बिराजदार, श्रीकार धुमाळ, भगतसिंग ठाकूर, ग्रामस्थ, महिला, यूवा कार्यकर्ते उपस्थित होते.

## दहा मोटरसायकलींसह आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

### 3 लाखांच्या दहा मोटरसायकली जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**
जिल्ह्यातील मोटरसायकल चोरीच्या गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत दहा चोरीच्या मोटरसायकलीसह एकाला अटक केली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक संजय जाधव आणि अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.



गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी इसम आबा उर्फ अशोक अर्जुन पवार (रा. उमरा, ता. कळंब) यास कळंब येथे ताब्यात घेतले. त्याच्याकडे असलेल्या मोटरसायकलबाबत विचारणा केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. अधिक चौकशीत त्याने बीड येथून मोटरसायकल चोरल्याची कबुली दिली. तपासा दरम्यान, त्याने त्याच्या चुलता गोविंद व्यंकट पवार यांच्या मदतीने अनेक ठिकाणाहून मोटरसायकली चोरल्याची माहिती उघड झाली. पोलिसांनी उमरा येथील त्याच्या घराजवळ आणि तळ्याकाठी झाडाझुडपांमध्ये लपवून ठेवलेल्या मोटरसायकली हस्तगत केल्या.तपासाअंती धाराशिव, बीड, सोलापूर आणि पुणे येथील पोलीस ठाण्यांमध्ये संबंधित मोटरसायकल चोरीचे गुन्हे नोंद असल्याचे समोर आले. धाराशिव शहर, कळंब, तुळजापूर, शिवाजीनगर (बीड), गेवराई (बीड), मोहळ (सोलापूर), विमानतळ (पुणे), सिंहगड रोड (पुणे), स्वारगेट (पुणे) अशा ठिकाणी विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी पंचांसमक्ष आरोपीकडून एकूण ३ लाख रुपये किमतीच्या १० मोटरसायकली जप्त केल्या असून पुढील तपासासाठी आरोपीला धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कामगिरी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, अमोल मोरे, तसेच पोलीस कर्मचारी जानराव, निंबाळकर, वाघमारे, जाधवर, अरब, दहीहंडे, गुरव यांनी केली आहे.

## नंबर प्लेट बदलण्याचा खर्च सरकारने करावा : फूक संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**
सध्या देशभरात हाय-सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या नव्या नियमामुळे देशातील ३५ कोटी वाहनधारकांना प्रत्येकी ५०० ते १५०० रुपये मोजावे लागणार आहेत. याचा एकूण अंदाजे खर्च २५ ते ३० हजार कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. नागरिकांच्या खिशातून हा मोठा पैसा बाहेर काढून काही खासगी कंपन्यांना दिला जाणार असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये आहे.

फूक संघटनेने यावर तीव्र नाराजी व्यक्त करत हा खर्च वाहनमालकांवर लादण्यास विरोध केला आहे. संघटनेच्या मते, सरकारनेच हा खर्च उचलावा. नागरिक आधीच विविध प्रकारचे कर, टोल, रोड टॅक्स, इन्कम टॅक्स आणि जीएसटी भरत आहेत. त्यात पुन्हा नवीन बोजा टाकणे अन्यायकारक आहे. याशिवाय, सामान्य नागरिकांना सरकारी यंत्रणांकडून वेगवेगळ्या मार्गाने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

सरकारला सुरक्षेची एवढी चिंता असेल, तर हा खर्च सरकारी तिजोरीतून करावा, अशी मागणी फूक संघटनेने केली आहे. निवेदनावर मुस्तफा मरेवे, धर्मवीर कदम, प्रभाकर गपाट यांच्यासह आदिच्या सह्या आहेत.

# मटका, जुगार, चक्री, अवैध दारु विक्री, वेश्याव्यवसायामुळे गुन्हेगारी जोमात, पोलीस प्रशासन कोमात

### अल्पवयीन तरुणाई व्यसनाधीन ! शहरात अवैध धंद्यांना ऊत ! दररोज चोऱ्या दरोड्यांचे सत्र सुरुच

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**
शहरातील अल्पवयीन मुले तरुण मागील काही वर्षांपासून ड्रग्स व्यसनाच्या आहारी गेल्याचे निदर्शनास आले असून संपूर्ण तुळजापूर शहर ड्रग्सच्या विळख्यातून बाहेर काढणे आणि ड्रग्स तस्करीचा मुख्य आरोपी शोधून काढणे पोलीसांसमोर मोठे आव्हान आहे.

नुकतेच ड्रग्स तस्करी प्रकरणात तामलवाडी येथील टोल नाक्यावर संशयित गाडीवर पोलिसांनी कारवाई करून मुंबई येथून तुळजापूर शहरात विक्रीसाठी जाणारा ड्रग्स पकडला. यामध्ये तुळजापूर शहरातील दोन आणि नळदुर्ग येथील एक आरोपी सापडले आहेत. त्यानंतर तुळजापूर शहरात ड्रग्स तस्करीचे मोठे रॅकेट असल्याचे समोर आले आहे.

तुळजापूर हे तीर्थक्षेत्र असल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरातून भाविक भक्त तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येतात अवैध धंदे चोऱ्या लुटमार आणि त्यानंतर ड्रग्स तस्करी प्रकरणामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये तुळजापूर शहराची बदनामी होत आहे. मोठ्या भक्ती भावाने येणाऱ्या भाविक भक्त यांचा शहराकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे.

शहरात मागील काही महिन्यांपासून चोऱ्यांचे सत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या चोऱ्या आणि दरोड्यांमागे ड्रग्स व्यवसायाचे कनेक्शन असल्याची चर्चा होत आहे. ड्रग्स व्यसन करणारे तरुण युवक महागड्या ड्रग्स नशा पूर्ण करण्यासाठी चोऱ्यांकडे वळले आहेत असा संशय शहरातील जाणकार नागरिकांना जाणवत आहे. नशा पूर्ण करण्यासाठी पैसा कमी पडत असल्याने तरुण युवक चोऱ्या चपात्या करत असल्याची देखील चर्चा नागरिक करत आहेत.






### तुळजापूर शहर ड्रग्सच्या विळख्यात

एकंदरीत शहरात गुन्हेगारी वाढण्याचे कारण म्हणजे ड्रग्स तस्करी असू शकते का ? असा प्रश्न समोर येत आहे.

ड्रग्स तस्करी सोबतच शहरात मटका, जुगार, चक्री, अवैध दारू विक्री, वेश्याव्यवसाय यांनी थैमान घातले आहे.

खुलेआम हे व्यवसाय शहरात चालू आहेत. त्याकडे पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. खुलेआम अवैध धंदे करणाऱ्या लोकांना राजकीय पाठबळ असल्याचे देखील बोलले जात आहेत. तर ड्रग्स तस्करीचा तपास सीआयडी आणि एटीएसच्या माध्यमातून झाला पाहिजे खरे आरोपी जनतेसमोर आले पाहिजे म्हणून तुळजापूरकर आक्रमक भूमिकेत असल्याचे देखील दिसून येत आहे.

मुख्यमंत्र्यांपासून पालकमंत्री यांना अनेक समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते, संघटना, विविध पक्षांनी निवेदन देऊन यामागील सूत्रधाराचा पडदा फ्लॅश करण्याची मागणी केली आहे. सीडीआर चेक करून पकडलेल्या आरोपींचे कोणासोबत धागेदोरे जुळलेले आहेत ते तपास करा.

कॉल रेकॉर्डिंग मधून मुख्य सूत्रधार पकडा अशी मागणी देखील काही पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर यांची प्रशासनाने तडकाफडकी बदली करून आनंदनगर धाराशिव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे यांची तुळजापूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदी नुकतीच नियुक्ती केली आहे. गुन्हेगारीच्या आणि अवैध धंद्यांच्या विळाख्यात संपूर्णपणे पडलेल्या तुळजापूर शहराला गुन्हेगारीमुक्त शहर करणे हे एक मोठे आव्हान राहणार आहे.

याला कशा पद्धतीने नूतन पोलीस निरीक्षक हँडल करणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### शहरात चोऱ्या दरोड्यांमुळे नागरिक भयभीत...

गेल्या काही महिन्यांपासून शहरात दररोज चोऱ्या, घरफोडी, दरोड्याचे सत्र सुरू आहेत सीसीटीव्ही फुटेज मध्ये धारदार शस्त्र घेऊन दरोडेखोर वावरताना दिसत आहेत धारदार शस्त्र घेऊन फिरणारे चोरांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांनी पेट्रोलिंगच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे तर अनेक ठिकाणी नागरिक स्वतः रात्री जागून ग्रस्त घालत आहेत. सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसणारे दरोडेखोर चेहऱ्याला कापड बांधून फिरत आहेत. त्यामुळे कॅमेऱ्यामध्ये कैद झालेल्या चोरांना शोधून काढणे किंवा त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. सोशल मीडिया वरील वायरल झालेल्या व्हिडिओमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे प्रमाण वाढले आहे.

## आंबी : शेतात घुसून दाम्पत्याला मारहाण; दागिने व रोकड लुटली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

शेतात घुसून दाम्पत्याला मारहाण; दागिने व रोकड लुटली. आंबी पोलीस ठाणे हद्दीतील अंतरवली, ता. भूम येथे एक धक्कादायक घटना घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी बिभीषण भिमराव जाधव (वय ७५, रा. अंतरवली) हे त्यांच्या पत्नीसमवेत २३ फेब्रुवारीच्या रात्री शेतातील घरात झोपण्यासाठी गेले असता, चार अज्ञात इसमांनी त्यांच्यावर हल्ला केला.

कोयता व काठ्यांनी मारहाण करत त्यांना ठार मारण्याची धमकी देत त्यांच्या पत्नीचे ६ ग्रॅम सोन्याचे दागिने, मोबाईल फोन व १,५०० रुपये रोख रक्कम, एकूण ३०,५०० रुपयांचा ऐवज जबरीने लुटला.

या प्रकरणी आंबी पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३०९(६), ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मराठवाड्याचा दुष्काळ मुख्यमंत्री फडणवीस हेच संपवू शकतात : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**परंडा येथे मंत्री जयकुमार गोरे व माजी आमदार ठाकूर यांचा फटाक्याच्या आतिषबाजीत जंगी सत्कार...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२४ फेब्रुवारी -**

राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे हे परंडा तालुक्याच्या दौर्‍यावर आले होते. नुकतीच त्यांची धाराशिव जिल्हा संपर्क मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल तसेच मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी परंडा शहर व तालुक्याच्या वतीने दि.२३ फेब्रुवारी रोजी परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रथम मंत्री गोरे व सुजितसिंह ठाकूर यांचा फटाक्याच्या आतिषबाजीत कार्यकर्त्यांनी जंगी सत्कार केला. तसेच दुपारी शहरातील प्रीतम मंगल कार्यालयात ही सत्काराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी व सुजितसिंह ठाकूर प्रेमींनी मोठी गर्दी केली होती.




मराठवाड्याचा दुष्काळ राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच संपवू शकतात, असे मत यावेळी मंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले तर पुढे बोलताना गोरे म्हणाले की मंत्रीपद माझ्या स्वप्नात सुद्धा नव्हते. भाजपची वाटचाल अतिशय संघर्षातून झाली आहे. बेघरांसाठी घर ही पंतप्रधान मोदी साहेबांची संकल्पना राबवण्यासाठी २० लाख घरांची उद्दिष्ट पूर्ण करीत आहोत. विठूरायाच्या दर्शनासाठी लाखो लोक तळमळत असतात त्या विठुरायाचं नियोजन जबाबदारी मला सोलापूरचा पालकमंत्री झाल्यानंतर मिळाली आणि आता आई तुळजाभवानीच्या धाराशिव जिल्ह्याचा भाजपा संपर्क मंत्री म्हणून माझी निवड झाली हे सुद्धा माझे भाग्य आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची हेळसांड होणार नाही आता गल्ली ते दिल्ली भाजपाचे सत्ता आहे. पुढे २०२९ सालाची निवडणूक भाजपा स्वबळावर लढविणार आहे. त्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे मंत्री गोरे यांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीच्या संघर्ष काळात प्रत्येक रॅलीचे यात्रेचे नियोजन हे सुजितसिंह ठाकूर यांनी केले आहे त्यांचे कार्य म्हणजे निस्वार्थ सेवा असे आहे. त्यामुळे ते भाजपाच्या कार्यकर्ता व नेते यांच्यामधील दुवा आहेत असे मत आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले.

यावेळी मान्यवरासह आमदार राणा दादा पाटील, आमदार विजय देशमुख, माजी आमदार राजेंद्र राऊत, भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, यांनी ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमासाठी भाजपाचे नितीन काळे, अनिल काळे, कैलास शिंदे, खंडेराव चौरे, सुरेश कवडे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे सुखदेव टोम्पे, निशिकांत शिरसागर, सुबोधसिंह ठाकुर, बाबासाहेब जाधव, उमेश गोरे, जाहीर चौधरी, विकास कुलकर्णी, श्रीराम देवकर, जगदीश डाके, बिट्टू मदने आदि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एक लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर अतिवृष्टीचे १३७ कोटी जमा**

# उर्वरित ८९ कोटीसाठी शेतकरी बांधवांनी तात्काळ ईकेवायसी पूर्ण करून घ्यावे : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

धाराशीव जिल्ह्यात एप्रिल व मे २०२४ मध्ये अवेळी पाऊस तर सप्टेंबर २०२४ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना राज्यसरकारकडून २२६.८७ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली होती त्यापैकी १ लाख ६ हजार ५८७ शेतकऱ्यांच्या खात्यावर आतापर्यंत १३७.७७ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित ८९.०९ कोटी रुपये शेतकऱ्यांनी कागदपत्रे पोर्टलवर सादर केली नसल्यामुळे आणि ईकेवायसी पूर्ण न झाल्याने वितरित होणे बाकी आहे. त्यामुळे बाधित शेतकरी बांधवांनी तात्काळ ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी आणि आपल्या हक्काची नुकसान भरपाई पदरात पाडून घ्यावी असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



नुकसान भरपाई मिळावी याकरिता शासनाच्या पोर्टलवर आतापर्यंत पात्र ठरलेल्या १ लाख ८३ हजार ६२३ शेतकऱ्यांपैकी १ लाख ५१ हजार ६५० शेतकऱ्यांची माहिती अपलोड झालेली आहे. अपलोड करण्यात आलेल्या माहितीपैकी आजअखेर १६ हजार ४६३ शेतकरी बांधवांचे ईकेवायसी होणे बाकी आहे. त्यामुळे उपलब्ध झालेल्या एकूण २२६ कोटी ८७ लाख रुपयांपैकी वितरण झालेले १३७.७७ कोटी रुपये वगळता आणखी ८९.०९ कोटी रुपये वितरित होणे बाकी आहे. पात्र असलेल्या आणि अद्याप पोर्टलवर माहिती न भरलेल्या तसेच ज्यांची ईकेवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही अशा शेतकऱ्यांनी तातडीने ही सर्व प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२४ महिन्यात अतिवृष्टी झाली होती. ज्याठिकाणी अतिवृष्टीची नोंद नाही तेथेही नदी-नाले आणि ओढ्यांना आलेल्या पुरामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते. सततचा पाऊस आणि अतिवृष्टीसाठी राज्य आणि केंद्राच्या आपत्ती निवारण निधीचे निकष ठरलेले आहेत. मात्र अतिवृष्टी आणि सततचा पाऊस नसतानाही, ज्या ठिकाणी पूरपरिस्थितीमुळे मोठे नुकसान झाले आहे, तिथे तलाठ्यांमार्फत नुकसानीचे पंचनामे करून तसा स्वयंस्पष्ट अहवाल घेण्याच्या सूचना तहसीलदार तथा कृषी अधिकाऱ्यांना आपण दिल्या होत्या.

# श्रीदत्त मूर्ती प्राणप्रतिष्ठानिमित्त शुक्रवारपासून विविध धार्मिक विधी

**रुईभर येथे नेपाळच्या शाळीग्रामपासून बनवलेल्या श्री दत्त मूर्तीची २ मार्चला प्रतिष्ठापना...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील रूईभर येथील श्री दत्त मंदिरात २८ फेब्रुवारीपासून मूर्ती प्रतिष्ठापणा कार्यक्रम होणार आहे. येथे नेपाळच्या गंडकी नदीतील शालिग्रामपासून बनवलेल्या मूर्तीची प्रतिष्ठापणा होणार आहे. खास पूजनासाठी वाराणसीहून गंगेच्या पाण्याचा टँकर आणण्यात आला आहे. यमुना, नर्मदा, इंद्रायणी, चंद्रभागा नदीतूनही पाणी आणले आहे. रूईभर गावातील प्रत्येक ज्येष्ठ व्यक्तीला मंदिरातर्फे भर पेहराव आहेर करण्यात आला असून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन अप्पाबाबा महाराजांच्या मार्गदर्शनात होणार आहे.

रूईभर येथे १९८३ मध्ये श्री दत्त मंदिराची स्थापना करण्यात आली. सध्या येथे दत्तगुरूंची संगमरवराची मूर्ती आहे. आता येथे मंदिराच्या जीर्णोद्धार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने येथे श्री दत्तगुरूंच्या नवीन एका मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येत आहे.

येथे नेपाळच्या गंडकी नदीतील शालिग्रामापासून बनवलेली साडेचार फुटी मूर्ती तयार करण्यात आली आहे. हेच शालिग्राम अयोध्येतील श्रीराम मंदिरातील मूर्ती तयार घडवण्यासाठी वापरले आहेत. २८ फेब्रुवारी रोजी पुण्याह वाचन, मातृक पूजन, नांदी श्राद्ध नवग्रह स्थापना, मुख्य देवता स्थापना होणार आहे. १ मार्चला अवाहिता देवता पूजन, सणविधी तीन प्रकारचे अधिवास पर्याय होम आदी होईल.

२ मार्चला अवाहिता देवता होम, ब्रह्मादी देवता होम, यंत्रस्थापना विग्रह प्राणप्रतिष्ठा हवन, आशीर्वचन होणार आहे. २ मार्चलाच सकाळी १०.५० वाजेच्या शुभमुहूर्तावर श्री दत्त महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. परमपूज्य श्री दत्त महाराज रुईकर आप्पा बाबा यांची उपस्थितीत व परिसरातील ब्रह्मवृंदांच्या साक्षीने स्थापना होईल. यासाठी मंदिर समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. येथे मोठा मंडप उभारण्यात आला आहे. दत्त यागाला यापूर्वीच सुरुवात झाली आहे.

कार्यक्रमात रुईभर येथील सर्व ग्रामस्थांचा सहभाग असून अप्पाबाबा महाराजांकडून संबंधित गावातील नागरिकांना भरपेहराव आहेर करण्यात आला आहे. तसेच वाराणसीहून गंगेसह नर्मदा, गोदावली, पंचगंगा, चंद्रभागा आदी नद्यातील पाणी आणण्यात आले आहे. याचा उपयोग पूजनासाठी करण्यात येणार आहे.

# नळदुर्ग येथील अंगणवाडी इमारत ढासळण्याच्या मार्गावर

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ फेब्रुवारी -**

बालकांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी या उदात्त हेतुने शासनाच्या एकात्मिक बाल विकास प्रकल्पा अंतर्गत शहरी व ग्रामीण भागात अंगणवाड्या सुरू केल्या आहेत असे जरी असले तरी म्हणावे तसे लक्ष याकडे दिलेजात नाही असेच म्हणण्याची वेळ नळदुर्ग (वसंत नगर) येथील अंगणवाडी क्रमांक ८ ची दुरावस्था पाहिल्यावर दिसुन आले आहे.

एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय धाराशिव शहरी विभाग अंतर्गत नळदुर्ग शहरातील वसंत नगर या भागात अंगणवाडी शाळा भरविली जाते. येथील अंगणवाडी क्रमांक ८ असुन येथील बालकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत आहे. येथील अंगणवाडीची इमारत पडण्याच्या अवस्थेत आहे. इमारती वरील पत्र्यांची अवस्था दयनीय झाली असुन पत्रे अनेक ठिकाणी फाटले आहेत तर भिंतीस जागोजागी भेगा पडल्या आहेत. शाळेतील भिंतीला व आतील भागात जागोजागी उंदीर व घुशीने माती उकरून इमारत खिळाखिळी केली आहे.

# धाराशिव साखर कारखान्याच्या १३ व्या गळीत हंगामाची सांगता



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२४ फेब्रुवारी -**

डि.व्ही.पी. धाराशिव साखर कारखाना लि. चोराखळी ता कळंब जि धाराशिव या कारखाण्याचे सन २०२४-२५ चा १३ वा गळीत हंगामाचा सांगता समारंभ दि.२३ फेब्रुवारी रोजी ५ वाजता पार पडला. या प्रसंगी रमाकांत भारत वाघमारे यांच्या हस्ते सत्यनारायण पुजा करण्यात आली.

या कार्यकमा प्रसंगी कारखाण्याचे कार्यकारी संचालक अमर धनंजय पाटील, संचालक रणजीत भोसले, संचालक संदिपान खारे, सुहास शिंदे, संतोष कांबळे, संजय खरात, विकास काळे, सुरेश तात्या पाटील कारखान्याचे जनरल मॅनेजर ए.एस पठाण, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी तसेच कारखाना परिसरातील शेतकरी व उस तोडणी-वाहतुक ठेकेदार या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमा प्रसंगी अध्यक्षपर भाषण कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील साहेब यांनी केले. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये १२९,८४६ मे. टन गाळप केल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले व पुढील गळीत हंगाम २०२५-२६ करिता त्यांनी ४.५ लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्ट कर्मचा-यांना दिले.

त्यानंतर कार्यकारी संचालक अमर पाटील यांचे हस्ते कारखाना कार्यक्षेत्रातुन जास्तीत जास्त ऊस पुरवठा करणारे वाहतूक ठेकेदार यांचा बक्षीस देवून सत्कार करण्यात आला. यावेळी जनरल मॅनेजर ए.एस पठाण यांनी गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये प्रतीकुल परिस्थिती असताना देखील सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून १२९,८४६ मे टन गाळप पुर्ण केले याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. तसेच गाळप हंगाम २०२५-२६ चांगले प्रकारे घालवून कार्यकारी संचालक व संचालक मंडळ यांनी दिलेले गाळपाचे लक्ष पूर्ण करू असे सर्वांच्या वतीने आश्वासन देण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चीफ इंजीनिअर वैभव देशमुख यांनी केले आभार मुख्य शेतकी अधिकारी दयानंद गव्हाने यांनी मानले.

## शाळेतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२४ फेब्रुवारी -**

उमरगा तालुक्यातील पेठसांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि यशवंतनगर चव्हाण विद्यालयात अज्ञात चोरट्यांनी घुसून सीसीटीव्ही कॅमेरे लंपास केले. फिर्यादी कल्पना अशोक गुंजोटे (वय ३८, मुख्याध्यापिका, जि.प. शाळा, पेठसांगवी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २२ ते २३ फेब्रुवारी दरम्यान शाळेत लावलेले टीन्डी आणि हाईकव्हीजन कंपनीचे एकूण १२,००० रुपयांचे सीसीटीव्ही कॅमेरे चोरीला गेले.

या प्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तुळजापूरात बांधकामाच्या साहित्याची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ फेब्रुवारी -**

तुळजापूर येथे प्लॉटवरील बांधकामासाठी ठेवलेले साहित्य चोरट्यांनी लंपास केले. फिर्यादी जयश्री सतीश सरडे (वय ४०, रा. हाडको, तुळजापूर) यांच्या मालकीच्या प्लॉटवरून ५० सिमेंटच्या विटा व लोखंडी भंगार साहित्य, एकूण ६,४०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला.




या प्रकरणी संशयित आरोपी अभिषेक माने, अभिजीत माने व उमा माने (सर्व रा. हाडको, तुळजापूर) यांच्याविरुद्ध भा.दं. वि. कलम ३०३ (२) अन्वये तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणाचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

# पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्याची वाटचाल पुन्हा एकदा भग्नावस्थेकडे






**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.२४ फेब्रुवारी -**

नळदुर्गचा ऐतिहासिक व प्राचिन किल्ला महाराष्ट्रातील भुईकोट किल्ल्यापैकी सर्वात मोठा भुईकोट किल्ला आहे. मात्र सध्या या किल्ल्याची मोठी दुरावस्था झाली आहे. सध्या किल्ल्यात पर्यटकांसाठी कुठलीच सुविधा उपलब्ध नाही. किल्ल्यात पर्यटकांसाठी साधे पिण्याच्या पाण्याची सोय नाही. पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे व गलथान कारभारामुळे पुन्हा एकदा हा किल्ला भग्नावस्थेत जाणार की काय अशी भीती व्यक्त केली जात आहे.आज किल्ल्यातील झाडे, बगीचा तसेच लॉन वाळुन गेल्याने किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर सर्वत्र ओसाड वाटत आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या भुदुर्ग किल्ल्याची अशी दयनीय अवस्था होण्यास पुरातत्व विभागाचा गलथान कारभार जबाबदार आहे.

२०१४ साली हा किल्ला महाराष्ट्र सरकार व पुरातत्व विभागाने महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेअंतर्गत सोलापुर येथील युनिटी मल्टीकॉन्स कंपनीला संगोपणासाठी १० वर्षाच्या करारावर देण्यात आला होता. या दहा वर्षांमध्ये युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्ल्यात अतिशय सुंदर काम करून या ऐतिहासिक किल्ल्याला गतवैभवप्राप्त करून देण्याचे प्रामाणिकपणे काम केले. या दहा वर्षात युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्ल्यात विविध जातीचे हजारो वृक्ष लावुन त्याचे जोपासन केले. त्यामुळे किल्ल्यात गेल्यानंतर सर्वत्र हिरवेगार झाडे दिसत होती. त्याचबरोबर अनेक ठिकाणी किल्ल्यात बगीचा तयार करुन त्यामध्ये लॉनसह विविध फुलांची झाडे लावुन त्याची निगा राखल्याने किल्ल्यात झाडावर फुले फुलल्यानंतर किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांचे मन प्रसन्न होत होते. मात्र आज किल्ल्यातील झाडे वाळुन चालली आहेत. शोभेची झाडे तसेच फुलांची झाडे व लॉन पुर्णपणे वाळुन गेले आहे. किल्ल्याच्या आतील प्रवेश द्वारासमोर व उपली बुरुजसमोर अतिशय सुंदर पाण्याची कारंजा तयार करण्यात आली होती. मात्र आज याठिकाणी केवळ त्या कारंज्याचा सांगाडा उभा आहे. त्यात पाण्याचा एक थेंब नाही. त्यामुळे किल्ल्यात प्रवेश केल्यानंतर सर्वत्र ओसाड, भकास व उदास वातावरण दिसुन येत आहे.

युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्ल्यात अनेक ठिकाणी पर्यटकांसाठी थंडगार व शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय केली होती. पाच रुपयात पर्यटकांना शुद्ध व थंडगार एक लिटर पाणी पिण्यासाठी मिळत होते. मात्र आज किल्ल्यात पाणीच उपलब्ध नाही. कांही अज्ञात व्यक्तीने किल्लयात गवत पेटवुन दिल्यानंतर युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने केलेली पाणीपुरवठ्याची पाईपलाईन यामध्ये जळाली आहे त्यामुळे किल्ल्यात आज पाण्याचा एक थेंब नाही. याकडे पुरातत्व विभागाचे मात्र दुर्लक्ष होत आहे.

किल्लयात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. जागोजागी प्लास्टिक कचऱ्यासह कागद, जेवणाच्या पत्रवळ्याचा कचरा जमा झाला आहे. यामुळे किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व संपुष्टात येत आहे. पुरातत्व विभाग हा किल्ला देखभाल करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. पर्यटकांना किल्ल्यात सर्व सुविधा मिळाल्या तरच पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येथील अन्यथा पर्यटक इकडे फिरकणारही नाहीत.

### पुरातत्त्व विभागाचा आश्चर्य चकीत करणारा आदेश...

किल्ला पाहण्यासाठी किल्ल्यात आलेल्या पर्यटकांनी किल्ल्यात कुठल्याच प्रकारचे खाद्य पदार्थ खाऊ नये किंवा सोबत आणलेले जेवण करू नये असे फर्मान पुरातत्व विभागाने काढले आहे. पुरातत्व विभागाचे हे फर्माण पर्यटकांवर अन्याय करणारे आहे. इतका मोठा किल्ला पहिल्यानंतर पर्यटकांना किल्ल्याच्या आतमध्ये बसुन जेवण करता येत नसेल तर पर्यटक उपाशीपोटी किल्ला पाहु शकतील का? हेच पुरातत्व विभाग एकीकडे किल्ला पाण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना किल्ल्यामध्ये जेवण करण्यास किंवा खाद्य पदार्थ खाण्यासाठी मज्जाव करते तर दुसरीकडे याच पुरात्तव विभागाच्या नाकावर टिच्चुन किल्ल्याच्या आत मध्ये वडापाव, भजी, चहा व इतर खाद्य पदार्थ खुलेआम विकले जाते. याकडे मात्र हे पुरात्तव विभाग दुर्लक्ष करते हे हास्यास्पद आहे. आजही या किल्ल्यात विनपारवाना कांही दुकाने थाटली आहेत. किल्ल्याच्या आतमध्ये खाण्या-पिण्याला बंदी आहे तर किल्ल्यात खाद्यपादार्थाची दुकाने थाटण्यास पुरातत्व विभाग परवानगी का देते?

# महसूलमधूनही आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ फेब्रुवारी**

करिअरच्या धावपळीत आपल्या अंगीभूत कलागुणांना मागे ठेवावे लागते. त्यामुळे महसूल विभागातील खेळाडूंना मिळालेली ही संधी असून कामाचे नियोजन करून कला, क्रीडा क्षेत्रामध्ये प्रावीण्य प्राप्त करावे. महसूल मधूनही राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना गवसणी घालणारे क्रीडापटू तयार झाल्यास मला अधिक आनंद होईल, अशी अपेक्षा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे.

काल रविवारी रात्री राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. २१, २२ व २३ फेब्रुवारीला आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप त्यांच्या हस्ते झाला. यावेळी आपल्या संबोधनात त्यांनी क्रीडा व कलाक्षेत्रातील गुणवंतांना नोकरी बढतीमध्ये प्राधान्य दिले जाईल असे स्पष्ट केले. महसूल मधून ऑलिंपिकला गवसणी घालणारा एखादा खेळाडू तयार झाल्यास तो आनंदाचा क्षण असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महसूल मंत्री खास महसूल कर्मचाऱ्यांच्या आग्रहास्तव आपल्या व्यस्त कार्यक्रमात नागपूर वरून नांदेड येथे समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित झाले.यावेळी महसूल मधील विविध संघटना, कर्मचारी संघटना, वरिष्ठ अधिकारी यांनी देखील आपल्या मागण्या त्यांच्या समोर सादर केल्या. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रामुख्याने खासदार डॉ.अजित गोपछडे, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ. तुषार राठोड, आ. राजेश पवार, विभागीय आयुक्त दिलिप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक शाहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे



जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकारी, महसूल मधील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महसूलच्या आकृतीबंध पासून तर महसूल मधील नोकर भरतीपर्यंत अनेक विषयांवर तातडीने निर्णय घेण्याचे संकेत त्यांनी दिले. तसेच महसूल विभागाच्या आस्थापनांमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव आहेत. राज्यात अनेक ठिकाणी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अपर तहसीलदार कार्यालय, यासोबतच लातूर किंवा नांदेडमध्ये विभागीय महसूल आयुक्तालय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले. महसूल खात्यातील मोक्याच्या पोस्टिंग आता कुणाच्या शिफारसीने नाही तर मेरीटवर होतील, असे सांगताना त्यांनी महसूलमध्ये जवळपास १५ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, ६५ अप्पर तहसीलदार कार्यालय तयार करण्याचे प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनांवर काम करावे. शासनाला आपल्याकडच्या अशा नाविन्यपूर्ण कल्पनांची माहिती द्यावी. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. महसूल विभागातील सुनावण्या घेताना AI चा वापर पुढील काळात होईल, सुनावण्यामध्ये AI तंत्र अतिशय उपयोगी ठरणार असून, निकालपत्रासाठी AI ची मदत घेऊ अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

गेल्या १० वर्षात १२ हजार प्रकरणे महसूल विभागात निर्णयासाठी पडून आहेत. रोज १०० सुनावण्या घेतल्या तरी ते कमी होणार नाहीत, त्यामुळे AI ची मदत घेणे काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. नांदेड येथे १२ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर आयोजित क्रीडा स्पर्धासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व टीमचे त्यांनी अभिनंदन केले. राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी एक कोटी अनुदान दरवर्षी देणार व दरवर्षी राज्यस्तरीय महसूल क्रीडा महोत्सव होईल, अशी घोषणा उपस्थित खेळाडूच्या समक्ष केली. यावेळी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले ,निलंबन आणि वेतनवाढ रद्द करण्याच्या फाईलवर निर्णय घेण्याची वेळ महसूल मंत्र्यांवर आणू नका, इतके चांगले कामकाज, जनतेशी समन्वय, कार्यालयीन शिस्त आणि पारदर्शी राहा, महसूल हा महाराष्ट्राचा चेहरा आहे. महसुल खाते क्रमांक एकचे राहील यासाठी प्रयत्न करा असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांच्या हस्ते विभागीय स्पर्धेतील विजेते कोकण विभागाला प्रथम, दुसरा क्रमांक यजमान छत्रपती संभाजी नगरला तर पुणे विभागाला तिसरा क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद बहाल करण्यात आले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत हरणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २४ फेब्रुवारी**



फॉरेस्ट विभागातील प्रशासकीय जबाबदार अधिकारी यांच्या निष्क्रियतेमूळे तर वनरक्षकांच्या आळशी प्रवृत्ती मूळेअंजणी-चिटमोगरा फाट्या जवळील वळणाचा रस्ता ओलांडून पाण्याच्या शोधात बिजुर येथील मानवी वस्तीकडे मार्गक्रमण करीत आसलेल्या मादी हरीणाचे देगलूर नांदेड या राज्यमहा मार्गावर अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला.

गेल्या काही वर्षापासून जंगलातील वृक्षांची कत्तली होत असल्याने पर्यावरणातील संुतूलन दिवसेंदिवस बदलत असल्याचे चित्र दिसून येत आहे तर दूसरीकडे राज्य शासनाने पर्यावरण संतुलित राहावे या अनुषंगाने दरवर्षी आर्थिक बजेटमध्ये स्वतंत्र तरतूद करून.सामाजिक वनी करणाच्या वतीने झाडे लावा झाडे जगवा हे अभियान खूप मोठ्या प्रमाणात राबविण्यात येते. तर दुसरीकडे फॉरेस्ट विभाग मात्र वनाची व वनातील वन्य प्राण्यांच्या देखभालीसाठी दरवर्षी उन्हाळ्यात पाणवठे बांधल्याचा कागदोपत्री आराखडा तयार करून शासनाच्या नगदी स्वरूपातील बजेटचा विल्हेवाट लावण्यात मात्र तरबेज वास्तविक वास्तवात मात्र वनातील प्राण्यासाठी असलेले पानवठे मात्र कोरडे ढाकच असल्यामुळे दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोज रविवारी सायंकाळी सातच्या सुमारास अंजनी/चिट मोगरा फाट्या जवळील देगलूर-नांदेड या राज्य महामार्गा वरून रस्ता ओलांडून बिजूरकडे मानवी वस्तीकडे पाण्याच्य शोधात मादी हरणाचे अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला आसल्याचे चित्र पाहायला मिळाले आहे. यावेळी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परगेवार,बिट जमादार शेख, पो.हे.कॉ सोनकांबळे, ईजळ कुंटे, सुर्यवंशी हे देगलूरहून रामतीर्थ पोलीस ठाण्याकडे येताना पाहिले असता. रामतीर्थ ठाण्याचे सपोनी श्रीधर भागवतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ संबंधित फॉरेस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांना कळविल्याने यावेळी देगलूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरें यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक सहदेव दोसलवाड, सुभाष नाईक, राजेश पिंजरवाड, शिवराज बटलवार यांनी पंचनामा करून पुढील शासकिय नियमा प्रमाणे कार्यवाही पूर्ण केली.

परंतु दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत आहे तर दुसरी कडे वनातील पाणवठे हे कोरडे ढाक असल्यामुळे वन्य प्राणी हे पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे मार्गक्रमण करत आहे त. त्यामूळेच या परिसरातील मादी हरीणाच्या या मृत्यू मुळे बिजूर, अंजनी, चिट मोगरा पंचक्रोशीतील नागरिकांनी फॉरेस्ट विभागातील अधिकाऱ्यांच्या व वनरक्षकाच्या बेजबा बदार वर्तनामुळेच वनातील हरिण, मोर, ससे यासारखे छोटे-छोटे मृत्यूचे बळी ठरत आहेत. त्या मुळे ग्रामीण भागातील नागरिकांतून चांगल्याच चर्चा रंगू लागल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### कुंडलेश्वर देवालयात विविध कार्यक्रम

**कुंडलवाडी**-येथील कुंडलेश्वर देवालयात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कुंडलवाडी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कुंडलेश्वर देवालयात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२४ फेब्रुवारी २०२५रोजी दु.४वाजता चौधवे महाराजांचे प्रवचन रात्री ८वा. विश्वनाथ भोगले यांचे गायन दि.२५ फेब्रुवारी २०२५रोजी दु.३ वा. ह.भ. प. अनिरुद्ध महाराज यांचे प्रवचन दि.२६ फेब्रुवारी २०२५रोजी साय.६ ते ९वा.उमा महेश्वर रुद्राभिषेक व शुभ विवाह सोहळा नंतर पालखी मिरवणुक ह. भ. प. पाळेकर महाराज यांचे शिव कीर्तन होणार आहे तरी सर्व भाविक भक्तानी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे संयोजकांच्या वतीने कळविले आहे.

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांची भरती

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागात सन २०२५-२६ या सत्रासाठी वेगवेगळया व्यवसायासाठी एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांसाठी भरती करण्यात येणार आहे. या शिकाऊ उमेदवार भरतीत नांदेड जिल्ह्यातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचीच शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्याव्यतीरीक्त इतर जिल्हयातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचा अर्ज व मागील तीन वर्षापुर्वी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही, असे राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. यात मेकॅनिक मोटर व्हेईकल -४५, मेकॅनिक डिझेल- ४२, शिट मेटल वर्क्स-१८, टो इलेक्ट्रीशियन-६, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनर-८, पेंटर(जनरल) -४, वेल्डर (गॅस न्ड इलेक्ट्रीक)-०४, अभियांत्रिकी पदवी, पदविका (मेकॅनिकल टोमोबाईल मेकॅनिक /इंजिनीअर)-२ अशी एकुण १२९ पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येणार आहेत. त्यासाठी आयटीआय उत्तीर्ण किंवा शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणाऱ्या विहीत केलेल्या व्यवसायाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व अॅटो इंजिनिअरींग टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण उमेदवारांना www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाईटवर स्वत: चे रजिस्ट्रेशन करावे अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनी NTS पोर्टलवरील www.mhrdnats.gov.in या वेबसाईटवर स्वत:चे रजिस्ट्रेशन करावे. व रजिस्ट्रेशन झाल्यावर एमआरटीसी डिव्हीजन नांदेड या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करुन रा.प. महामंडळाने विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरुन सादर करणे आवश्यक राहील. हे छापील अर्ज २७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२५ रोजी ३ वाजेपर्यंत शनिवार, रविवार व सुटटीचा दिवस विभाग नियंत्रक यांचे कार्यालय रा.प.नांदेड येथे मिळतील व लगेच स्वीकारले जातील. या अर्जाची किंमत खुल्या प्रवगाकरीता ५९० रुपये व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी जातीचा दाखला सादर केल्यास २९५ रुपये आहे.

### मुदखेडचे जेष्ठ पत्रकार गंगाधर डांगे यांना मराठवाडा भुषण पुरस्काराने सन्मानित

**मुदखेड**-मुदखेडचे ज्येष्ठ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते गंगाधर डांगे यांना वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या मराठवाडा भुषण पुरस्काराने दि. २३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबां यांच्या जयंती दिनानिमित्त महेश



भवन श्री क्षेत्र लाड कारंजा जि. वाशिम येथे पार पडलेल्या सत्कार सेवाव्रतींचा कार्यक्रमात आ. सईताई डहाके यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला . वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पहिल्यांदाच राज्यस्तरीय पुरस्कार कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी कारंजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके या होत्या तर या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुने म्हणून मुर्तिजापूर विधान सभेचे आमदार हरिषजी पिंपळे,विदर्भ लोक कलावंत संघटनेचे अध्यक्ष संजयजी पडोळे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेशजी सोमानी, गजानन कृषी बाजार समिती वाशिमचे संस्थापक अध्यक्ष गिरधारी लाल सारडा तर वैदर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्षा सौ.पुनम पवार, सचिव एकनाथ पवार हे उपस्थित होते.

### भगवानराव गोडसे यांचे निधन

**मुदखेड**-ज्येष्ठ नागरिक भगवानराव दिगंबरराव गोडसे (वय ७०) यांचे दि.



२४ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर मुदखेड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राजकुमार गोडसे यांचे ते वडील तर नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे व कॉंग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष कैलास गोडसे यांचे ते काका होत.

# संगीत शंकर दरबारचे आज उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ फेब्रुवारी**

संगीताच्या क्षेत्रातील प्रतिष्ठित व लोकप्रिय कार्यक्रम संगीत शंकर दरबारचे मंगळवारी २५ फेब्रुवारी रोजी सायं. ५.३० वाजता यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात उद्घाटन होणार असून, पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका साधना सरगम यांच्या सुगम संगीताचा कार्यक्रम होणार आहे.



मंगळवारी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व जागतिक कीर्तीचे सतार वादक पद्मभूषण पं. बुधादित्य मुखर्जी यांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन होईल. यावेळी माजी आमदार अमिताताई चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित राहतील. यंदाच्या संगीत शंकर दरबार सोहळ्याच्या पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका श्रीमती अनुराधा नांदेडकर (हिंगोली) यांच्या यांचा जीवनगौरव पुरस्काराने सत्कार होणार असून, त्यानंतर साधना सरगम यांच्या सुरांची मैफिल रंगणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव तथा माजी पालकमंत्री डी पी सावंत, सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर व कोषाध्यक्ष अॅड. उदय निंबाळकर यांनी केले आहे.




**नांदेड-जगद्गुरु नरेंद्रचार्य महाराज यांच्या बद्दल अपशब्द काढणाऱ्या कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार याच्या निषेधार्थ नांदेड मध्ये मोर्चा काढण्यात आला. (छाया. करणसिंह बैस)**

# प्राणिताताई देवरे यांनी घेतल्या साहित्यिकांच्या भेटी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ फेब्रुवारी**

दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता झाली शेवटच्या दिवशी रविवारी २३ रोजी दिल्लीत मराठीचा गजर होता.राजकीय क्षेत्रात वावर असतानाही सांस्कृतिक व मराठी साहित्यांची आवटी गोडी असणाऱ्या प्राणिताताई देवरे-चिखलीकर या दिवसभर संमेलनात रमल्या. परिसंवाद, मुलाखत, चर्चासत्र त्यांनी श्रवण केले

पुस्तके खरेदी केली साहित्यिकांच्या भेटीगाठी घेतल्या .वाचल तर वाचाल ही चळवळ गावोगावी गतिमान होणे आजच्या काळाची गरज आहे अशी प्रतिक्रिया प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी व्यक्त केली. देशाच्या राजधानीत ९८वे साहित्य संमेलन पार पडले. समारोपाच्या दिवशी प्राणिताताई याना साहित्य संमेलनाचा आनंद घेता आला सारस्वतांच्या व्यासपीठावर देशाचे पंतप्रधान मोदी व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार एकत्रित आले त्याची खूप चर्चा झाली. राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रभावी कार्य करणाऱ्या प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी दिल्लीत रविवारी दिल्लीत मराठी साहित्य संमेलनात हजेरी लावली मराठी साहित्य संमेलनाचा रसास्वाद घेतला.आनंद घेतला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक, जेष्ठ पत्रकार,विचारवंत,लेखक यांच्या भेटी घेण्याचा योग त्यांना आला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर पहिल्यांदा व ७० वर्षानंतर राजधानीत साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पडले.

संमेलनाध्यक्षा ताराबाई भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य संमेलन पार पडले उद्घाटन सोहळ्याला देशातील दोन दिग्गज नेत्यांसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते तर समारोपाला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रमुख उपस्थित संमेलनाचा समारोप करण्यात आला.

प्रमुख राजकीय नेते त जेष्ठ पत्रकार तोरसेकर एन. डी. टीव्हीचे पत्रकार राम शिंदे, पुढारीचे पत्रकार प्रथमेश तेलंग, जेष्ठ पत्रकार अशोक वानखेडे, बारामतीचे दत्ता सावंत, नांदेडचा सोशल मीडियातील स्टार बळी डिकळे, पुणे येथील श्रीमंत स्टुडिओचे योगेश पाटील यांच्यासह साहित्यिक, लेखक, कवी, विचारवंत, आदीजणांच्या भेटीचा योग आला माझ्या मराठीची बोलू कौतुके, परि अमृताتेहि पैजासी जिंके याची महिती दिल्ली व देशवासियांना कळाली. समृद्ध भाषेचा वारसा तसेच साहित्य ,नवीन पिढीला कळले पाहिजे वाचन चळवळ गतिमान झाली पाहिजे तरच भवितव्य मुद्रित साहित्याचा रसास्वाद पुढच्या पिढीसाठी उपयुक्त ठरणार आहे. दिल्लीचे तख्त रखीतो महाराष्ट्र माझा...याच अनुभव आला अशीं भावना प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी व्यक्त केल्या.

# चार साहिबजादे शिख युथ फेस्टीव्हलच्या बक्षिसांचे संतांच्या हस्ते वितरण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २४ फेब्रुवारी**

सिख एज्युकेशन वेलफेअर असोसिएशन सेवा या संस्थेचे अध्यक्ष जरनैलसिंघ गाडीवाले यांच्या वतिने श्री. गुरुगोबिंद सिंघ यांचे चार पुत्र अर्थात चार साहिब जादे यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ घेतलेल्या अकराव्या सिख युथ फेस्टीव्हल मधील विजेत्यांना संत बाबा बलविंदरसिंघ मुखी गुरुव्दारा लंगर साहिब, बाबा तेजासिंघ मुखी गुरुव्दारा मातासाहिब यांच्या शुभहस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

दिवान टोडरमल मिनी स्टेडियम, खालसा हायस्कुल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून गुरुव्दारा बोडांचे नवनियुक्त अधिक्षक गुरुबचनसिंघ शिलेदार, सहाय्यक अधिक्षक बलविंदरसिंघ फौजी,



जयमलसिंघ ढिल्लो, भाजप उपशहर अध्यक्षा पुनम कौर धुपिया यांची प्रमुख उपस्थिती होती. या सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. दोन दिवसीय चाललेल्या या फेस्टीव्हलमध्ये गुरुबाणी कंठ, पगडी बांधणे, हॉकी, व्हॉलिबॉल, बॅडमिटन अशा स्पर्धा घेण्यात आल्या. गुरुबाणी कंठ स्पर्धा महिला गटाचे बक्षिस नवाब मलेरकोटला शेर मोहम्मद खान यांच्या नावाने देण्यात आले असून प्रथम तेजबिर कोर रामगडीया, व्दितीय जपनिश कौर हरप्रितसिंघ लांगरी, तृतीय अविनाश कौर तर पुरुष गटाचा बक्षिस भाई मोतीरामजी मेहरा यांच्या नावाने देण्यात आला असून प्रथम जसविंदरसिंघ मानवतवाले, व्दितीय इंदरजितसिंघ गुरुमितसिंघ, तृतीय अंगदसिंघ मनिंदरसिंघ, तर पगडी बांधणे स्पर्धेचे बक्षिस सहिबजादा अजितसिंघजी यांच्या नावाने देण्यात आले याचे प्रथम किरपासिंघ रामगडीया, व्दितीय महादिपसिंघ सरदार, तृतीय भूपिंदरसिंघ कडेवाले तसेच हॉकी १४ वर्ष वयोगटात प्रथम साहिबजादा जुजारसिंघजी, व्दितीय साहिबजादा जोरावरसिंघजी, तृतीय साहिबजादा बाबा फतेहसिंघजी या संघाने पदक पटकावली. व्हॉलिबॉलचे बक्षिस लखीशाह बंजारा यांच्या नावाने देण्यात आले असून उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वाटप स्पर्धकांना करण्यात आले. सेवा संस्थेचे चेअरमन जरनैलसिंघ गाडीवाले यांनी सिख युथ फेस्टीव्हलचे आयोजन केले होते. हा उपक्रम खेळाडूंना प्रोत्साहित करणारा असून व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रेरित करणारा व कल्याणकारी आयोजन असल्याचे मनोगत उपस्थित संत, महापुरुष व मान्यवरांनी केले.

हा सिख युथ फेस्टीव्हल यशस्वी करण्यासाठी कुलप्रकाशसिंघ लिखारी खेमसिंघ पुजारी, राजेंद्र नंगनूर, मितसिंघ मुनीम, हरदिपसिंघ गाडीवाले, हरप्रितसिंघ कपूर, तुलजेश यादव, पवनजोतसिंघ गाडीवाले आदींचे सहयोग लाभले.

# लोहा-कंधार रोडवरील कापूस खरेदी केंद्राला आग



**तभा वृत्तसेवा**
**लोहा ,दि. २४ फेब्रुवारी**

लोहा-कंधार रोडवरील कापूस केंद्रातील कापसाला विद्युत तारेच्या ताराला तर घर्षण होऊन मोठी आग लागली या मध्ये दोन व्यापाऱ्यांचे लाखों रुपयांचे नुकसान झाले. या घटनेमुळे व्यापाऱ्यांनी उपसभापती व सचिवाला घेराव घातला. सोमवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास जोराचा वारा आला त्यामध्ये विद्युत तारेच्या स्पर्षाने आग लागली. अवघ्या काही सेकंदात आग वनव्यासारखी पेटली. यावेळी व्यापारी, मजूर यांनी तत्परता दाखवून खाजगी टँकरच्या मध्यामातुन आग आटोक्यात आणली. या आगीत रंगनाथ भुरे तर दुसरे बळीराम सूर्यवंशी यांचे लाखोंचे नुसकान झाले.

# जिगळा येथील तलावात आढळला मृतदेह

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव ,दि. २४ फेब्रुवारी**


नरसी पासून येथून जवळच असलेल्या जिगळा तलावात पंचेचाळीस वर्षीय एका अनोळखी पुरुषाचा सडलेल्या अवस्थेतील मृतदेहआढळून आल्याने जिगळोसह परिसरात खळबळ उडाली आहे.

मासेमारी करण्यासाठी गेलेल्यांना पंचेचाळीस वर्षीय एका पुरुषाचा मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याचे दिसून आले. त्यांनी लगेच याबाबत रामतीर्थचे ठाणेदार सपोनी श्रीधर भागवतराव जगताप यांना कळविले आसता सपोनि श्रीधर जगताप तत्परता दाखवली व आपल्या सह पोलिसांचा फौज फाटा घेऊन घटना स्थळी पोहोचले. परंतू अंधाराचा काळोख असल्यामुळे मृतदेह बाहेर काढता आले नाही. परंतु रविवारी सकाळ पासूनच सपोनि श्रीधर जगताप यांच्या मार्गदर्शना खाली बीट जमादार शिवशंकर शिंदे यांनी आपल्या दिमती ला ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांना घेऊन घटना स्थळी पोहचून बिलोली येथील काही भोई समाजातील पट्टीच्या पोहणाऱ्या काही तरुण युवकांच्या मदतीने तो मृतदेह तलावा बाहेर काढण्यात यश आले. हा अनोळखी पंचेचाळीस पुरुष युवकाचा मृतदेह मागील पाच सहा दिवसा पूर्वी पासून पाण्यात असल्याने ते पुर्णतः सडलेल्या परिस्थितीमध्ये असल्यामुळे त्या मृत देहाची व्यवस्थितरित्या अंत्यविधी करण्यात आले. रामतीर्थ ठाण्यामध्ये आकस्मित मृत्यूचा गून्हा नोंद करुन.स.पो.नि श्रिधर जगताप यांनी पुढील तपास पोउपनि शिवाजी नरवाडे यांच्याकडे देण्यात आला.

# महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर श्री विर ब्रहमेंद्र स्वामी मंदिरात कल्याणम महोत्सवमचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २४ फेब्रुवारी**

महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर सिरमेटी रोडवरील श्री वीर ब्रह्मेंद्र स्वामी मंदिर येथे दि २६ फेब्रुवारी रोजी कल्याणम महोत्सवम आयोजित केला असून श्री ओंकार शर्मा पत्की कुसलापूर यांच्या शुभहस्ते महारुद्हवन व कल्याणम होणार आहे. यानिमित्त अभिषेक पूर्णआहुती,तीर्थप्रसाद व महाप्रसादाचे आयोजन केले आहे या महोत्सवाला जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष किशन कोत्तापेल्लीवार यांनी केले आहे.



किनवटशहरापासूनहाकेचे अंतरावर असलेल्या सिरमेटी रोडवर श्री वीर ब्रह्मेंद्रस्वामी मंदिर हे जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते.यावर्षी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर दि २६ फेब्रुवारी २०२५ रोजी कल्याणम महोत्सवमचे भव्य स्वरूपात आयोजन केले आहे. सकाळी ६ वा. मुख्यपुजारी रविंद्र पांडे यांच्याहस्ते अभिषेक होईल ११:३० वाजता पूर्णआहुती व नंतर तीर्थप्रसाद होईल.सकाळी ८ वा. श्री ओंकार शर्मा पत्की कुसलापूर यांच्या शुभहस्ते महारुद्रहवन होईल व दुपारी १२ वा कल्याणम होईल दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजल्यापासून महाप्रसादाचे वाटप होणार आहे.शुभप्रसंगी जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित राहून कल्याणम वेदीकेचे साक्षी बनून शुभाशीर्वाद घ्यावेत असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष किशन कोत्तापेल्लीवार, उपाध्यक्ष रामलू गंनोजवार, सचिव राजु उटलावार, अंकुश उमडवार, प्रमोद श्रीपतवार, संतोष येलचलवार यांनी केले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात एकदिवसीय सेमिनार संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा सेल अंतर्गत परदेशातील शिक्षण व नोकरीच्या संधी या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणून महेश शिसोडे आणि अमर भूत्ते लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने तर मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ.आकांक्षा भांजी यांची उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून महेश शिसोडे यांनी अमेरिका, इंग्लंड, आयर्लंड, जर्मनी या देशात विविध विद्याशाखेत प्रवेश मिळविण्यासाठी असणाऱ्या प्रवेश परीक्षांची माहिती दिली. भारतीय सरकार तसेच परदेशी सरकार देऊ करीत असलेल्या विविध शिष्यवृत्तींची सविस्तर माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. त्याचबरोबर पुढे नोकरीच्या अनेक संधींचे मार्गदर्शन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे दुसरे वक्ते अमर भुते सरांनी शिक्षणाचा मूळ उद्देश समाधानी जीवन जगणे हा असतो असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या स्किल डेव्हलपमेंट कडे जास्त लक्ष द्यावे जेणेकरून ते यशस्वी होतील. त्याचबरोबर महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या विविध ॲडव्हान्स कोर्सेसची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अनुजा कांबळे यांनी केले. प्रास्ताविक डॉ.आकांक्षा भांजी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. गीतांजली जोशी यांनी केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने सरांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापकांचा हातभार लागला.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## डॉ संतुजी लाड जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** सत्यशोधक समाजाचे अग्रदुत महात्मा जोतिबा फुले यांचे सहकारी शिष्य,हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांच्या १८४ व्या जयंती निमित्त अँड प्रदिपसिंह गंगणे यांच्या अध्यक्षते खाली बैठक संपन्न झाली.

यावेळी सर्वानुमते डॉ संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी दिगंबर कांबळे, उपाध्यक्ष अँड इरफान शेख, स्वागताध्यक्षपदी दिनेश गोजमगुंडे, कोषाध्यक्ष आनंद पारसेवार तर कार्यकारिणी सदस्य पदी राजु बुये, इंद्रजीत गंगणे, प्रविण नरवडे,रोहीत रूमने, रोहित थोरात,देवेंद्र जोशी आदींची निवड करण्यात आली आहे. या बैठकीस कैलाश डोंगरे ताहेरभाई सौदागर, राहुल सौदागर गोवर्धन गंगणे, किरण कांबळे,अँड सुहास बेंद्रे, दिपक गंगणे, जम्मालोद्दीन मणियार, विनोद डोंगरे,भीम दूनगावे, श्रीनिवास रांजणकर, केदार कोथिंबीरे , श्रीकांत गंगणे,योगेश डोंगरे,दीपक कांबळे,राजेश रूमने,रामभाऊ जवळगेकर,रविकुमार वंजारे आदीची उपस्थिती होती . अभिवादन कार्यक्रम ४ मार्च रोजी सकाळी १० वा गांधी मैदान लातूर येथील नियोजित डॉ संतुजी लाड पुतळा परिसरात होणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे .

## सुभाषअप्पा माशाळकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** लातूर येथील सेवानिवृत्त वाहक तथा प्रसिद्ध व्यापारी सुभाषअप्पा माशाळकर



यांचे काल रात्री उशिरा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात नितीन, सचिन, श्याम असे तीन मुले, सुना, नातवंडे असून, त्यांच्यावर सिद्धेश्वर स्मशानभूमी लातूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. अतिशय मनमिळावू व सर्वांच्या मदतीला धावून जाणारे सुभाषअप्पा माशाळकर यांच्या निधनामुळे व्यापारी वर्गात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## दयानंद महाविद्यालयात संत गाडगे महाराजांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात थोर समाजसुधारक संत गाडगे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी प्र.प्राचार्य डॉ.श्याम इबाते यांनी अज्ञान,अंधश्रद्धा आणि अस्वच्छता याबद्दल जागरूकता निर्माण करणारे कीर्तनकार संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, प्रा.व्ही.एन.अकुंशे, प्रा.भुसे,डॉ.प्रशांत कोल्हे,सुदाम सातपुते, निखिल कोल्हे,संजित कांबळे, दिनेश जाधव,बालाजी पिटले यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अनेक मान्यवरांनी थोर समाज सुधारक संत गाडगे महाराज यांच्या जिवनावर प्रकाश टाकला.

## नादब्रह्म महाविद्यालयात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** नादब्रह्म संगीत महाविद्यालयात संगीत महोत्सव पार पडला. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे, प्रा. शिवराज मोटेगावकर, माजी महापौर व्यंकट बेद्रे, संस्थाध्यक्ष विठ्ठलराव राठोड आदी उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे संस्थापक गोविंद राठोड, सचिव कृष्णा राठोड, माजी शिक्षणाधिकारी तांबोळी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गायन, वादन करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर संस्थाध्यक्ष विठ्ठलराव राठोड आणि प्रयागबाई राठोड यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन रामचंद्र आरडले यांनी केले. आभार पवनकुमार राठोड यांनी मानले. यशस्वीतेसाठी महेश मोरे, गणेश तांबोळकर, लक्ष्मण चव्हाण, कृष्णा राठोड, गोपाळ राठोड आदींनी परिश्रम घेतले. यावेळी अनेक मान्यवर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूरच्या सुपुत्राची अभिमानास्पद कामगिरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** लातूर जिल्ह्याचा सुपुत्र डॉ. अमर साहेबराव घार यांनी भारतात पहिल्यांदाच स्वदेशी फेमटोसेकंड लेझर तंत्रज्ञान विकसित करून मोठे यश मिळवले आहे. आयआयटी कानपूर सारख्या भारतातील आघाडीच्या संशोधन संस्थेत ते संशोधन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. अमर घार यांनी एम.एससी. फिजिक्स स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथुन स्वर्णपदकासह पूर्ण केले. तसेच, त्यांनी देवी अहिल्या विद्यापीठ (डीएव्हीव्ही) आणि आरआरसीएटी, इंदूर येथून लेझर





तंत्रज्ञानातपण पदव्युत्तर शिक्षणामध्ये स्वर्णपदक मिळवले आहे. पुढे त्यांनी आयआयटी कानपूर येथून लेझर तंत्रज्ञानात पीएचडी पूर्ण केली.

आजपर्यंत भारतात मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी फेमटोसेकंड लेझर प्रणाली संपूर्णपणे आयात केली जात होती, ज्यामुळे त्याचा खर्च खूप जास्त होता. मात्र, डॉ. अमर घार आणि त्यांच्या संशोधन टीमने ही 'मेक इन इंडिया' मोहिमेअंतर्गत पूर्णत: स्वदेशी प्रणाली विकसित केली आहे, जी ३०-५०% कमी खर्चात उपलब्ध होईल.

डॉ. अमर घार आणि त्यांची टीम यांनी ही अत्याधुनिक फेमटोसेकंड लेझर प्रणाली (आयएमटीई २०२५) अंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सादर केली आहे. ही प्रणाली मायक्रोमशिनिंग, बायोमेडिकल उपकरणे, सेमीकंडक्टर प्रक्रिया, आणि ऑप्टिकल फायबर उत्पादनात मोठी क्रांती घडवू शकते.

डॉ. अमर घार आणि त्यांचे बंधू किशोर घार, मनोज घार, श्रीकांत घार हे एकत्र येऊन लातूर येथे कृषी अवशेषांपासून आणि नेपियर गवतावर आधारित इनबिल्ट बायोगॅस प्लांटच्या निर्मितीवर काम करत आहेत. या प्रकल्पात जगातील अत्याधुनिक आणि नव्याने विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. हे तंत्रज्ञान हरित ऊर्जा निर्मितीला चालना देईल आणि भारतातील बायोगॅस उद्योगाला नवीन दिशा देईल असा विश्वास त्याना आहे.

डॉ. अमर घार हे स्व. साहेबराव घार यांचे सुपुत्र आहेत. त्यांनी हे संपूर्ण यश आपल्या दिवंगत वडिलांना आणि त्यांच्या दूरदृष्टीला समर्पित केले आहे. आपल्या वडिलांच्या प्रेरणेने ते आज या टप्प्यावर पोहोचल्याचे ते अभिमानाने सांगतात. डॉ. अमर घार यांच्या या यशामुळे लातूर जिल्ह्यासह संपूर्ण समाजातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. त्यांच्या यशाने लातूर जिल्ह्यातील नवोदित संशोधक आणि उद्योजकांसाठी प्रेरणा मिळेल. विज्ञान, तंत्रज्ञान आणि हरित ऊर्जा क्षेत्रात करिअर करू इच्छिणा-या तरुणांसाठी डॉ. अमर घार यांची वाटचाल नक्कीच प्रेरणादायी आहे असे सांगीतले जात आहे.

## बाळासाहेब जाधव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** छत्रपती संभाजीनगर येथील पहाट फाऊंडेशनच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार लातूर येथील पत्रकार बाळासाहेब जाधव यांना प्रदान करण्यात आला.

यावेळी प्रसिद्ध साहित्यिक प्रा.डॉ.संजय गायकवाड, मिसेस इंडिया विजेत्या, सेलिब्रिटी ज्युरी श्वेता परदेसी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्राचार्य प्रा.डॉ.आर.एन. गावीत, पहाट फाऊंडेशनचे संचालक अमोल भिलंगे, अर्पिता सुरडकर आदी मान्यवर उपस्थित होते. बाळासाहेब जाधव यांना पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम केले आहे.

## ज्ञानाचा वापर करायला शिकवणारं शिक्षण हवे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** विविध माध्यमातून आपण शिक्षण घेतो, त्यातून ज्ञान प्राप्त करतो. प्राप्त झालेल्या या ज्ञानाचा वापर करायला शिकवणारं शिक्षण हवं, ही बाब लक्षात ठेवूनच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आखण्यात आले आहे.

२०४७ सालापर्यंत भारत विकसित राष्ट्र करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा जाणीवपूर्वक अंतर्भाव करण्यात आला आहे,असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी केले.

नवनिर्माण प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित नवनिर्माण व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना कुलगुरू डॉ. कुलकर्णी बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सीए सुनील कोचेटा तर मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर केंद्राचे प्रमुख ब्रिजेशसिंह अय्यर, प्रा. डॉ.गिरीश जोशी, नवनिर्माण प्रतिष्ठानचे सदस्य महेंद्र जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- भारतीय ज्ञान परंपरा -विकसित भारत या विषयावर विचार मांडताना कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी म्हणाले की,ज्ञानाची वाढ, त्यातून होणारी आर्थिक भरभराट हाच विकसित भारताचा मार्ग आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा यात मोठा वाटा आहे. प्राचीन भारतात अर्थशास्त्र प्रगत होते. जगातील ३० टक्के संपत्ती आणि एक तृतीयांश व्यापार एकट्या भारतातून केला जात होता. या बाबी लक्षात घेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखताना त्यात भारतीय ज्ञान परंपरांचा जाणीवपूर्वक अंतर्भाव करण्यात आलेला आहे. धोरण आखण्यापर्यंत ठीक आहे परंतु त्याची अंमलबजावणी कठीण आहे. भारतीय ज्ञान परंपरा अतिशय मोठी आहे. त्यावर भारतीय भाषांमध्ये पुस्तके आवश्यक आहेत.समजून घेण्याची क्षमता व पात्रता आवश्यक आहे. भारतीय ग्रंथामध्ये असणारे ज्ञान पडताळून पाहण्यासाठी सुलभता आवश्यक आहे.त्या दृष्टीने काम सुरू असल्याचे कुलगुरू डॉ. कुलकर्णी म्हणाले.

डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, ज्ञान असले तरी ते समजून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी अभ्यास आवश्यक ठरतो. मागील काही वर्षात भारतीय ग्रंथामधील विविध संशोधने जगातील नामांकित नियतकालिकात छापून येत आहेत. त्याला जागतिक पातळीवर मान्यता मिळत असल्याचेही ते म्हणाले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवताना केवळ कौशल्य शिकवून चालवणार नाही तर ते वापरण्याची कला देखील विद्यार्थ्यांना शिकवायला हवी याचा विचार करण्यात आला आहे. कौशल्य शिकवतानाच प्रत्यक्षात काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळावी याचा विचार केला आहे.जे शिक्षण आपण घेऊ ते मांडता यावे याचाही विचार केला असल्याचे डॉ.कुलकर्णी यांनी सांगितले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## संत गाडगे महाराजांनी समाज व व्यक्तिमनाची स्वच्छता केली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** राष्ट्रसंत गाडगे महाराजांनी तत्कालीन काळामध्ये समाज आणि व्यक्तिमनाच्या स्वच्छतेचा अमूल्य संदेश देऊन सार्वजनिक स्वच्छता केली. त्यामुळेच आज त्यांच्या नावाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीची निर्मिती झाली आहे, असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय जयंती उत्सव समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, त्यावेळी ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते.

यावेळी पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, 'रासेयो' कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, जयंती उत्सव समितीचे समन्वयक डॉ. धोंडीबा भुरे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, 'रासेयो' कार्यक्रमाधिकारी



प्रा. किसनाथ कुडके, प्रा. सागर ठाकूर आणि योगेश मोदी यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. गवई म्हणाले, राष्ट्रसंत गाडगे बाबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात व्यक्ती विकासापेक्षा समाज हिताला अधिक प्राधान्य दिले. म्हणूनच ते राष्ट्रसंत झाले, असे सांगून आपण त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

## देशाप्रती असणाऱ्या जबाबदारीची प्रत्येकाला जाणीव हवी : प्रभुदेसाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** भारत देशाचे, देशातील नागरिकांचे संरक्षण करणे हे केवळ सैनिकांचे कर्तव्य नाही, प्रत्येक नागरिकाची ती जबाबदारी आहे. सैनिक आपले तारुण्य पणाला लावत देशाचे रक्षण करत असताना आपणासही जबाबदारीची जाणीव हवी आहे, असे प्रतिपादन लक्ष्य फाउंडेशनच्या संस्थापिका अनुराधा प्रभुदेसाई यांनी केले.

नवनिर्माण प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.



यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सेना मेडल प्राप्त निवृत्त कर्नल गिरीधर कोले यांच्यासह प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी प्रभुदेसाई म्हणाल्या, अवघ्या १६-१७ वर्षांच्या वयात सैनिक सैन्यात रुजू होतात, आपले तारुण्य ते देशासाठी देतात. या तारुण्याला देश रक्षणासाठी समर्पित करतात. सैनिकांच्या शरीरातील रक्ताच्या प्रत्येक थेंबात देशप्रेम भरलेले असते. त्यांच्या वागण्या-बोलण्यात नैतिकता असते. देशासाठी आणि आपणा सर्वांसाठी ते मोठा त्याग करतात. हा त्याग सर्वांना सांगण्याचे काम मी करत असल्याचे त्या म्हणाल्या.

सैनिकांचे भारतावर आणि भारतीयांवर प्रेम आहे. परंतु, आपले त्यांच्यावर प्रेम आहे का? हे आता तपासून पाहणे गरजेचे बनले आहे. जे सैनिक घरदार, आई-वडील यांना सोडून सीमेवर जातात, प्रसंगी हौतात्म्य स्वीकारतात. त्यांच्याप्रती आपणही काहीतरी देणे लागतो. जेंव्हा आई ही संकल्पना मातृभूमीपर्यंत पोहोचते तेव्हाच तो सैनिक होतो. परंतु, आज समाजव्यवस्था खिळखिळी झाली आहे. हक्क आणि जबाबदारी यापैकी हक्क आपण मागतो पण जबाबदारी स्वीकारत नाही, असेही त्या म्हणाल्या.

प्रारंभी दीप प्रज्ज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. प्राजक्ता सरदेशमुख यांनी प्रभुदेसाई यांचे स्वागत केले. भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम सभागृहात झालेल्या या व्याख्यानास शिक्षक, पालक, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.

## लातूर स्त्री रोग संघटनेच्या वतीने आयोजित कॉल्पोस्कोपी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** स्त्री रोग संघटनेच्या वतीने रविवारी, दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या कोल्पोस्कोपी कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत एकूण दहा महिला रुग्णांची मोफत कॉल्पोस्कोपी करण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ठाणे येथील ख्यातनाम स्त्री रोग तज्ज्ञ तथा आदिवासी भागातील महिलांसाठी नेत्रदीपक कार्य करणाऱ्या डॉ. प्रिया गणेशकुमार यांची उपस्थिती होती.

लातूरच्या एमआयडीसी परिसरातील एका हॉटेलमध्ये या ठिकाणी ही कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत ७५ हुन अधिक स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांनी आपला सहभाग नोंदविला . यावेळी लातूर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाटील, सचिव डॉ. मनिषा बरमदे, कोषाध्यक्ष डॉ. अनुसया वलसे, ज्येष्ठ स्त्री रोग तथा वंध्यत्व निवारण तज्ज्ञ तथा समन्वयक डॉ. कल्याण बरमदे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ही कार्यशाळा गर्भपिशवीच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजनासंबंधी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती.

यावेळी डॉ. प्रिया गणेशकुमार यांनी महिलांनी गर्भाशय मुखाचा कर्करोग होऊ नये यासाठी कोणकोणती खबरदारी घेणे आवश्यक आहे, यासंदर्भात अतिशय मौलिक असे मार्गदर्शन केले. या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे, घ्यावयाची काळजी यांसह आजघडीला उपलब्ध असलेल्या आधुनिक उपचार पध्दतीविषयीही डॉ. प्रिया गणेशकुमार यांनी माहिती दिली. डॉ. प्रिया गणेशकुमार ह्या सन २०२१ ते २०२४ या काळात भारतीय स्त्री रोग संघटनेच्या कर्करोग समितीच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ऑन्कोलॉजी सेंटरचे जाळे संपूर्ण भारतभर पसरले आहे. त्या संपूर्ण भारतभर कॉल्पोस्कोपी कार्यशाळांचे आयोजन करून स्त्री रोग तज्ज्ञ डॉक्टरांना मार्गदर्शन करत असतात.

हॉटेल भारत फाईन डाईनमध्ये कार्यशाळेस संबोधित केल्यानंतर त्यांनी दुपारच्या सत्रात मंठाळे नगर मधील वलसे हॉस्पिटलमध्ये दहा महिला रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

## तत्वाप्रमाणे जीवन जगण्याचे शिक्षण देणारी संस्था म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : पतंगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ फेब्रुवारी -** माणसाला तत्वाप्रमाणे जीवन जगण्याचे शिक्षण देणारी संस्था म्हणजेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होय, असे प्रतिपादन हिंदुस्थान प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री रमेश पतंगे यांनी केले.

पद्मश्री रमेश पतंगे यांच्या आम्ही संघात का आहोत ! या आत्मकथनपर पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी सायंकाळी लातूरच्या राजस्थान विद्यालयाच्या खुल्या सभागृहात उत्साहात पार पडला. त्याप्रसंगी पतंगे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते.

व्यासपीठावर पद्मविभूषण डॉ. अशोकराव कुकडे काका, शहर संघचालक उमाकांत मद्रेवार यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात पद्मश्री रमेश पतंगे यांनी आजमितीस राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सर्व क्षेत्रव्यापी झाला आहे. सर्वच क्षेत्रात संघस्वयंसेवकांनी अत्युचा स्थान संपादन केले आहे, असे सांगितले. संघ कार्याला



कोणतीही सीमा नाही, ते अगदी क्षितिजासारखे आहे. तरीसुद्धा आजही काही मंडळी संघाच्या कार्यावर टीकाटिपण्णी करून अज्ञान वर्धनाचे काम करत असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

ज्याप्रमाणे श्रीकृष्णाकडे मथुरेत विविध नजरेने पहिले गेले,अगदी तसेच संघाच्याही बाबतीत घडत गेल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मथुरेत श्रीकृष्णाच्या रूपात गोपींना आपला प्रियकर दिसला, मातांना आपला पाळ्या दिसला तसा युवा सवंगड्याना श्रीकृष्णामध्ये जीवश्च कंठश्च सखा दिसला. संघाचेही असेच आहे. आपले राष्ट्र हे हिंदुराष्ट्र आहे, हे निर्विवाद सत्य आहे. हिंदू समाज आत्मविस्मृत झाला आहे. झोपलेल्या हिंदू समाजाला जागृत करण्याचे काम संघ करत आहे. हिंदू कोणाला म्हणायचे ? या प्रश्नाचे उत्तर डॉ. हेडगेवार यांच्या भाषेत ' आम्ही ज्यांना हिंदू समजतो ते हिंदू आहेत' ते असल्याचे सांगून समग्र हिंदू समाजाचे संघटन करण्याचे काम संघाच्या माध्यमातून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदू धर्म जगला पाहिजे, आचरणात आणला पाहिजे, असे सांगून पतंगे यांनी प्रत्येकाने समाजाभिमुख, राष्ट्राभिमुख व्हावे,असे मत व्यक्त केले.

पद्मविभूषण डॉ. अशोकराव कुकडे यांनी यावेळी आपले विचार व्यक्त करताना संघाच्या कामाचे वेगवेगळे आयाम असून संघाचे काम क्षितिजासारखे आहे, ते कधीही न संपणारे असल्याचे सांगितले. पद्मश्री रमेशराव पतंगे यांनी आपल्या पुस्तकात संघ कार्याची महती, समाज विशद करण्याचे काम अतिशय सूत्रबद्धरीत्या नमूद केल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य संजय गवई यांनी केला.

कार्यक्रमाचे प्रास्तविक व आभार प्रदर्शन विलास आराध्ये यांनी केले. विनय दिक्षित यांनी ' मन माझे विसावले रे.. संघ मंदिरी स्थिरावले रे..' हे वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उमा देशपांडे यांनी केले. अप्पाराव कुलकर्णी यांच्या शांतीमंत्र पठनाने कार्यक्रमाची सांगता झाली.